# सृष्टचमत्कार

अथवा

मराठी सहावे इयत्तेच्या विद्यार्थ्यांस लागणाऱ्या

सृष्टिशास्त्रीय विषयांचें संक्षिप्त विवेचन.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

अनुक्रम............ वि............

क्रमांक ............ हें पुस्तक ......

शंकर बाळकृष्ण दीक्षित

यांणीं केलें

तें

पुणें येथें "पुणेंवैभव" छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति दुसरी

सन १८८४

शके १८०५

किंमत दोन आणे.

( सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.)

खालील पत्यावर पैसा पाठविला असतां हीं पुस्तकें मिळतील. किंमत दर प्रतीस २ आणे, शिवाय टपालखर्च. अर्धा आणा हांशिलांत सहा प्रती जातात. दहा किंवा जास्त प्रती घेणारास टपालखर्च पडणार नाहीं; शिवाय १० प्रती घेणारास १ प्रत कमिशन मिळेल. एकदम ६० प्रतीस टपाल खर्च सुद्धां ६ रुपये.

शंकर बाळकृष्ण दीक्षित.
फ. अ. मास्तर इंग्लिश स्कुल.
बार्शी जिल्हा सोलापूर.

ग्रंथ संग्रहालय
नं.
ठाणें सन १८

# प्रस्तावना.

## ( पहिल्या आवृत्तीची. )

सृष्टिशास्त्राचीं मोठमोठीं पुस्तकें वाचिलीं तरी केवळ त्यांच्याच साह्यानें त्या शास्त्राचें उत्कृष्ट ज्ञान होणें कठिण. मग हें पुस्तक तर संक्षिप्तच आहे. तथापि सहावे इयत्तेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्थितीचा सर्व दृष्टींनीं विचार केला असतां त्यांस प्रस्तुत उपलब्ध असलेल्या या सारख्या सर्व पुस्तकांहून याचा उपयोग जास्त होईल असें दिसून येईल. रा. सा. गोपाळ मो. साठे डे. ए. इ. जिल्हा ठाणें व रा. रा. जनार्दन बा. मोडक हेडमास्तर ठाणें हायस्कूल यांनीं हें पुस्तक छापण्यापूर्वी समग्र वाचून पहाण्याची तसदी घेतली याबद्दल ग्रंथकार त्यांचा फार आभारी आहे. यांतील विवेचन संक्षिप्तच परंतु साहावे इयत्तेची परीक्षा देणारांस चांगलें उपयोगाचें आहे, असा सदरील उभय विद्वानांचा अभिप्राय आहे.

# सृष्टचमत्कार.

## पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या.

**गोल** ह्मणजे असा एक पदार्थ की ज्यांतल्या एका विशेष बिंदूपासून पृष्ठभागापर्यंत काढलेल्या सर्व रेषा बराबर असतात. आणि तो विशेषबिंदु गोलाचा **मध्यबिंदु** होय.

जी रेषा गोलाच्या मध्यबिंदूंतून जाऊन पृष्ठभागास दोन्ही अंगांनीं मिळते तीस त्या **गोलाचा व्यास** ह्मणतात.

पृथ्वी आपल्या भोंवतीं फिरते. ती ज्या रेषेवर फिरते त्या काल्पित रेषेस पृथ्वीचा **आंस** ह्मणतात. आंसाच्या टोंकांस **ध्रुव** ह्मणतात; उत्तरेकडच्यास **उत्तरध्रुव** आणि दक्षिणेकडच्यास दक्षिणध्रुव ह्मणतात.

दोन ध्रुवांपासून सारख्या अंतरावर पृथ्वीच्या पृष्ठभागावरून जाणारें जें पूर्वपश्चिम वर्तुल त्यास **विषुववृत्त**[1] ह्मणतात.

वृत्त ह्मणजे वर्तुल. कोणत्याही वर्तुलाचे ३६० भाग कल्पितात; त्या प्रत्येक भागास **अंश** ह्मणतात. अंशाचे ६०

---

१ जेव्हां रात्र आणी दिवस सारखी होतात त्या कालास विषुव ह्मणतात. विषुववृत्तावर नेहमीं रात्र आणि दिवस हीं सारखीं असतात, ह्मणून त्या वृत्तास विषुववृत्त म्हणतात.

भाग कल्पितात. त्यांस **कला** ह्मणतात. कलेच्या ६० **विकला** मानतात.

विषुववृत्तानें पृथ्वीचे दोन भाग होतात. त्यांतील उत्तरेकडच्यास **उत्तरगोलार्ध** आणि दक्षिणच्यास **दक्षिणगोलार्ध** ह्मणतात.

विषुववृत्ताशीं समांतर अशीं त्याच्या उत्तरेस व दक्षिणेस जीं वृत्तें काढितात त्यांस **अक्षवृत्तें** ह्मणतात.

एकाद्या स्थळाचें विषुववृत्तापासून जें अंशात्मक अंतर त्यास **अक्षांश** ह्मणतात. विषुववृत्ताच्या उत्तरेस असण्याऱ्या स्थलाचे अक्षांश ते उत्तरअक्षांश, आणि दक्षिणेस असण्याऱ्यांचे ते दक्षिणअक्षांश. विषुववृत्तापासून ध्रुव ९० अंशांवर असतो; ह्मणून अक्षांश ० पासून ९० पर्यंत येतात.

विषुववृत्तास लंबरूपानें छेदून दोन्ही ध्रुवांतून जाणारीं जीं वृत्तें त्यांस **याम्योत्तरवृत्तें** किंवा **रेखावृत्तें** ह्मणतात.

ज्या स्थलाच्या खस्वास्तिकांतून जें याम्योत्तरवृत्त जातें त्यास त्या स्थलाचें याम्योत्तरवृत्त ह्मणतात.

याम्योत्तरवृत्तानें भूगोलाचे दोन भाग होतात, पूर्वगोलार्ध आणि पश्चिमगोलार्ध.

ग्रिनिच शहरांतून जाणारें जें याम्योत्तरवृत्त तें इंग्लिश लोक मुख्य मानितात. हिंदुलोक उज्जनीवरून जाणाऱ्यास मुख्य मानितात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ७६७ (३) दि: २।१२।
७०५ नों दि २१-६-७०

एकाद्या स्थळाचें मुख्य याम्योत्तरवृत्तापासून जें अंशात्मक अंतर त्यास **रेखांश** ह्मणतात. पूर्वेकडील स्थलांचे ते पूर्वरेखांश. आणि पश्चिमच्यांचे पश्चिमरेखांश. हे ० पासून १८० पर्यंत असतात.

विषुववृत्तापासून २३॥ अंशांवर एक उत्तरेस आणि एक दक्षिणेस अशीं जीं अक्षवृत्तें काढितात त्यांस **अयनवृत्तें** ह्मणतात. त्यांतील उत्तरेकडचें तें **कर्कवृत्त** आणि दक्षिणेकडचें तें **मकरवृत्त**.

ध्रुवांपासून २३॥ अंशांवर जीं अक्षवृत्तें असतात त्यांस **ध्रुववृत्तें** ह्मणतात. उत्तरचें उत्तरध्रुववृत्त आणि दक्षिणचें तें दक्षिणध्रुववृत्त.

सूर्य ताऱ्यांमधून चालतोसा दिसतो. त्याच्या गमनानें आकाशांत जें वर्तुळ पडतें त्यास **क्रांतिवृत्त** ह्मणतात. त्या वृत्तास अनुसरूनच भूगोलावर विषुववृत्तास छेदून कर्कवृत्त आणि मकरवृत्त यांपर्यंत जाणारें जें वृत्त कल्पितात त्यास क्रांतिवृत्त ह्मणतात.* क्रांति ह्मणजे गमन.

क्रांतिवृत्ताच्या प्रदेशांत अश्विनी, भरणी, इत्यादि २७ नक्षत्रें ( तारकापुंज ) पश्चिमेकडून पूर्वेकडे क्रमानें आहेत. त्या नक्षत्रांचे १२ समुदाय ह्मणजे **राशि** [illegible] मेष,

---

* बहुधा पृथ्वीवरची [illegible] वृत्तें होत [illegible]

वृषभ अशीं नांवें दिलीं आहेत. हीं नक्षत्रें व राशि -पर-स्परांपासून सारख्या अंतरावर नाहींत. क्रांतिवृत्ताचे सारखे २७ विभाग कल्पून त्यांतल्या प्रत्येकास ही **नक्षत्र** अशी संज्ञा देतात. तसेंच क्रांतिवृत्ताचे सारखे १२ भाग कल्पून त्यांतल्या प्रत्येकास **राशि** अशी संज्ञा देतात.

क्रांतिवृत्त विषुववृत्तास दोन ठिकाणीं छेदितें; त्या प्रत्येक बिंदूस **संपात** असें ह्मणतात. ज्या संपातापासून सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस जाऊं लागतो तो मेषसंपात, आणि ज्यापासून दक्षिणेस जाऊं लागतो तो तुळासंपात.

सूर्याच्या प्रकाशाच्या मर्यादेचें जें वृत्त त्यास **प्रकाशवृत्त** ह्मणतात.

ज्या वृत्ताची पातळी गोलाच्या मध्यबिंदूतून जाते त्यास त्या गोलावरील **महावृत्त** ह्मणतात. इतरास **लघुवृत्त** ह्मणतात. विषुववृत्त, क्रांतिवृत्त, याम्योत्तरवृत्त, प्रकाशवृत्त हीं महावृत्तें आहेत.

आकाश आणि जमीन ज्या स्थळीं लागलेलीं दिसतात त्या वर्तुलास **क्षितिज** ह्मणतात.

दृश्य खगोलार्धाचा आपल्या डोक्यासमोरील जो अति उंच बिंदु त्यास **खस्वस्तिक** ह्मणतात.

खस्वस्तिकासमोरचा अदृश्य खगोलार्धाचा जो अतिनीच बिंदु त्यास **अधःस्वस्तिक** ह्मणतात.

एक खस्थ पदार्थ दुसऱ्या खस्थ पदार्थाभोंवतीं ज्या मार्गानें फिरतो त्या मार्गास **कक्षा** ह्मणतात.

जे खस्थ पदार्थ सूर्याभोंवतीं फिरतात त्यांस **ग्रह** ह्मणतात. व सूर्याभोंवतीं फिरणारे मोठे ग्रह बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरु, शनि, हर्शल आणि नेपच्यून हे आहेत.

ग्रहाभोंवतीं जे फिरतात त्यांस उपग्रह ह्मणतात. चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह आहे.

सूर्य व त्याच्या भोंवतीं फिरणारे ग्रह, उपग्रह वगैरे या सर्वांच्या समुदायास सूर्यमाला ह्मणतात.

ग्रह उपग्रह यांच्या कक्षा दीर्घवर्तुलाकृति असतात.

दोन कक्षा एकमेकींस ज्या बिंदूंत छेदितात त्यांस **कक्षापात** ह्मणतात.

अयनवृत्तें आणि ध्रुववृत्तें यांच्या योगानें पृथ्वीचे हवेच्या संबंधें पांच भाग होतात त्यांस **कटिबंध** ह्मणतात. उष्णकटिबंध हा दोन अयनवृत्तांच्या मध्यें ४७ अंशांत आहे. ह्यास अयनवृत्तांतर्वर्तिप्रदेश किंवा अयनप्रदेश असेंही ह्मणतात. ह्यांत उष्णता फार असते. अयन वृत्तापासून ध्रुववृत्तापर्यंत समशीतोष्ण कटिबंध. प्रत्येक ४३ अंशांचा असे हे दोन आहेत, उत्तरसमशीतोष्ण कटिबंध आणि दक्षिणसमशीतोष्ण कटिबंध. यांत उष्णता व थंडी सारखी असते. ध्रुववृत्तापासून ध्रुवापर्यंत शीत कटिबंध. प्रत्येक २३॥ अंशांचा

असे हे दोन आहेत. यांत थंडी फार. क्षेत्रफळाच्या मानानें पृथ्वीवर उष्णकटिबंध ४० भाग, समशीतोष्ण कटिबंध ५२ भाग आणि शीत कटिबंध ८ भाग असे आहेत.

## पृथ्वीच्या गति.

पृथ्वी २४ तासांत आपल्या आंसाभोंवतीं फिरते; ह्या तिच्या गतीस दैनंदिनगति ह्मणतात. ह्या गतीमुळें रात्र आणि दिवस होतात.

पृथ्वी आंसाभोंवतीं पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. ह्मणून सूर्य, चंद्र, नक्षत्रें वगैरे पूर्वेकडून पश्चिमेस जातातशीं दिसतात.

पृथ्वी आंसाभोंवतीं फिरत असतां तशीच सूर्याभोंवतीं फिरते; ह्या तिच्या गतीस वार्षिक गति ह्मणतात. वार्षिक गतीमुळें ऋतु होतात. पृथ्वीच्या वार्षिक गतीस ३६५ दिवस ५ तास ४९ मिनिटें लागतात. इतक्या काळास सायन सौरवर्ष ह्मणतात.

पृथ्वीला मूळची सरळ रेषेनें जाण्याची प्रेरणा ईश्वरानें दिली आहे. व दुसरें तिजवर सूर्याचें *आकर्षण आहे. मूळप्रेरणा व सूर्यकृत आकर्षण ही परस्परांवर बहुधा लंब

---

* सर्व पदार्थ सर्वकाळ परस्परांस ओढीत असतात, ह्या आकर्षणास **गुरुत्वाकर्षण** म्हणतात. ह्याच आकर्षणामुळें सर्व ग्रह सूर्याभोंवतीं व उपग्रह मुख्य ग्रहाभोंवतीं फिरतात. पदार्थाचें वजन ( गुरुत्व ) हा गुरुत्वाकर्षणाचाच परिणाम होय. ज्या आकर्षणाच्या योगानें पदार्थाचे प्रकृत्यश [illegible] चिकटून राहतात त्यांस **स्नेहाकर्षण** म्हणतात.

ठाणे

असतात. पदार्थास एकाच काळीं दोन प्रेरणा मिळाल्या असतां त्यांनीं होणाऱ्या समांतरभुज चौकोनाच्या कर्णरेषेनें तो जातो. वरील दोन प्रेरणा प्रतिक्षणीं पृथ्वीवर लागू आहेत, व सूर्य स्थिर आहे यामुळें त्या भोंवतीं वर्तुल मार्गानें ती फिरते. सूर्याच्या आकर्षणामुळें त्याकडे जाण्याची पृथ्वीची जी गति तीस मध्याभिगामिनी ( मध्याकडे नेणारी ) गति ह्मणतात. व सरळ रेषेंत जाण्याची जी गति तीस मध्योत्सारिणी ( मध्यापासून दूर नेणारी ) गति ह्मणतात. ह्या दोन्ही गति कक्षेच्या सर्वभागीं सारख्या नसतात; ह्मणून कक्षा बरोबर वर्तुळ न पडतां दीर्घवर्तुळ पडते.

## रात्र आणि दिवस.

आपण कोणताही गोल पाहिला असतां त्याचा अर्धा भाग मात्र आपणास दिसतो. त्याप्रमाणें भूगोलाचा अर्धा भाग मात्र नेहमीं सूर्याकडे असतो. पृथ्वी स्वयंप्रकाश नाहीं; तिला सूर्यापासून प्रकाश मिळतो. यामुळें तिचें जें अर्ध सूर्याकडे असेल त्यावर मात्र प्रकाश पडतो. पृथ्वी आपल्या सभोंवतीं फिरते यामुळें तिचे निरनिराळे भाग क्रमानें सूर्यासमोर येतात. ज्या अर्धावर सूर्याचा प्रकाश पडतो तेथें दिवस असतो; आणि जें अर्ध सूर्यासमोर नसतें तेथें काळोख असतो; म्हणजे रात्र असते.

सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंत जो काळ जातो त्यास दिवस किंवा दिन म्हणतात. त्याचें जें मान तें दिनमान.

एका याम्योत्तरावर जीं स्थळें असतात त्यांस एकाच काळीं मध्यान्ह होतो.

पृथ्वीवरील प्रत्येक स्थळ २४ तासांत ३६० अंश चालतें; ह्मणजे एक तासांत १५ अंश किंवा ४ मिनिटांत एक अंश पश्चिमेकडून पूर्वेस जातें. ह्यामुळें एखाद्या स्थानीं जेव्हां सूर्योदय होतो, त्याच्या मागाहून एका तासानें, त्या स्थानाच्या पश्चिमेस १५ अंशांवर असणाऱ्या स्थानीं होतो; आणि पूर्वेस १५ अंशांवर असणाऱ्या स्थानीं एक तास अगोदर होतो. मद्रास मुंबईच्या पूर्वेस सुमारें ७॥ अंश आहे. ह्मणून मुंबईपेक्षां तेथें सूर्योदय अर्धातास अगोदर होतो.

## ऋतु.

पृथ्वीच्या पृष्ठभागावरील हवेंत जो फेरफार होतो त्यास ऋतु ह्मणतात. हवेंत फेरफार होण्याचें कारण उष्णता कमजास्त होते हें आहे. सूर्यकिरणापासून पृथ्वीवर उष्णता उत्पन्न होते. किरण नेहमीं सारखे पडते तर उष्णता कमजास्त झाली नसती व ऋतु न होते. परंतु किरण नेहमीं सारखे पडत नाहींत.

मुख्यतः तिर्कस किरणांपेक्षां लंब किरणांनीं जास्त उष्णता उत्पन्न होते; व सूर्य जितका जास्त वेळ क्षितिजावर राहील,

म्हणजे दिनमान जास्त असेल, त्या मानानें ही उष्णता जास्त उत्पन्न होते.

किरण लंब किंवा किंचित् तिर्कस असे पडण्याचा व दिनमान जास्त होण्याचा काळ बहुधा एकच असतो यामुळें एकाद्या स्थळीं जेव्हां किरण लंब किंवा किंचित् तिर्कस पडतात, व दिनमान जास्त असतें, तेव्हां त्या स्थळीं इतर दिवसांपेक्षां उष्णता जास्त असते; ह्मणजे उन्हाळा असतो. व किरण बरेच तिर्कस किंवा फार तिर्कस पडत असले व दिनमान कमी असलें ह्मणजे हिंवाळा होतो. मुख्यऋतु उन्हाळा व हिंवाळा हे दोनच आहेत.

**किरण सारखे न पडण्याचें व दिनमान कमजास्त होण्याचें कारण.**

पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते, ती विषुववृत्तांतून फिरती तर किरण सर्वत्र सारखे पडते. परंतु कक्षा किंवा * क्रांतिवृत्त यांचा विपुववृत्ताचे पातळीशीं २३॥ अंशांचा कोन होतो. आणि आंस तर नेहमीं विषुववृत्ताचे पातळीवर लंब † असावयाचा. तेव्हां अर्थात्च ( १ ) कक्षेच्या पातळीशीं आंसां-


* कक्षेची पातळी क्रांतिवृत्ताच्या पातळींतच पडते. दोहोंचा मध्य सूर्य. सूर्य आकाशविषुववृत्ताच्याही मध्यभागीं आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं.

† एकाद्या रेषेनें पातळींशी होणारे कोन सर्व बरोबर असले ह्मणजे ती रेषा त्या पातळीवर लंब आहे असें ह्मणतात.

चा ६६$\frac{१}{२}$ अंशांचा* कोन होतो. आणि ( २ ) आंसाचा रोंख कधींही बदलत नाहीं. ह्मणजे एकदां आंसानें होणारी रेषा दुसऱ्या वेळीं होणाऱ्या रेषेशीं समांतर † असते. या दोन कारणांनीं सूर्य कधीं भूमध्यवृत्ताच्या उत्तरेस व कधीं दक्षिणेस होतो; यामुळें कोणत्याही ठिकाणीं किरण नेहमीं सारखा कोन करून पडत ‡ नाहींत.

---

*




† पृथ्वी फिरत असतां प्रतिक्षणीं आंसाचें स्थान बदलतें; पृथ्वीकक्षेचा व्यास १९ कोटि मैल आहे; तरी आंसाचें टोंक आकाशांतील एकाच बिंदूकडे ह्मणजे ध्रुवाकडे असतें. ही गोष्ट अनंत दूरत्वामुळें होते.

‡ आकाशांत क्रांतिवृत्ताची जशी स्थिति आहे तशा रीतीनें एकादा

मार्चच्या २० व्या तारखेस सूर्य विषुववृत्तावर असतो. तेथून तो उत्तरेस जातां जातां जूनच्या २१ व्या तारखेस कर्कवृत्तावर येतो. नंतर दक्षिणेस वळतो. तो सप्तंबरच्या २२ व्या तारखेस पुनः विषुववृत्तावर येऊन नंतर दक्षिणगोलार्धांत जातो. तो डिसेंबरच्या २१ व्या तारखेस मकरवृत्तावर जाऊन उत्तरेस वळतो. तो मार्चच्या २० व्या तारखेस पुनः विषुववृत्तावर येतो. यामुळें अयनवृत्तांमधील प्रत्येक स्थळीं मात्र वर्षांतून दोन वेळां किरण लंबरूपानें पडतात. बाकीच्या दिवशीं किंचित् तिर्कस पडतात. अयनवृत्तांपासून ध्रुवापर्यंत कधींही लंब पडत नाहींत. जसजसें ध्रुवाकडे जावें तसतसे जास्त तिर्कस पडत जातात.

क्रांतिवृत्तावर सूर्याचें स्थान नेहमीं बदलतें, यामुळें प्रकाशवृत्ताचा प्रदेश नेहमीं बदलत असतो. विषुववृत्तावर सूर्य असतो तेव्हां प्रकाशवृत्त दोहों ध्रुवांपर्यंत पोंचतें; व त्याणें प्रत्येक अक्षवृत्ताचे, प्रत्येक भाग १८० अंशांचा असे दोन समान भाग होतात. ह्मणून त्यावरील प्रत्येक स्थानास प्र-

---

कागद धरून त्याच्या कडेभोंवतीं एक पेनसिल फिरवावी. फिरवितांना अर्धी कागदाच्या एका बाजूस व अर्धी दुसऱ्या बाजूस अशी, कागदाशीं एका अंगानें ६६॥ अंशांचा कोन करून धरावी. कागद ही कक्षेची पातळी व पेनसिलीचें टोंक हें पृथ्वीच्या आंसाचें टोंक असें मानलें असतां, किरण तिर्कस पडतात वगैरे गोष्टी समजतील. टेबलाच्या कडेभोंवतीं सदहु कृति केली असतां ही समजूत पडेल.

काशवृत्तांतून जाण्यास १२ तास लागतात. ह्मणून तेव्हां रात्र आणि दिवस हीं सर्वत्र सम होतात.

प्रकाशवृत्त आणि विषुववृत्त हीं दोन्ही महावृत्तें असल्यामुळें सूर्य कोठेंही असला तरी प्रकाशवृत्तानें विषुववृत्ताचे सर्वदां दोन समान भाग होतात. ह्मणून विषुववृत्तावर दिनमान नेहमीं १२ तासांचें असतें.

२४ तासांतून दिनमान वजा केलें ह्मणजे बाकी राहील तें रात्रिमान.

सूर्य विषुववृत्तावरून उत्तरेस कर्कवृत्तापर्यंत जाऊन पुनः विषुववृत्तावर येईपर्यंत प्रकाशवृत्त उत्तरध्रुवाच्या पलीकडे जातें; व प्रत्येक उत्तर अक्षवृत्ताचा अर्धापेक्षां अधिक भाग प्रकाशवृत्तांत सांपडतो. यामुळें त्यावरील प्रत्येक स्थानास प्रकाशवृत्तांतून जाण्यास १२ तासांहून जास्त वेळ लागतो. यामुळें त्या वेळीं उत्तरगोलार्धांत दिनमान १२ तासांहून जास्त असतें. सूर्य दक्षिणगोलार्धांत जातो तेव्हां तिकडेही असेंच होतें. सूर्य एका गोलार्धांत असला ह्मणजे दुसऱ्या गोलार्धांत दिवसापेक्षां रात्रि मोठ्या होतात.

विषुववृत्तापासून ध्रुववृत्तापर्यंत दिनमान व रात्रिमान १२ तासांपासून २४ तासपर्यंत होतें. ध्रुववृत्तापासून ध्रुवापर्यंत एक दिवसापासून सहा महिनेपर्यंत दिवस रात्रि होतात.

सूर्य उत्तर गोलार्धांत असतो तेव्हां तेथें दिनमान १२

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर 39
अनुक्रम.......
क्रमांक ....... दि .......
नोंद दि .......



तासांहून ज्यास्त होतें, व किरण लंब किंवा थोडेसे तिर्कस पडतात, म्हणून उन्हाळा होतो. व तो दक्षिणगोलार्धांत जातो तेव्हां उत्तरगोलार्धांत हिंवाळा होतो.

## ग्रहणें.

दोन खस्थ पदार्थांमध्यें तिसरा आल्याच्या योगानें जो दिसेनासा होतो त्यास **ग्रहण** लागलें असें ह्मणतात.

चंद्र पृथ्वीभोंवतीं फिरतो यामुळें सूर्य व चंद्र यांस ग्रहणें लागतात. गोरेश्वर आत्माराम कर्वे

सूर्य व पृथ्वी यांच्यामध्यें चंद्र आल्याच्या योगानें सूर्य दिसेनासा होतो. तेव्हां सूर्यग्रहण होतें.

सूर्य व चंद्र यांच्यामध्यें पृथ्वी आल्याच्या योगानें सूर्याचा प्रकाश चंद्रावर पडेनासा होऊन चंद्र पृथ्वीच्या छायेंत सांपडतो तेव्हां चंद्रग्रहण होतें.

सूर्यग्रहण अमावास्येस व चंद्रग्रहण पौर्णिमेस होतें.

चंद्र पृथ्वीभोंवतीं पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरतो. तो सूर्यग्रहणाचे वेळीं सूर्याचा पश्चिमभाग प्रथम आच्छादितो, म्हणून सूर्यग्रहणाचा स्पर्श पश्चिमेकडून होतो. चंद्रग्रह-

---

* चंद्रग्रहणास ही व्याख्या लागत नाहीं. चंद्रग्रहणांत चंद्र दिसेनासा होतो असें नाहीं; तो निस्तेज मात्र होतो. चंद्र स्वयंप्रकाश नाहीं. सर्व ग्रह, उपग्रह, धूमकेतु यांस सूर्यापासून प्रकाश मिळतो.

णांत चंद्राचा पूर्वभाग प्रथम पृथ्वीच्या छायेंत सांपडतो ह्मणून चंद्रग्रहणाचा स्पर्श पूर्वेकडून होतो.

सूर्यचंद्रांचीं बिंबें पूर्ण आच्छादित होतात तेव्हां त्या ग्रहणास पूर्ण किंवा **खग्रास** * ग्रहण म्हणतात. जेव्हां कांहीं अंशीं आच्छादित होतात तेव्हां त्यास **अपूर्ण** ग्रहण म्हणतात. एखादे वेळीं चंद्राच्या योगानें सूर्यबिंब पूर्ण आच्छादित न होतां त्याचा मधला भाग मात्र आच्छादित होऊन सभोंवतालचा कंकणाकृति भाग दिसत असतो; अशा ग्रहणास **कंकणाकृति** ग्रहण ह्मणतात. पृथ्वीची चंद्रावर पडणारी छाया नेहमीं चंद्रापेक्षां मोठी असते म्हणून चंद्रास कंकणाकृति ग्रहण कधींही लागावयाचें नाहीं.

चंद्राची कक्षा व पृथ्वीची कक्षा ह्या दोन्ही एका पातळींत असत्या तर दर पौर्णिमेस व अमावास्येस ग्रहण झालें असतें. परंतु त्यांच्या मध्यें पांच अंशांचा कोन आहे, ह्मणून नेहमीं ग्रहणें होत नाहींत.

सुमारें १८वर्षे १० महिन्यांनीं तींच ग्रहणें येऊं लागतात.

चंद्रग्रहणांपेक्षां सूर्यग्रहणें जास्त होतात, परंतु तीं सगळीं सर्व ठिकाणीं दिसत नाहींत. व एकच सूर्यग्रहण पृथ्वीच्या ज्या भागावर दिसतें, तेथेंही निरानिराळ्या स्थानीं कमजास्त

---

* ख = आकाश. तेव्हां वस्तुतः ज्या ग्रहणांत बिंबाचा ग्रास होऊन आकाशाचाही होतो तें खग्रास.

दिसतें. ज्या भागाच्या क्षितिजावर चंद्र असतो, त्या भागावर चंद्रग्रहण दिसतें. व तें सर्वत्र सारखें दिसतें. वर्षांत दोहोंमिळून दोहोंपेक्षां कमी व सातांपेक्षां ज्यास्त ग्रहणें होत नाहींत.

## भरती ओहोटी.

चंद्रसूर्यांच्या व त्यांतही विशेषतः चंद्राच्या आकर्षणानें समुद्रास भरती ओहोटी येते. चंद्र दररोज दोन दोन घटकांनीं मागाहून उगवतो, ह्यामुळें भरती व ओहोटी ही दोन दोन घटिकांनीं मागाहून येते.

चंद्रापासून पृथ्वीच्या मध्यबिंदूपर्यंत जें अंतर त्या मानानें पृथ्वीवर चंद्राचें आकर्षण पडतें. यामुळें मध्यबिंदु जितका ओढिला जातो तितकीच पृष्ठभागची दोहोंकडची जमीन ओढली जाते. परंतु जमिनीपेक्षां पाण्याच्या अंगीं स्नेहाकर्षण कमी, यामुळें पृष्ठभागच्या पाण्यावर तितकेंच आकर्षण पडत नाहीं. जें पाणी चंद्रास जवळ त्यावर जास्त आकर्षण पडतें; व जें दूर त्यावर कमी पडतें. अर्थातच चंद्र पृथ्वीवरच्या ज्या स्थानाच्या खस्वस्तिकीं असतो, तेथलें पाणी, तेथल्या जमिनीपेक्षां जास्त ओढलें जातें. यामुळें मध्यें पोकळी पडते. ती भरण्याकरितां दोहोंबाजूंनीं पाणी येऊन तेथें भरती येते. तसेंच चंद्र ज्या ठिकाणीं खस्वस्तिकीं असतो त्याच्या खालच्या बाजूस १८० अंश अंत-

रावर जमीन जितकी ओढिली जाते, तितकें पाणी ओढलें जात नाहीं, यामुळें मध्यें पोकळी पडते. ती भरण्याकरितां दोहोंकडून पाणी येतें, यामुळें तेथेंही भरती असते. याप्रमाणें चंद्र जेथें खस्वस्तिकीं असेल तेथें व तेथून १८० अंशांवर अशी दोन ठिकाणीं भरती असते. व तेथून ९० अंशावर असणाऱ्या दोन्ही आंगांस ओहोटी असते. दैनंदिन गतीमुळें पृथ्वीवरचीं सर्व स्थानें क्रमानें चंद्रासमोर येतात. यामुळें पृथ्वीवर सर्वकाळ कोठेंतरी दोन ठिकाणीं भरती व दोन ठिकाणीं ओहोटी असते.

चंद्र क्षितिजावर येऊं लागला ह्मणजे भरती लागूं लागते, ती तो खस्वास्तिकीं आल्यावर पूर्ण होते, तेव्हां **समा** झाला असें ह्मणतात. ओहोट पूर्ण होतो तेव्हां त्यास **निखार** ह्मणतात. तेव्हां चंद्र क्षितिजांत असतो.

सूर्याच्या आकर्षणानें भरती व ओहोटी कमजास्त होते. सूर्य व चंद्र यांचीं आकर्षणें एका रेषेंत असतात त्या दिवशीं ह्मणजे अमावास्या व पौर्णिमा या दिवशीं, फार मोठी भरती येते; तीस उधान ह्मणतात. त्या दिवशीं ओहोटीही फार होते. सूर्यचंद्रांचीं आकर्षणें एकमेकांवर लंब असतात त्या दिवशीं ह्मणजे शुद्ध किंवा वद्य अष्टमीच्या सुमारास भरती थोडी येते त्यास **भांग** म्हणतात. त्या दिवशीं ओहोटीही थोडी होते. ह्मणजे पाणी थोडेंच ओहोटतें.

भरती ओहोटीमुळें समुद्राचें पाणी स्वच्छ राहतें.

## वातावरण.

पृथ्वीच्या भोंवतीं जें वायूचें वेष्टण आहे त्यास वातावरण ह्मणतात. पृष्ठभागापासून जसजसें वर जावें तसतसें वातावरण थंड व विरल होत जातें. सुमारें ४९ मैलांपलीकडे तें फारच विरल आहे. यामुळें त्याची उंची समान्यतः ४५ मैल मानितात. वातावरणांत मुख्यतः आक्सिजन व नैत्रोजन हे वायु आहेत. त्यांत मापानें आक्सिजन शेंकडा सुमारें २१ भाग आणि नैत्रोजन ७९ भाग आहे. शिवाय कारवानीक आसिड वायु हजारांस सुमारें चार भाग या मानानें असतो. आणि पाण्याची वाफही कधीं कधीं शेंकडा १ भागपर्यंत असते. या सर्वांच्या साध्या* मिश्रणानें वातारण झालें आहे.

---

*ज्या शक्तीच्या योगानें दोन किंवा अधिक भिन्न पदार्थांपासून, त्यांच्या मिश्रणानें, त्यांच्याहून निराळ्या स्वरूपाचा व गुणधर्माचा पदार्थ बनतो, त्या शक्तीस **रसायनाकर्षण** म्हणतात. रसायनाकर्षणानें जें मिश्रण घडतें, म्हणजे ज्याच्या योगानें घटकद्रव्यांचे गुणधर्माचा व स्वरूप बदलून त्यांहून निराळ्या गुणधर्माचा व स्वरूपाचा पदार्थ उत्पन्न होतो, त्या मिश्रणास **रसायनमिश्रण** ह्मणतात. हळद व चुना यांपासून तांबडा रंग होतो; आक्सिजन व हैद्रोजन या वायूंपासून पाणी होतें; हीं रसायन मिश्रणाचीं उदाहरणें होत. ज्या मिश्रणाच्या योगानें घटकद्रव्यांचें स्वरूप व गुणधर्म हीं बदलत नाहींत त्यास साधें किंवा **यांत्रिकमिश्रण** ह्मणतात. तांदूळ व हरभरे एकत्र केले तर त्यांचें मिश्रण हें यांत्रिकमिश्रण होय.

प्राणी व उद्भिज्जें हीं वांचण्यास वातावरण अवश्यक आहे. वातावरणाच्या योगानें निरनिराळे उपयोगी वारे वाहतात; पाऊस पडतो; व त्याच्या अंगीं प्रकाश-किरणांचें वक्रीभवन आणि परावर्तन करण्याचा धर्म आहे. यामुळेंही पुष्कळ उपयोग होतो. संधिप्रकाश यामुळेंच पडतो.

किरण एका पारदर्शक पदार्थांतून, त्याहून घन किंवा पातळ अशा दुसऱ्या पारदर्शक पदार्थांत जातांना किंचित् वांकडे होतात, ह्यास **वक्रीभवन** ह्मणतात. किरण अपारदर्शक पदार्थांवर पडले असतां त्यांतून पलीकडे न जातां मार्गे वळतात ह्यास **परावर्तन** ह्मणतात.

सूर्योदयापूर्वीं व सूर्यास्तानंतर कांहीं वेळ जो उजेड असतो त्यास **संधिप्रकाश** ह्मणतात. पृथ्वीवरील कोणत्याही स्थलीं सूर्य क्षितिजाखालीं असतां त्याचे किरण त्या स्थानीं प्रत्यक्ष पोंचत नाहींत परंतु तो क्षितिजाखालीं १८ अंशांच्या आंत असेल तर त्याचे किरण त्या स्थानाच्या डोक्यावरील वातावरणास पोंचतात, आणि तेथून ते त्या स्थानाकडे परावर्तन पावतात. ह्या रीतीनें त्या स्थानीं संधिप्रकाश पडतो. सूर्यास १८ अंश क्रमावयास जितका काळ लागतो तितका वेळ संधिप्रकाश असतो. विषुववृत्तावर तो ३ घटिका असतो; त्याच्या उत्तरेस व दक्षिणेस उत्तरोत्तर ही मर्यादा वाढते.

## वारे

वारे वाहण्याचें मुख्य कारण सूर्याची उष्णता होय. ती जेथें इतर प्रदेशांपेक्षां विशेष असते, तेथील हवा उष्ण होऊन वर जाते; व त्या स्थळीं इतर प्रदेशांतून थंड हवा येते. याप्रमाणें वारे उत्पन्न होतात. सूर्याच्या उष्णतेनें तापलेला प्रदेश विस्तीर्ण असतो, यामुळें विस्तीर्ण प्रदेशावर नियमित काळीं नियमित दिशेनें वारे वाहतात. हा नियम सामान्यतः असतो. अनेक कारणांनीं त्यांत फेरफार होतात.

**व्यापारवायु**.—उष्णकटिबंधांत उष्णता फार असते. यामुळें तेथील हवा उष्ण होऊन वर जाते, व त्या स्थळीं दोहों ध्रुवांकडली थंड हवा येते. सुर्य नेहमीं उष्णकटिबंधांत असतो, यामुळें उत्तरध्रुवाकडून व दक्षिणध्रुवाकडून नेहमीं विषुववृत्ताकडे वारे वाहतात. हे प्रथम दक्षिणाभिमुख व उत्तराभिमुख असतात. परंतु ध्रुवांकडे पृथ्वीच्या अंगीं दैनंदिन गतीचा वेग अगदीं थोडा असतो, तो विषुववृत्ताकडे जास्त होत जातो; व विषुववृत्तावर फार असतो. यामुळें हे वारे प्रथम ध्रुवाकडून निघतात, तेव्हां त्यांच्याही अंगीं मूळचा वेग थोडा असतो. ते पुढें जास्त वेगाच्या प्रदेशाकडे येतात तरी त्यांच्या अंगीं तितका जास्त वेग येत नाहीं. यामुळें ते मागें पडतात. कर्कवृत्तावर ते ईशान्येकडून व मकरवृत्तावर आग्नेयीकडून वाहतात. व विषुववृत्ताकडे येतात तसे ते नीट

पूर्वेकडून वाहूं लागतात. हे वारे बहुधा सतत एकाच दिशेनें वाहतात. अयन प्रदेशांत सर्वत्र पाणीच असतें तर ह्या वाऱ्यांच्या वाहण्यांत मुळींच फरक न होता. परंतु तसें नाहीं यामुळें फरक होतो. हिंदिमहासागरांत फारच फरक होतो. आटलांटिक महासागरांत त्याहून कमी व पासिफिक महासागरांत त्यापेक्षां कमी फेरफार होतो. ह्या वाऱ्यांस सतत वाहणारे किंवा नियत दिशेनें वाहणारे वारे ह्मणतात. हे नियमानें वाहतात, यामुळें व्यापाराचीं गलबतें हाकारण्यास सोईचें पडतें; म्हणून ह्यांस **व्यापावारयु** असेंही म्हणतात.

**अयनवायु.**—समुद्रापेक्षां जमीन जास्त व लवकर तापते. आशियाखंडाचा दक्षिणकिनारा विषुववृत्ताच्या लगत्यास आहे, व त्याच्या दक्षिणेस हिंदिमहासागर आहे. सूर्य विषुववृत्ताच्या उत्तरेस येतो तेव्हां हिंदुस्थान, पूर्वेकडील द्वीपकल्प, वगैरे प्रदेश हिंदिमहासागरापेक्षां फार तापतात. सूर्याच्या परम उत्तरायणाच्या सुमारास तो प्रदेश अतिशय तप्त होऊन तेथें दाक्षिणेकडील थंड वायु वाहूं लागतो. हा बहुधा नैर्ऋत्य दिशेनें वाहतो. व ह्या बरोबरच त्या प्रदेशांत पर्जन्य सुरू होतो. सूर्य दाक्षिण गोलार्धांत गेला ह्मणजे पुनः ईशान्य वारा वाहूं लागतो. ह्या वाऱ्यांस नियतकाल वाहणारे वारे म्हणतात. व हे सूर्याच्या गतीस अनुसरून वाहतात, म्हणून ह्यांस अयनवायु असेंही म्हणतात. हे हिंदिमहासागराच्या लगत्याच्या प्रदेशांत वाहतात.

**खारा वारा व मतलई.**—उष्णकटिबंधांत समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशांत सूर्योदयानंतर कांहीं तासांनीं समुद्रावरून जमिनीकडे वारा वाहूं लागतो; ह्मास खारा वारा म्हणतात. दिवस चढतो तसतसा ह्याचा जोर जास्त होतो. सुर्यास्तानंतर कांहीं वेळानें हा वारा बंद होऊन जमिनीवरून समुद्राकडे वारा वाहू लागतो. ह्मास **मतलय** म्हणतात. मध्यरात्रीच्या सुमारें मतलय जोरानें वाहूं लागते. ती सुर्योदयानंतर कांहीं वेळानें बंद होते.

पाण्यापेक्षां जमीन लवकर तापते. व तींतुन उष्णतेचें विसर्जनही लवकर होतें. दिवसास जमीन जास्त तापते तेव्हां समुद्राकडून जमिनीवर वारा वाहतो. रात्रीं पाण्यापेक्षां जमीन लवकर थंड होते, यामुळें जमिनीवरचा थंड वारा समुद्राकडे वाहतो.

वर सांगितल्या वाऱ्यांशिवाय दुसरे अनियत वाहणारे वारे पुष्कळ आहेत.

**मेघ, धुकें, पर्जन्य, दहिंवर, बर्फ, गारा ह्यांविषयीं.**

समुद्र सरोवरें वगैरे जलाशयांच्या पृष्ठभागाच्या पाण्याची सुर्याच्या उष्णतेमुळें वाफ होत असते, ह्या क्रियेस **बाष्पभवन** म्हणतात. साधारण हवेपेक्षां वाफ हलकी असते. व ती हवेंत मिसळली म्हणजे हवाही उष्ण व हलकी होते. वाफ प्रथम अदृश्य असते व उष्ण हवेसह वर जात

असते. ही वाष्पमिश्रित हवा जसजशी वर जाते तसतशी थंड होत जाते. कारण वातावरणाची उंची जस[illegible] जास्त तसें तें थंड असतें. उष्ण हवेंत थंड हवेपे[illegible] जास्त [illegible] शकते. वातावरणाचा भाग थंड हो[illegible] [illegible] त्यांतील वाफेचें धारण करण्याची त्याची शक्ति कमी होते. व त्यांत अदृश्य असलेली पाण्याची वाफ घन होऊन दिसूं लागते. ह्या क्रियेस **घनीभवन** ह्मणतात. ह्याप्रमाणें पृष्ठभागापासून उच्च प्रदेशीं मेघ (ढग) बनतात. ढग केवळ वाफेचेच नसतात. तर वाफ थिजून झालेल्या पाण्याच्या अतिसूक्ष्म अणूंचे बनलेले असतात.

**धुकें**.—मेघ व धुकें ह्यांचें स्वरूप एकच आहे. पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या जवळच वाफेचें घनीभवन झालें, किंवा मेघ जमिनीस येऊन लागले, ह्मणजे त्यांस धुकें म्हणतात.

पृथ्वीच्या पृष्ठभागापेक्षां तिच्या जवळचा वातावरणाचा थर थंड झाला ह्मणजे त्यांतील वाफेचें धुकें बनतें. हें पहांटेस व सकाळीं विशेष असतें. परंतु दिवस जसजसा जास्त येतो तसतसें तें वितळून त्याची पुनः वाफ होते.

**पर्जन्य**.—वाफेनें भरलेली हवा उच्च प्रदेशीं जाऊन तेथील उष्णतेचें मान कमी असल्यामुळें वाफ थिजून ढग बनतात. पुढें कदाचित् तें उष्णतामान आणखी कमी होतें; व मुख्यतः उच्च प्रदेशीं ढगांपासून उष्णतेचें विसर्जन पुष्कळ

होतें; व दुसऱ्या प्रदेशांतील गार वाऱ्यांचा ढगांशीं संयोग होतो; या कारणांनीं ढग जास्त घन व शीत होऊन त्यांतील जलरूप अणु मोठमोठे होत जातात. शेवठीं त्यांचे थेंब बनून पर्जन्यरूपानें खालीं पडतात.

विवक्षित स्थळीं पर्जन्य पडण्यास त्या जागेवरील उच्च प्रदेशीं पाण्याची वाफ असली पाहिजे किंवा दुसरीकडून आली पाहिजे. आशिया, युरोप, वगैरे भूप्रदेशावर पाणी थोडें असल्यामुळें बाष्पभवनानें वाफ थोडीच होते. परंतु समुद्रावर वाफ फार होते, ती वाऱ्यांच्या योगानें जमिनीवर येऊन पर्जन्य पडतो. ज्या प्रदेशांवर समुद्रावरील वाफेनें भरलेले वारे येतात त्या प्रदेशावर ते वारे सुटतात तेव्हां पर्जन्य पडतो. जेथें तसे वारे येत नाहींत, किंवा आले तरी फार अंतरावरून आल्यामुळें किंवा पर्वतादि अडथळ्यांनीं बाष्पहीन होऊन येतात,तेथें पर्जन्य फारसा पडत नाहीं.पूर्वगोलार्धांत उत्तरध्रुवाकडून जे वारे वाहतात, ते बाष्पहीन असतात. यामुळें त्यांणीं पर्जन्य पडत नाहीं. उष्णकटिबंधांत वाफ फार होते ह्मणून पर्जन्य फार पडतो; व तिकडून उत्तरेस वारे वाहतात त्यांबरोबर तिकडेही थोडाबहुत जातो. हिंदुस्थानांत नैर्ऋत्य वायूनें पर्जन्य पडतो. कांहीं आग्नेयवायूनेंही पडतो.

दाहिंवर—आकाश स्वच्छ असेल व हवा रूक्ष असली ह्मणजे सूर्यास्तानंतर व विशेषतः पहांटेस गवत झाडपाला

इत्यादिकांवर जे पाण्याचे बिंदु सांचतात, त्यास दहिंवर किंवा दंव ह्मणतात.

सूर्यास्तानंतर [illegible] आग [illegible] ती पृष्ठभागाजवळ [illegible] प्रथम वाफेचे पातळ थर गवत वगैरेवर जमतात. मग त्यां[illegible] पाणी होतें. ह्याप्रमाणें दहिंवर होतें. ज्यांतून उष्णतेचें विसर्जन जास्त होतें अशा पदार्थांवर दंव जास्त पडतें.

**बर्फ व गारा.**—आकाशांत वाफेचें घनीभवन होतांना तिला अत्यंत थंड वारा लागून ती एकदम थिजून तिचे पिंजलेल्या कापसाप्रमाणें फार पातळ पापद्रे जमिनीवर पडतात त्यास हिम किंवा बर्फ ह्मणतात. कधीं बर्फाचे मोठे गोळेही आकाशांतून पडतात. थंड देशांत बर्फ फार पडतें. उष्ण देशांत तें उंच पर्वतांवर मात्र पडतें.

उष्ण देशांत कधीं कधीं मेघांतून बर्फाचे लहान लहान तुकडे जमिनीवर पडतात त्यांस गारा ह्मणतात. मोठमोठे पाण्याचे थेंब उंच ढगांपासून पडत असतां मध्यें थंड हवेशीं त्यांचा संयोग होऊन ते गोठून त्यांच्या गारा बनतात.

Y . P . Nimak

॥ श्री ॥

# सार्वजनिक व्यथापरित्राण

## भाग १ ला.

हें पुस्तक

जुने ग्रंथ व नवीन शोध छापून प्रसिद्ध करणाऱ्या मंडळीनें

पुणें ' जगद्धितेच्छु ' छापखान्यांत छापिलें.

तारीख २० माहे एप्रिल सन १८८८ इसवी.

# जाहिराती.

मुंबई येथें. रामवाडीच्या नाक्यावर काशिनाथ वासुदेव खांडेकर यांच्या पुस्तकें विकण्याचे दुकानीं सर्व प्रकारचीं संस्कृत, मराठी, इंग्लिश, गुजराथी वगैरे पुस्तकें माफक दरानें विकत मिळतात. कोणतेंही पुस्तक पाहिजे असल्यास व्हालुपेएबल पार्सलनें पाठविण्यांत येतें पत्र पोष्टपेड पाठवावें. पैसे पाठविणें ते मनीआरडरनें किंवा पोष्टाच्या टिकिटानें पाठवावे. व्यापारी लोकांस कमिशन दिलें जाईल. पत्र येतांच बंगी रवाना केली जाईल.—

## रामबाण औषधें.

१ गर्मी, चट्टे, पर्मा, गांधी, इ. सर्व विकार तोंड न येतां बारा दिवसांत खास जातात. डबी किंमत २ रु.

२ गजकर्ण, खरूज, नायटे, आगपइण, इ. सर्व विकार तीन दिसांतच जातात. डबी. ८६ आणे.

३ चातुर्थिक, तृतीयक, द्वितीयक, ऐकाहीक. इ. हिमज्वर चार पाळ्यांत व हाडी ताप १४ दिवसांत जातोच ! डबी २ रु.

४ स्त्रियांची तांबडी, पांढरी, मिश्रधुपणी, मूळव्याधी, पुरपांचा धातुविकार, मुलांची खर इ, सर्व विकार आठ दाहा दिवसांत बरे होतात. डबी १ रु.

५ मलम. हें चोळतांच, छिद्रानीं शरिरांत खोल भिनन त्वचा,

मराठी ग्रंथ संग्रहालय
२२०

# प्रस्तावना.

आलीकडे प्राकृत भाषेंत वैद्यक विषयावर वरीच पुस्तकें तयार झालीं आहेत; परंतु लोकांस त्यांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं, एवढेंच नव्हे, तर वैद्यास सुद्धां होत नाहीं. याचीं कारणें दोन आहेत. १ लें, पुस्तकांची किंमत फार असल्यामुळें जसा लोकांत त्यांचा प्रसार व्हावा तसा होत नाहीं. कारण, हिंदुस्थान लुटलें गेलें आहे ह्मणून पैसा नाहीं; व २ रें कारण असें आहे कीं, जीं कांहीं पुस्तकें छापलीं जात आहेत, त्यांतील औषधें खेडगांवांत दुर्मिळ असल्यामुळें तीं औषधें तयार करण्यास खर्च फार येऊन मेहनतही अतिशय लागते. तेणेंकरून त्यापासून लोकांस जसा उपयोग व्हावा तसा होत नाहीं. वैद्य त्यांचा उपयोग करूं लागल्यास जिनसांचीं नांवें त्यांच्या माहितींतलीं नसतात. किंवा ज्या वनस्पती सांगितल्या असतील, त्या कांहीं कोंकणांत, व कांहीं देशांत अशा असतात; तर या जिनसा गोळा व्हाव्या कशा? जिनसा मिळविण्यास खर्च येतो किती याचा विचार करूं लागल्यास हीं पुस्तकें केवळ संग्रहास ठेवण्यापुरतीं आहेत, व उपयोगांत आणण्यास कुचकामाचीं आहेत असें दिसून येतें; तर हीं व इतर कारणें दूर करून प्रत्येक खेड्याच्या

लोकांसही उपयोगी पडतील अशीं औषधें ह्मणजे जिनसा ताब-इतोब चार पांच कोसांचे आंत मिळण्यासारख्या असून थोडक्या आयासानें औषध रोगावर उपयोगी पडेल अशा हरएक प्रकारच्या रोगांवर यांत उपाय सांगितले आहेत.

ग्रंथकर्ता,
अण्णासाहेब पवार.

२११ ठेवुस्नि ... नं ... ता. २८

# सार्वजनिक व्यथापरित्राण.

## मंगलाचरण.

ज्याचे चरण निरंतर वंदन करणारा जो सदाशिव त्याच्या जटेंतील गंगेच्या चंचल लहरीमध्यें रक्तवर्ण कमलासारिखे शोभतात, व स्वभावतः सुंदर, आणि लक्ष्मीचें केवळ प्रीतिपात्र, असें जें नीलवर्ण व अनिर्वाच्य विष्णुरूप तेज, तें तुमचें कल्याण करो.

हे भगिनी, ज्याचे प्रसादानें मी एका घटिकेंत कर्णास मधुर असे शंभर श्लोक करितों, व स्त्रियांमध्यें रत्न, भक्तांचे दृष्टीस आल्हाद उत्पन्न करणारें व सप्तशृंगनामक पर्वतावर वास करणारें, दशभुजांनीं मंडित असें जें प्रसिद्ध शंकराचें भाग्य ( पार्वती ) त्याजप्रत नमन करितों.

सूर्याच्या, व ब्रह्मा, शिव, विष्णु, पार्वती, गजानन, धन्वंतरी. यांचे प्रसादें करून रोग्यास आरोग्य व्हावें या इच्छेनें मी हा संक्षिप्त **सार्वजनिक व्यथा-परित्राण** नामक ग्रंथ रचितों.

जरी ग्रंथास दोष देणारे विक्षिप्त व दुर्जन बहुत आहेत, तरी त्यांस न भितां मी हा ग्रंथ करितों, जसे चोरांचे भयामुळें लोक आपली संपत्ति गुप्त ठेवून भिकाऱ्याप्रमाणें वागत नाहींत.

ज्या पुरुषांचें अंतःकरण स्त्रियांकडे आसक्त नाहीं, व ज्यांस शृंगार रसाची गोडी नाहीं, ते हा ग्रंथ करण्याचे माझे श्रम

काय जाणतील? जसे अंधळ्यापुढें वेश्येनें पुष्कळ हावभाव दाखविले असतां ते सर्व व्यर्थ होतात.

गुरूपासून सर्व वैद्यशास्त्र पढलेला, पक्षहस्ती, वमनरेचनादि क्रियांविषयीं विचक्षण, निर्लोभी, धैर्यवान्, कृपाळू, शुचिर्भूत, निष्कपटी व सत्यवादी, असा वैद्य औषध देण्यास योग्य आहे.

रोग्यांनीं मूर्ख वैद्यांचें औषध घेऊं नये. त्यापासून गुण येणें तर दुर्लभच, उलट अपकार मात्र होतो. याजकरितां जसे कुलीन पुरुष व्यभिचारिणी स्त्रीचा त्याग करितात, तद्वत् मूर्ख वैद्यांचा त्याग करावा.

प्रथम सूक्ष्म दृष्टीनें रोग्याच्या मूळ कारणाचा निश्चय करावा, नंतर साध्यासाध्य विचार करावा. साध्य किंवा याप्य असल्यास विचार करावा. असाध्य असल्यास सोडावा.

रोग्यानें पथ्य अवश्य करावें. कारण पथ्य केलें असतां औषधावांचूनही रोग बरा होतो. व पथ्य न करणारास औषध व्यर्थ होतें.

जसें क्षारोदक मेघानें स्वीकृत केलें असतां मधुर होतें तद्वत् ही माझी वाणी जरी स्वभावतः नीरस आहे, तथापि वैद्यांनीं व इतरांनीं अंगीकार केला असतां सुरस होईल.

## शुभ शकुन सांगतों.

पुरुषजाति डावे बाजूनें गेला असतां चांगला, परंतु हत्ती आणि खेचर हे खेरीज करून, तशीच स्त्रीजाति उजवे बाजूनें गेली असतां चांगली, परंतु कोल्हीं व महिषी ह्यांखेरीज करून

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्वकम
अनुक्रम ........ दि .........
क्रमांक ......... ३ ........ दि ........

छत्र, गाय, ब्राह्मण, कन्या, मांस, मद्य, वेश्यास्त्री, गोरोचन, मांगल्यपदार्थ, तूप, घोडा, हत्ती, दहीं, स्तोत्रादिकांचा पाठ, करुणा, भयानक आणि रौद्र या रसांनीं रहित व स्मरक्रीडांचे भावांनीं रम्य असें गायन, चालकें, उत्तमयोगी, इतके शकून शुभदायक आहेत असें जाणावें. ह्या शुभदायक शकुनांमध्यें हत्ती डावे बाजूस वाईट असें मागें सांगितलें तें समोर शुभदायकच आहे.

## नाडीपरीक्षा.

वातरोगाची नाडी वांकडी चालते. पित्तरोगाची चंचळ असते. कफरोगाची स्थिर चालते. वातपित्त उभयात्मकाची सर्पासारिखी चालते. कफपित्तात्मकाची हंसासारिखी. कफवातात्मकाची बेडकासारिखी चालते. खंडगति व सूक्ष्मगति अशी विषमरोगाचे ठायीं असते. सन्निपाताचे ठायीं अलक्ष्य ह्मणजे तिची गति बरोबर कळत नाहीं.

वायुरोगाची नाडी वक्र, पित्तरोगाची चपळ, कफरोगाची स्थिर, तशीच द्वंद्वज आणि सन्निपात या रोगांची स्थिर असते.

काष्ठ फोडणारा जसा वेगानें काष्ठ फोडतो, तशी राहून राहून चालणारी नाडी सन्निपातामध्यें होते.

अत्यंत मंद, फार शिथिल, व्याकुल, राहून राहून चालणारी, सूक्ष्म, नाश पावणारी, खांद्याचेठायीं स्फुरण पावणारी, पुनः अंगुलीचे ठायीं स्पर्श करणारी, अशी जी नानात-हांची नाडी सन्निपाताचे ठायीं असते ती असाध्य. प्रातःकाळीं नाडी कफयुक्त असते.

मध्यान्हीं पित्तयुक्त, अपराण्हीं वातयुक्त, पुनः मध्यरात्रीस पित्त-युक्त याप्रमाणें अहोरात्र जाणावें.

## मूत्रपरीक्षा.

वात, पित्त, कफ आणि सन्निपात ह्मणजे तिन्ही दोष मिश्र झालेले, या दोषानुक्रमें करून तांबडें, पिवळें, पांढरें व काळें असें मूत्र होतें. द्विदोषानें मूत्र कसें होतें त्याचें लक्षण. वातपित्तानें धुम्रवर्ण, वातकफानें फेसट, पित्तकफानें तांबड असून पांढरें.

प्रातःकाळीं मोठ्या पहाटेस कांचेचे किंवा कांशाचे पात्रांत पहिली व शेवटची धारा सोडून मधली धारा धरून त्यांत तेलाचा बिंदु टाकून साध्यासाध्य विचार करावा.

वातानें पातळ छायेसारखें पसरतें, पित्तानें बुडबुडे येतात. कफानें स्वच्छ प्रभा पडते तसें दिसतें. असाध्य असेल तर तळास जातें.

तेल टाकतांक्षणींच विकास पावलें ह्मणजे रोग साध्य असें बहुतकरून समजावें. जर उंचवणा असेल तर कष्टसाध्य, आणि जर तळास गेलें तर रोगी मरेल; जरी महादेव औषध देईल तरीही वांचणार नाहीं असें जाणावें.

## कालज्ञान.

अरुंधती, ध्रुव, विष्णूचीं तीन पदें, चवथें मातृमंडल हे चार पदार्थ ज्याचें आयुष्य संपलें असेल तो पहात नाहीं. आतां अरुंधती इत्यादिक चार पदार्थांचा अर्थ सांगतों.

अरुंधती ह्मणजे जिव्हा. ध्रुव ह्मणजे नासिकेचें अग्र (ना-

काचा शेंडा; ) विष्णु दोन भिंवयांमध्यें असें सांगितलें, तेव्हां अर्थात् दोन भिंवयांचा मध्य हींच विष्णूचीं तीन पदें. आणि दोन भिंवया हें मातृमंडळ या प्रकारें जाणावें.

नाकाचा शेंडा, भिंवया, जिव्हा, मुख इतकीं जो पहात नाहीं, आणखी कान दाबून धरले असतां आंत जो शब्द होतो तो ज्याला ऐकूं येत नाहीं तो यममंदिराप्रत जाईल.

जिव्हा इत्यादिक सांगितले त्यांचे दिवसांचा नियम सांगतों. भ्रूकुटी पहात नाहीं, तो नऊ दिवसांनीं मरेल. याच रीतीनें भ्रूकुटी, मध्य, कर्णघोष, नासिकाग्र, जिव्हा यांचा क्रमेंकरून पांच, सात, तीन, एक, हा दिवस-नियम जाणावा. हें काळचिन्ह दररोज पहावें.

जो अकस्मात् शरीरानें जाडा किंवा पातळ होतो आणि ज्याची प्रकृति अकस्मात् बदल होते, ह्मणजे रागीट असला तर शांत किंवा शांत असला तर रागीट याप्रमाणें प्रकृतीनें बदल झालेला तो सहा महिन्यांनीं मरण पावेल.

जिव्हा काळी, मुख तांबडें, जिव्हेला स्पर्श कळत नाहीं अशा मनुष्याचें वांचणें कठिण.

पाहणें सौम्य, भाषण यथास्थित, हात, पाय गार नाहींत, दाह थोडा, तोंडास रुची, जिव्हा मऊ, नाकांतला श्वास सरळ वाहतो, ज्यांत घाम नाहीं असा ज्वर इतकीं लक्षणें ज्या रोग्यास असतील तो रोगी साध्य व कोणालाही चिकित्सा करण्यास योग्य होय.

अग्नि हा बळाला कारण आहे, आणि वीर्य हें वांचण्याला कारण, यासाठीं मनुष्याचा अग्नि व शुक्र ( धातु ) हीं सर्व प्रयत्नानें रक्षावीं.

## ऋतुप्रकोप.

मार्गशीर्ष, पौष, माघ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, या सहा महिन्यांत वायु राजा असतो ह्मणजे या महिन्यांत वायूचा प्रकोप असतो. तसा आश्विन, कार्तिक, वैशाख, जेष्ठ, या चार महिन्यांत पित्ताचा प्रकोप. तसाच फाल्गुन, चैत्र या दोन महिन्यांत सर्व जंतूंला पीडा करणारा कफराजा सांगितला ह्मणजे कफाचा प्रकोप असतो.

दिवसास झोंप घेणें, गोड, थंड, मत्स्य, मांस, जड, अंबट, चिकट, बुळबुळीत, तीळ, ऊंस, दुधापासून झालेला पदार्थ, ओशट इतक्यांचे भक्षणानें, पोट भरल्यावर ज्यास्ती खाणें, मीठ, उदक हीं फार सेवन करणें, विरुद्ध भक्षण ह्मणजे दुधावर पाणी पिणें इतक्या कारणांनीं कफ कुपित होतो आणि वसंतऋतूमध्यें-ही होतो.

हेमंत, वर्षा, शिशिर या ऋतूंमध्यें वायु कुपित असतो. शरत्, ग्रीष्म या ऋतूंमध्यें पित्त कुपित असतें. वसंतऋतूमध्यें कफ कुपित असतो. यांना विहित यत्न असेल तो करावा.

कफ कुपित झाला असतां, ओकारी येण्याचें औषध आणि नस्य हें घ्यावें. पित्ताचा विकार झाला असतां रेचन घ्यावें. पात-

रोगाला बस्तिकर्म किंवा रेचन हा उपाय करावा. आणि जर दोन दोषांचा विकार असेल, तर दोन्ही उपाय करावे; ह्मणजे वातपित्त आहे तर बस्तिकर्म आणि रेचन; जर कफपित्त आहे तर; वमन व रेचन; आणि कफवात आहे तर वमन आणि बस्तिकर्म.

## नस्य.

आल्याचे रसांत गूळ घालून नाकांत घालावा, अथवा पिंपळी आणि सैंधव पाण्यांत उगाळून नाकांत घालावें. ह्याला नस्य असें ह्मणतात. हें नस्य नाक, तोंड, मान, हनुवटी, बाहु, पाठ, डोकें, डोळे, गळा, आणि कान इतक्या ठिकाणीं रोग झाला असतां करावें.

नस्य जेवल्यावर किंवा स्नान केल्यावर लागलेंच घालूं नये, आणि नस्य घातल्यावर डोक्यावरून स्नान करूं नये. केलें असतां रोगादिक उत्पन्न होतील.

## ज्वरादि.

मिथ्या आहार, विहार ह्मणजे अकाळीं खाणें किंवा शक्तीपेक्षां अधिक खाणें हा मिथ्या आहार आणि शक्तीपेक्षां अतिव्यायाम करणें किंवा अति फिरणें हा मिथ्या विहार. या मिथ्या आहार विहारेंकरून आमाशयाचा आश्रय करून असणारे जे दोष ते जठराग्नीला बाहेर काढून रसधातुगत होऊन ज्वर उत्पन्न करितात.

संपूर्ण रोगाला मल (वात,पित्त,कफ) कुपित होणें हें कारण आहे.

अति पाणी पिणें, अकालीं अति खाणें, दिवसास निजणें, रात्रीस जागणें, मूत्र, मल यांचा अवरोध करणें या सहा प्रकारांनीं रोग उत्पन्न होतात.

## वातज्वरोपचार.

हिरडा, बेहडा, आंवळकाटी, सुंठ, मिरें, पिंपळी, गूळ, साखर, हीं सर्व एकेक भाग आणि तेंड अर्धाभाग घेऊन यांचा लाडू करून खावा. नंतर ऊन पाणी प्यावें; ह्मणजे कुक्षिशूळ, अरुचि, खोकला, वात, ज्वर हे दूर होतात.

## पित्तज्वरलक्षणोपचार.

नुसताच पित्तपापड्याचा काढा पित्तज्वराचा नाश करील, मग चंदन, वाळा, सुंठ यांणीं युक्त केला असतां नाश करील यांत काय संशय आहे !

भुईकोंहळा, डाळिंब, लोध्र, कवठ, महाळुंग इतकीं वांटून तृषा व दाह यांनीं जो पीडित झाला असेल त्याच्या मस्तकास लेप करावा.

उंबराच्या मुळ्या व गुळवेल यांचा काढा साखर घालून घ्यावा अथवा कडू पडवळाचा काढा अथवा बडीशेपेचा काढा घ्यावा ह्मणजे पित्तज्वराचा नाश होईल; अथवा उंबराची मुळी कापून, त्यांतून जें पाणी निघेल त्यांत साखर घालून तें प्यावें.

## श्लेष्मज्वरोपचार.

लक्षणें:—डोळ्यांस पाणी, गळा दाटलेला, श्वास, तोंड खारट,

हातापायांना दाह, बद्धमूत्र मस्तक जड, शोष, शरीराच्या संधीला त्रास, अंग जड, अस्वच्छता, घाम फार थोडा.

पिंपळी, पिंपळमूळ, चवक, चित्रक, सुंठ हें पंचकोल असें सांगितलें आहे. हें शोधन कफनाशक आहे. हेंही कफज्वरावर योग्य आहे.

## सन्निपातज्वरोपचार.

**लक्षणें**:—खोकला, श्वास, मोह, अरुचि, भोंवळ, कृशता, कानांत शब्द होणें, निद्रानाश, अतितृषा, पोट अत्यंत जड, डोकें, संधि, हाडें यांचे ठायीं पीडा, क्षणांत दाह, क्षणांत थंडी, नेहमीं गळ्यांत शब्द, डोळ्यांना गळती असून कुटिल व अतिलाल आणि बडबड.

सात, दहा किंवा बारा दिवसांनीं सन्निपात ज्वर अति भयंकर होऊन शांत होतो किंवा मारतो.

बचनाग एक भाग, मिरें तीन भाग, रानशेणीचें भस्म सोळा भाग, या तिहींचें चूर्ण एकत्र करून, धोत्र्याचे रसांत भिजवून वाळवावें आणि अंगास लावावें ह्मणजे शैत्य व घाम दूर होतात.

## विषमज्वरोपचार.

ज्वर निघालेल्या मनुष्यास कुपथ्यापासून अल्पदोष उत्पन्न होतो व तो सात धातूंपैकीं कोणत्या एका धातुप्रत प्राप्त होऊन विषमज्वर उत्पन्न करितो.

गुग्गुळ काळे फडक्यांत बांधून त्याला बुनडाचे शेंपटीचा द्यावा; ह्मणजे चातुर्थिक ज्वराचा नाश होईल.

निर्गुंडीचे झाडाचें मूळ रात्रीं येणाऱ्या ज्वराचें नाशक आहे. तशीच दुर्वीची मुळी कानांत ठेविली असतां नेमलेल्या वेळीं येणाऱ्या ज्वराचा नाश होतो.

अतिव्यायाम ह्मणजे श्रम करणें, मैथुन, स्नान, फिरणें इतकीं ज्वरापासून मुक्त झालेल्या मनुष्यानें चांगली शक्ति येईपर्यंत करूं नयेत.

## शीतांकुश.

पिंपळाची सेवा, होम, मंत्र, जप, सांत्र, ब्राह्मण व गुरुजन यांची पूजा, विष्णुसहस्रनामपाठ, मणिधारण, दान, तापसांचे आशीर्वाद इतकीं अष्ट प्रकारचीं ज्वरांना अरिष्टें आहेत; ह्मणजे त्यांचीं नाशक आहेत.

**समुद्रस्योत्तरे तीरे द्विविदो नाम वानरः ॥**
**तस्य स्मरणमात्रेण ज्वरो याति दिगंतरम् ॥**

ह्या मंत्राचा जप करावा ह्मणजे ज्वर जातो.

## अतिसारलक्षणोपचार.

सुंठ, अतिविष, नागरमोथा, किराईत, गुळवेल व कुडा यांचा काढा सर्व ज्वर आणि सर्व अतिसार यांचा नाशक आहे.

स्नान, अभ्यंग, बुडी मारणें, गुरु किंवा स्निग्ध भोजन, व्यायाम, शोक घेणें इतक्या गोष्टी अतिसारी मनुष्यानें वर्ज कराव्या.

वावाडिंग, अतिविष, नागरमोथा, देवदारू, पहाडमूळ, कुडा, मिरें यांचा काढा शोथातिसारनाशक आहे.

## संग्रहणीलक्षणोपचार.

चित्रक, पिंपळमूळ सज्जीखार, जवखार, मीठ, शेंदेलोण, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, हिंग, ओंवा, चवक हीं एकत्र कुटून महाळुंगाचे किंवा डाळिंबाचे रसांत गोळ्या करून शक्त्यनुसार खाव्या ह्मणजे आमाचें पाचन आणि मंदाग्नीचें दीपन होईल.

पोट फुगलें असल्यास बिडलोण, ओंवा ऊन पाण्याबरोबर खावा.

## अर्शलक्षणोपचार.

पृथक् दोषांनीं ह्मणजे वातानें, पित्तानें किंवा कफानें आणि समस्त ह्मणजे वातपित्तकफ या तिहीं दोषांनीं, आणि रक्तापासून, सहज ह्मणजे जन्म होण्याबरोबर झालेली अशी सहा प्रकारची अर्श- ह्मणजे मूळव्याध आहे. गुदाचे ठिकाणीं तीन वळ्या आहेत. त्यांचे ठायीं ती होते. त्या तीन वळ्यांचीं नावें **प्रसारिणी, सर्जनी**, आणि **ग्राहिका** अशीं आहेत.

सहा प्रकारची मूळव्याध सांगितली आहे. त्यांपैकीं रक्तापासून आणि सहज जी मूळव्याध ह्मणजे मोड असतात ते बहुतकरून गुदाचे आंतले वळीला असतात.

एक दोषानें जे मोड येतात ते बाहेरचे वळीला असून ते साध्य असतात, आणि द्विदोषांपासून अथवा त्रिदोषांपासून जे मोड येतात ते असाध्य जाणावे.

मूळव्याध, अतिसार, संग्रहणी हे रोग परस्पर कारणभूत आहेत. ह्मणजे मूळव्याधीपासून संग्रहणी होते, किंवा संग्रहणीपासून मूळव्याध होत याप्रमाणें जाणावें. हे रोग अग्नि मंद असल्यामुळें होतात. आणि अग्नि दीप्त असतां होत नाहींत यासाठीं विशेषेंकरून अग्नि प्रदीप्त राखावा.

मूळव्याध बरी होण्यास उपाय चार प्रकारचे सांगितले आहेत. एक, औषध; दुसरा, क्षार लावणें; तिसरा, शस्त्रानें कापणें; चवथा, अग्नीनें भाजणें. हा व्याधि याप्य आहे ह्मणजे जोंपर्यंत उपाय सुरू आहेत तोंपर्यंत बरा असतो. उपाय बंद केले ह्मणजे पुनः उद्भवतो. निःशेष जात नाहीं.

तीळ, चित्रा, हिरडा, गूळ हीं समांश घेऊन गोळी करून शक्तीप्रमाणें खावी; ह्मणजे मूळव्याध, श्वास, खोकला, पानथरी, पांडुज्वर यांचा नाश होतो.

मालकांगोणीचें बीं वांटून लेप करावा; ह्मणजे रक्तापासून झालेली मूळव्याध दूर होते.

सुरणाचा कांदा पुटपाकेंकरून पक्क करावा. आणि शिरसाचें तेल व गूळ यांजबरोबर खावा. म्हणजे मूळव्याधीचा विकार दूर होतो.

आघाड्याचें बीं तांदुळाचें धुवणांत वांटून प्यावें, म्हणजे रक्ताचे मूळव्याधीचा नाश होईल.

लोणी, साखर, नागकेशर हीं एके जागीं वांटून प्यावीं; म्हणजे रक्तमळव्याध जाईल.

रुईचा चीक, निवडुंगाचें कांडें, कुटकी, कडू भोंपळ्याचे पल्लव, करंजाचे बीयांचा चोकडाचे मुतांत लेप मूळव्याधीवर श्रेष्ठ आहे.

गुंज, सुरण, कोंहळ्याचें बीं हीं पाण्यांत वांटून वस्त्राचे वातीनें लेप करावा. वात गुदांत ठवावी; मूळव्याधीचा नाश होईल.

मनुष्याचे केश, सर्पाची मेंग, आणि मांजराचें कातडें, रुईनें मूळ, शमीचीं पानें यांची धुरी मुळव्याधीस हितावह आहे.

ज्याला वायूचा रोग असेल त्याणें अन्न न खातां तक्र पिऊन रहावें. आपल्या शक्तीच्या व बलाच्या प्रमाणानें ७, १०, १२ किंवा ३० दिवसपर्यंत तक्र प्यावें; ह्मणजे वायूचा विकार मोडेल.

वडाचीं पानें जाळून राख करावी व ती राख तेलांत खलून मूळव्याधीस लेप करावा; ह्मणजे मूळव्याध जाईल.

टेटु, दालचिनी, चित्रक, इंद्रजव, करंजाचें बीं, सैंधव, सुंठ यांचें चूर्ण मठ्ठ्याबरोबर सात दिवस प्यावें, म्हणजे मुळासहित मूळव्याध गळून पडेल.

कोकंबाचें पंचांग ह्मणजे मूळपानें फलांसहित झाड ८० मासे, बिब्याचा मगज ह्मणजे गोडंब्या ४० मासे, मिरें ४० मासे यांचें चूर्ण कर्षप्रमाण ह्मणजे १० मासे खावें, ह्मणजे आंतले बाहेरले मोड नाश पावतील.

वेगाचा अवरोध, स्त्रीसंग, अश्वादिकांवर बसणें, उकिडवें बसणें व ज्या दोषांची मूळव्याध असेल तो दोष करणारें अन्न इतक्या गोष्टी मूळव्याधीला वर्ज कराव्या.

## विषुचीवर उपाय.

केशर, अफु, मेण, समभाग खलून तांदुळाप्रमाणें गोळी प्रत्येक तासास मधांतून बलाबल पाहून द्यावी.

## कृमिलक्षणोपचार.

नागरमोथा, उंदीरकानी, इंद्रजव, देवदारु, शेवगा यांना काढा पिंपळी व वावाडिंग यांचें चूर्ण घालून प्यावा; ह्मणजे दोन्ही द्वारांनीं फार दिवस पडणारे जंत असले तरी त्यांचा आणि त्यांपासून झालेल्या रोगांचा नाश होतो.

कापूर व गूळ या दोहोंची गोळी सकाळीं व सायंकाळीं खाल्ली असतां जंत पडतात.

उंदीरकानीचीं पानें कुटून चूर्ण करून त्यांत पीठ मिश्रण करून त्याचे घारगे करून खावे; आणि वरतीं सातूंची कांजी प्यावी; ह्मणजे कृमिनाश होतो.

## पांडुरोग–लक्षणोपचार.

भिंवया, नेत्र, गुद, पाय, बेंबी, गुह्य इतक्या ठिकाणीं सूज, विवर्णता ह्मणजे निस्तेजपणा, बल, अग्नि यांचा नाश, कृशताग्नि, गुदावाटे रक्त पडणें हीं पांडुरोगाचीं लक्षणें जाणावीं.

आंवळयाचा रस स्वच्छ १०२४ तोळे शिजत ठेवावा. त्यांत पिंपळीचें चूर्ण ६४ तोळे, ज्येष्ठमध ८ तोळे, काळीं द्राक्षें चिया काढून कुसकरून ६४ तोळे, सुंठ ८ तोळे, वंशलोचन ८ तोळे, साखर २०० तोळे, इतके पदार्थ टाकून घट्ट झाल्यावर उतरावा; नंतर त्यांत

१४तोळे मद्य घालून ठेवावा. ४ तोळेप्रमाणें खावा ह्मणजे हलीमक कामला पांडुरोग हे जातील.

सात, गहुं, शाली यांचें अन्न अरण्यसंबंधी जें मांस त्याच्या रसांनीं युक्त किंवा मूग, तुरी, मसुरा इत्यादिकांनीं युक्त जें भोजन तें कामलावान पांडुरोग्यांस युक्त होय.

पांढरे गोकर्णीचा रस, किंवा दारुहळद, तुरटी, आंवळकटी यांचें अंजन कामलानाशक आहे.

रुईचें मूळ तांदुळाचे धुवणांत उगाळून नाकांत घालावें; ह्मणजे कामलेचा नाश करील.

## रक्तपित्तलक्षणोपचार.

ऊर्ध्वद्वारानें, अधोद्वारानें अतिरक्त पडतें, तसेंच रोमरंध्रावाटें पडतें; आणि शीताकांक्षा, अरुचि, ओकारी, अशीं ज्यांत लक्षणें होतात, त्याला रक्तपित्त असें म्हणतात. जें उर्ध्वद्वारांनीं जातें तें कान, नेत्र, नाक आणि तोंड यांपासून जातें तें साध्य. आणि जें अधो द्वारांनीं जातें तें लिंग, योनि, गुद या वाटें जातें तें कष्टसाध्य; आणि एकदांच खालचे वरचे द्वारांनीं जातें तें असाध्य असें जाणावें.

ऊर्ध्वमार्गानें रक्त जाणारें असेल तर रेचन द्यावें आणि अधोमार्गानें रक्त जात असेल तर वमन द्यावें.

डाळिंबाचे फुलांचें किंवा दूर्वांचे रसाचें किंवा आंब्याचे कोइचे रसाचें किंवा कांद्याचे रसाचें नस्य करावें; ह्मणजे नाकांतून रक्त पडणें बंद होईल.

वाळा, धने, सुंठ, चंदन, ज्येष्ठमध, अडुळसा, काळा वाळा, यांचा काढा साखर व मध घालून प्यावा. ह्मणजे रक्त, पित्त, तृषा, दाह, ज्वर हे दूर होतात.

अडुळसा, मनुका, हिरडा, यांचा काढा साखर, मध आणि पिंपळीचें चूर्ण घालून प्यावा ह्मणजे श्वास, रक्तपित्त यांचा नाशक आहे.

पिकलेलें उंबराचें फळ, शिवणीचें फळ, हिरडा, खजूर, मनुका, यांतून कोणतेंहि एकादें फळ, मधाबरोबर खाल्लें असतां रक्तपित्त नाशक आहे.

उंबराचीं पिकलेलीं फळें गुळाबरोबर किंवा मधाबरोबर खाल्लीं असतां नाकांतून पडणारें रक्त बंद होतें.

शेळीच्या दुधांत केशर शिजवून प्यावें आणि शेळीच्या दुधाबरोबर भात खावा ह्मणजे ऊर्ध्व रक्त बंद होईल.

ज्येष्ठमध व दूध यांचा काढा करून थंड झाला ह्मणजे त्यांत साखर व मध घालून प्यावा; ह्मणजे रक्तपित्ताचा नाश करील.

रक्ताच्या गांठी वळल्या असतां मधाबरोबर पारव्याची विष्टा खावी.

ज्यांच्या अंगांतून फार रक्त गेलें असेल त्याणें मधाबरोबर केशर खावें, अथवा ब्राह्मणव्यतिरिक्तानें रक्तच प्यावें.

तांदुळ साठसाळीचे, नाचणी, वरी, हरबरे, मूग, मसुरा, सांवे, राळे इतकीं धान्यें रक्तपित्ती मनुष्यास भोजनास योग्य आहेत.

## राजयक्ष्मलक्षणोपचार.

दैन्य, खोकला, मद, आंग दुखणें, ओकारी, कफ, अतिश्वास, तालुस्थानीं शोष, अग्निमांद्य, वारंवार खांकेरे टाकणें, अंगास टणका लागणें, हातापायांचा दाह, स्वर बदलणें, जडपणा, उचकी, ज्वर, मळ पातळ होणें, ग्लानी, पडसें, आणि अरुचि, या लक्षणांनीं युक्त राजयक्ष्मा ( क्षयरोग ) असतो.

थोडे लक्षणांनीं युक्त अग्निप्रदीप्त, कृश नाहीं, इंद्रियें स्वाधीन ठेवणारा, असा जो क्षयरोगी तो साध्य व तोच उपचार करण्यास योग्य आहे.

पूर्वीं या रोगांत सर्व धातु क्षीण होतात; नंतर मनुष्य क्षीण होतो; ह्मणून याला क्षय ह्मणतात. आणि ज्याला क्षय होतो तो क्षयी; हा तरुण आणि चांगले वैद्यांनीं उपचार केलेला, फार वांचला तर सहस्र दिवसपर्यंत वांचेल.

मनुष्याचें बळ, शरीरांत मळ तोंपर्यंत आहे, आणि शुक्र वीर्य आहे तोंपर्यंत जीवित आहे. यासाठीं मनुष्यानें रेत आणि मळ यांचें रक्षण करावें.

क्षयानें शुष्क जो मनुष्य त्याचें पुरीष प्रयत्नानें रक्षण करावें, ह्मणजे वेतानें थोडें शौचास होईल असा उपाय करावा. कारण सर्व धातूंच्या क्षयानें पीडित जो मनुष्य त्याला पुरीषबल ( मळ ) हेंच बल आहे.

पिंपळी, मनुका, साखर, मध आणि शिरसांचें तेल, यांचा ले-

ह क्षयनाशक आहे. आणि मध, तूप, आस्कंद, पिंपळी, साखर यांचा लेह क्षयनाशक आहे.

वांगें, कारलें, तेल, बेलफळ, मोहऱ्या, मैथून, दिवसास झोंप. इतकीं क्षयी मनुष्यांनीं वर्ज करावीं.

खडीसाखर, मध, लोणी एकत्र करून खावें, अथवा तूप आणि मध एकत्र करून खावें. (मध व तूप हीं समभाग नसावीं) वरतीं दूध प्यावें; ह्मणजे पुष्टी येते.

कोंहळ्याचे गिराचा रस काढून त्यांत लाखेचें चूर्ण सुमारें दोन तोळे टाकून प्यावें; ह्मणजे रक्तक्षय होणार नाहीं.

धने, सातू, गहूं, मूग, चार पायांचे जनावरा मध्यें स्त्रीजाति आणि पक्ष्यांत पुरुषजाति हे क्षयरोग्यास हितकारक आहेत.

शेळीचें मांस, दूध, तूप, साखरेसहित सेवा. (शेळ्यामध्यें बसणें.) हें सर्व क्षयरोगनाशक आहे.

गीत, वाद्य, वोष, प्रियस्तुति, हर्ष, आश्वासन, गुरुसेवा, ब्रह्मचर्य, दान, तप, देवतार्चन, सत्यआचार, सूर्याची सेवा, वैद्य, ब्राह्मण यांची सेवा, पूजा केली म्हणजे राजक्ष्मा निवृत्त होतो.

## कासलक्षणोपचार.

प्राणवायु दुष्ट होऊन उदान वायूशीं संघर्ष करितो. आणि फुटकें कांशाचें भांडें वाजतें त्याप्रमाणें मुखांतून अकस्मात् जो शब्द निघतो त्याला कास (खोकला) असें ह्मणतात.

गुळवेल, सुंठ, भारंगमूळ, रक्त चंदन, एरंडमुळ, साळवण

यांचा काढा पिंपळीचे चूर्णासहित प्याला असतां श्वासकास यांचा नाशक आहे.

मिरें, सुंठ, पिंपळी यांचें चूर्ण, मध, तूप यांच्या बरोबर खावें. म्हणजे शीघ्र कासाचा नाश करितें.

मध, खडीसाखर यांचे बरोबर जर मिऱ्याचें चूर्ण सेवन केलें तर श्वासकास जातो; तर श्वासकासांनीं पराजित अशा पुरुषांनी चिंता कां करावी?

पिंपळी, पिंपळमूळ, सुंठ. बेहेडा यांचें चूर्ण, मधाबरोबर चाटावें, म्हणजे कास शांत होईल.

लवंगा; मिरें, बेहडेदळ हीं समभाग, यांच्या बरोबर खदिरसार घेऊन सर्व कुटून एकत्र करून बाभळीच्या सालीच्या काढ्यांत खलून गोळ्या कराव्या. ती गोळी सेवन केली असतां तीन घटकेंत खोकला रहातो. हें अगदीं अनुभविक औषध आहे.

गूळ ८ तोळे, जवखार अर्धा तोळा, मिरें अर्ध तोळा, पिंपळी एक तोळा, डाळिंबाची साल चार तोळे, याप्रमाणें घेऊन खलून गोळ्या करून शक्ती प्रमाणें खाव्या ह्मणजे श्वासकास दूर होईल. हें अगदीं अनुभविक औषध आहे.

## हिक्काश्वासलक्षण.

वारंवार जो वायु शब्द करणारा आणि मुखानें यकृत, प्लीहा, आंतडीं फेंकतोच काय असा ऊर्ध्व येतो त्याला हिक्का ( उचकी ) असें ह्मणतात. हिक्का असें ह्मणण्याचें कारण कीं, तो एकसारखा शब्द

करून प्राणाप्रत हिनस्ति ह्मणजे नाशितो ह्मणून हिक्का असें ह्मणतात.

ज्या कारणांनीं हिक्का होते त्याच कारणांनीं मनुष्यास श्वास होतो. तो घोर ह्मणजे भयंकर आहे.

ऊर्ध्व श्वास कुपित झाला असतां अधःश्वास कोंडतो आणि वरतीं गुदमरून येतो. त्याचे प्राण श्वास नाशितो.

हिक्का व श्वास ज्याला असेल त्याणें सुंठ, भारंगमूळ यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर प्यावें अथवा सुंठ, साखर, भारंगमूळ, पादेलोण यांचें चूर्ण खावें.

मनुका, हिरडा, नागरमोथा, कांकडशिंगी, धमासा, यांचा लेह मध व तूप घालून करावा. तो खाल्ला असतां मोठा भयंकर श्वास जरी असला तरी त्याचा नाश करितो.

कास प्रकरणांत सांगितलेलें औषध हिक्का श्वासाचे ठायीं वैद्यांनीं योजावें आणि क्षयावर सांगितलेलें, औषध कास, हिक्का, श्वास यांचे ठायीं योजावें.

## स्वरभेदोपलक्षणोपचार.

कासविंदा, वांगें, माका यांचा अंगरस तूप घालून प्यावा, वर दूध प्यावें, ह्मणजे पित्तापासून झालेला स्वरभेद नीट होतो.

तूप भातांत गूळ घालून वर ऊन पाणी प्यावें; ह्मणजे वातापासून झालेला स्वरभेद नीट होतो. तसेंच माक्याचा रस व तूप एकत्र करून आटवून तें तूप प्यावें, ह्मणजे वातानें बिघडलेला स्वर नीट होतो असें जाणावें.

## रोचकलक्षणोपचार.

जिरें, धने, कुटून १४ तोळे तुपांत पक्क करून शक्तीप्रमाणें खावे; ह्मणजे कफपित्त यापासून झालेली अरुचि, मंदाग्नि यांचा नाश करील.

## छर्दिलक्षणोपचार.

कास, श्वास, ज्वर, हिक्का, तृष्णा, स्वरभेद, हृद्रोग, तमक श्वास, इतके छर्दीचे ह्मणजे ओकारीचे उपद्रव ( ह्मणजे मागाहून होणारे रोग ) आहेत असें जाणावें.

तोळाभर चंदनाचें चूर्ण करून त्यांत आंवळ्याचा रस, मध मिश्रित करून प्यावा, तेणेंकरून ओकारीचें निवारण होतें.

बोराचे आठीचा मगज, पिंपळी, मोराचे पंखाची राख, साखर, मध, हे एकत्र करून चाटले असतां ओकारी व उचकी यांचा कोपांत होतो.

महाळुंग, आंबा, जांबूळ यांचे पल्लव अथवा मुळें पुटपाकानें पक्क करून यांचा रस मधुयुक्त करून दिला असतां सर्व दोषांपासून जरी ओकारी असली तरी तिचें शीघ्र निवारण होतें.

हिरड्याचें चूर्ण मधावरोबर खावें; तेणेंकरून दोष अधोभागीं गेले म्हणजे छर्दीचें निवारण होईल.

मातीचें ढेंकूळ तापवून पाण्यांत विझवावें, व तें पाणी थंड झाल्यावर प्यावें.

## तृष्णालक्षणोपचार.

लघु शिवणीचें फळ, साखर, चंदन, वाळा, पद्मकाष्ठ, मनुका, जेष्ठमध, यांचा काढा पित्तापासून तृषा लागते त्यावर प्रशस्त आहे.

रोगाचे संबंधानें तृषा असली तर धन्याचें पाणी, मध व साखर घालून प्यावें आणि फार वेळ तृषा लागून ती दुःसाध्य असली तर वडाचें अंकुर, ज्येष्ठमध, पिंपळी, मध, यांची गोळी मुखांत धरावी.

## मूर्छालक्षणोपचार.

धमाशाचा काढा तूप घालून भ्रमशांतीकरितां प्यावा. अथवा तीव्र अंजनें घालावीं. टोंचून वगैरे व्यथा करावी अथवा मिरच्यांची धुरी द्यावी. कांहीं तीव्र औषधें ओढावयास द्यावीं; ह्मणजे मूर्छा शांत होते.

कुहिली अंगास चोळावी ह्मणजे शुद्धि येते.

## मदात्ययलक्षणोपचार.

जे विषाचे गुण तेच मद्याचे सांगितले; यास्तव तें मद्य भलते वेळेस आणि प्रमाणापेक्षां अधिक प्यालें असतां मोठा मदात्यय होतो.

अल्प अन्नोदक सेवन केलेला, अजीर्णी, उष्णानें तापलेला, इतक्यांनीं सेवन केलेलें आणि इच्छा नसतां बळानें पाजलेलें मद्य नानाप्रकारचे विकार करितें.

हिरडा, बेहडा, आंवळकटी यांचा काढा सुंठ, मिरें, पिंपळी यांचें चूर्ण घालून प्यावा. अथवा वाळलेले मुळे याचा मंड अथवा

प्रथ [illegible]
अनुक्रम [illegible]
स्थल [illegible]
२३ [illegible]

हुलग्याचा मंड मध घालून प्यावा; ह्मणजे मदात्यय दूर होतो, आणि सर्व दोषांपासून मदात्यय असलातरी हीं तिन्ही औषधें करावीं.

दालचिनी, पिंपळी, नागकेशर, बिडलोण हिंग, मिरें, वेलदोडे, आम्लवेतस यांचें चूर्ण अथवा सैंधव, बिडलोण, दालचिनी, त्वक, वेलदोडे, पिंपळमूळ, पिंपळी, हिंग आणि सुंठ यांचें चूर्ण करून पाण्याबरोबर खावें.

## दाहलक्षणोपचार.

कमळाच्या पाकळ्यांच्या स्वच्छ, थंडगार, अशा शयनावर अथवा जलबिंदुयुक्त कमानीच्या यंत्राचे ठायीं शयन करावें आणि, शयन केल्यावर थंड पाणी शीतळ हरकमलाचे देंठांचीं वलयें, यांनीं युक्त अशा स्त्रियांनीं त्याला स्पर्श करूं नये.

बोरीच्या पाल्याचा फेंस, लिंबाच्या पाल्याचा फेंस, मद्यावरलें पाणी, दह्याची निवळी, महाळुंगांचा रस, इतके दाहशामक आहेत.

कडुलिंबाचीं पानें हातावर कुसकरून तो फेंस अंगास चोळावा; ह्मणजे तृषा, दाह, मोह हे शांत होतात. जसें धनिक लोकांचें धन वेश्यासमागमाचे योगानें नष्ट होतें.

कापुरकस्तुरीयुक्त चंदनाचा सर्वांगास लेप करावा, अथवा पांढरे कमलाचा लेप करावा, आणि जेथें कारंजाचे फवारे उडताहेत अशा घरांत बसावें.

वाळ्याच्या ताटी लाविलेल्या गृहांत शयन, पंख्याचा वारा,

कवीचें अलंकारयुक्त सुरस भाषण हीं तिन्हीं तापशामक आहेत.

आंवळा व द्राक्षें यांचा रस प्यावा, नारळाचें पाणी साखरेसहित प्यावें; सुकुमार स्त्रियांचें गायन ऐकावें; ह्मणजे ताप आणि मूर्छा हरण होईल.

दाह झाला असतां, मूत्र करणारें कोंवळें फळ सेवन करावें.

## उन्मादलक्षणोपचार.

बुद्धीवर भ्रांति, सत्वगुणाचा नाश, व्याकुळदृष्टी, अधीरपणा, बोलणें असंगत, हृदयशून्यता, ह्मणजे अंतःकरणांत कांहीं एक न येणें, हें उन्मादरोगाचें सामान्य चिन्ह जाणावें.

जो उन्माद सन्निपातापासून असतो तो अति घोर आणि सर्व कारणें एकत्र मिळून होतो; आणि ज्या उन्मादांत नियमेंकरून अति भाषण, अति पराक्रम, अति चेष्टा, सामान्य विशेष ज्ञान, बल हें असतें, तो भूतांपासून उन्माद (वेडा) झाला असें जाणावें.

काम, शोक, भय, क्रोध, हर्ष, ईर्षा आणि लोभ यांपासून जे उत्पन्न झाले रोग ते त्यांचे प्रतिद्वंद्वी जे काम शांत्यादिक यांणीं निवारण करावे, ह्मणजे कामापासून उत्पन्न झाला जो कामज्वर तो कामशांति झाली ह्मणजे ज्वर जातो. त्याप्रमाणें करावें.

## अपस्मारलक्षणोपचार.

अंधकारांत शिरल्याप्रमाणें घाबरेपणा, दोषांच्या प्राबल्यानें स्मृतिनाश, तोंडास फेंस हीं लक्षणें ज्यांत होतात त्याला अपस्मार ( फेंपरें ) असें ह्मणतात. हा रोग भयंकर आहे.

वातापासून अपस्मार असेल तर बहुतकरून बस्ति करावा, आणि पित्तापासून असेल तर प्रायः रेचन द्यावें, आणि कफापासून असेल तर प्रायः वमन द्यावें.

पुष्यनक्षत्राचे ठायीं कुत्र्याचें पित्त काढून अंजन करावें, अथवा तुपांत मिश्र करून धूप करावा, म्हणजे अपस्माराचा नाश होईल.

मनशीळ, रसांजन, पारव्याची विष्टा यांचें अंजन अपस्मार व उन्माद यांचें नाशक आहे.

ज्येष्ठमध, हिंग, वेखंड, निवडुंगाचा चीक, शिरस, लसूण, कोष्ठकोळिंजन यांचें अंजन आणि नस्य बोकडाचे मूत्राबरोबर केलें असतां अपस्मार आणि उन्माद हे रोग जातात.

तूप, सैंधव, हिंग हीं एक एक तोळा, आणि बारा तोळे गोमूत्र घेऊन एकत्र शिजवावें. मूत्र आटलें म्हणजे तूप सिद्ध झालें. तें तूप अपस्मार आणि हृद्रोग यांचें नाशक आहे.

## वातव्याधिलक्षणोपचार.

बलवान् असा जो वायू तो पोकळ शिरा असतात त्यांत शिरून शरीराचे ठायीं संपूर्ण किंवा एखादा अवयव धरून राहिलेले असे नाना प्रकारचे व्याधी उत्पन्न करितो.

सांधे आंखडणें, धरणें, हाडें व सांधे फुटणें, आंगावर कांटा येणें, बडबड, हात, पाठ, डोकें धरणें, लंगडेपणा, पांगळेपणा, कुबडेपणा, आंगास रुक्षपणा, झोंप न येणें, गर्भवीर्य, स्त्रियांचा विटाळ यांचा नाश, कंप, अंगास बधिरपणा, डोकें, नाक, डोळे, ख-

पाठ, मान, कुशी, यांच्या ठिकाणीं ओढ, फुटणें, टोंचल्यासारखें होणें, ठणकणें, उडणें, मोह, श्रम, अशा नाना तऱ्हा वायु कुपित झाला ह्मणजे करितो. कारणविशेषेंकरून, स्थान-विशेषेंकरून, रोग विशेषे करणारा होतो. आणि शिरागत वायु झाला ह्मणजे सर्वांग रोग, एकांगरोग करितो. ऊर्ध्ववायु, अधोवायु, कुंभकनळवात, संधिवात, कटिवात, शिरोवात इत्यादि प्रकारचीं नांवें होतात.

अभ्यंग, वाफारा, बस्तिकर्म, नस्य, तेल, इत्यादिकांनीं मर्दन करावें, रेच द्यावे, इनके प्रकार करावे, आणि स्निग्ध, आंबट, खारट, मधुर, वृष्य, वातानुलोमन असे पदार्थ भक्षण करावे, ह्मणजे वातव्याधि शांत होतो.

आस्कंद, चिकणा, लघुचिकणा, पेटारीदशमुळें, सुंठ, बोर, रानबोर, रास्ना हा गणवातनाशक आहे.

निर्गुडीचा अथवा करंजाचा पेंड बांधावा. आणि पित्तकारक औषधांनीं वाफारा, लेप, स्नान, इत्यादिक करावें, ह्मणजे वायु शमतो.

चित्रक, इंद्रजव, पहाडमूळ, कुटकी, अतिवीष, हिरडा, यांचें चूर्ण महावातव्याधीचें शमन करणारें आहे. याला षट्चरण-योग असें म्हणतात.

पूर्वीचे योगाबरोबर गुग्गुळ, मध, तूप, हे सेवन केलें असतां वात रोगाचें निवारण होतें.

देवदार, हिंग, कोष्ठकोळिंजन, चंडिशेप, सैंधव, वेखंड, रुई-चा चीक, यांचा लेप अस्थिगत जरी वायु झाला तरी, त्याचा नाश करितो.

ज्या ठिकाणीं केवळ वायूची पीडा असेल, तेथें वस्तऱ्यानें फां-मण्या टाकून त्यावर गुंजा वांटून त्यांचा लेप करावा. तो लेप अप-बाहुक, विश्वाची, गृध्रसी, अन्य दुसरे वायु यांची पिडा शमवितो.

रास्ना, गुळवेल, देवदार, सुंठ, एरंडमूळ, यांचा काढा सप्त धातुगत वायु, आमवात, सर्वांगवायु, यांच्या ठायीं प्रशस्त आहे.

एरंडाच्या बिया शुद्ध करून वांटून दुधांत शिजवाव्या. ती खीर कंबरेचा शूळ, गृध्रसी वायु यांचे ठायीं उत्तम औषध आहे.

## वातरक्तलक्षणोपचार.

मंजिष्ट१, कुडा२, गुळवेल३, नागरमोथा४, वेखंड५, सुंठ६, हळद७, दारूहळद८, अडुळसा९, पित्तपापडा१०, उपळसरी११, अतिवीप१२, धमासा१३, कडुइंद्रावन१४, वाळा१५, रिंगणी१६, कडुनिंब१७, कडुपडवळ१८, कोष्टकोळिंजन१९, कुटकी२०, भारंगमूळ२१, वावडिंग २२, चित्रक२३, मोरवेल२४, देवदार २५, इंद्रजव२६, माका२७, पिंपळी२८, मेंदी२९, पहाडमूळ३०, शतावरी३१, खैर३२, हिरडा३३, बेहडा३४, आंवळकटी३५, काडेचिराईत३६, बकाणालिंब३७, असाणा३८, बहावा३९, काळे तेड४०, बांवच्या४१, रक्तचंदन४२, वायवर्णा४३, करंज४४, साग ४५, यांचा काढा करून नित्य प्यालें असतां त्वचेचा दोष, अठरा कुष्टें,

वातरक्त, सुनबाहिरी, विसर्प, विद्रधि, सर्व रक्तदोष यांचा नाश लौकर करितो. याला मंजिष्टादि असें. ह्मणतात.

## ऊरुस्तंभलक्षणोपचार.

जेव्हां कफयुक्त वायूनें मांड्या स्तब्ध आणि त्यांना जीव नाहीं-सा होतो आणि मांड्या बारीक, संकटानें उचलणें, स्पर्श न कळणें, अशा होतात तेव्हां त्या वायूला ऊरुस्तंभ किंवा आढ्य-वात असें ह्मणतात.

मध, शिरस, वारुळाची माती, एकत्र वांटून दाट लेप करावा. हा ऊरुस्तंभनाशक आहे.

शिलाजीत, अथवा गुग्गुळ, किंवा पिंपळी, अथवा सुंठ, गोमूत्राबरोबर किंवा दशमूळांचे काढ्याबरोबर प्यावें. ह्मणजे ऊरुस्तंभाचा नाश होतो.

## आमवातोपचार.

सुंठ आणि गोखरूं यांचा काढा नित्य सेवन केला असतां आमवात, कटीशूळ यांचा नाशक, पाचक आणि पीडानाशक आहे.

सुंठीचें चूर्ण एरंडमुळाचे रसांत खलून पुटपाकानें पक्व करून मधाबरोबर खावें, ह्मणजे आमवाताची पीडा दुरुस्त असली तरी जिंकील.

सुंठीचें चूर्ण १० मासे नित्य कांजीबरोबर प्यावें; ह्मणजे आमवात व कफवात यांचा नाश करील.

सुंठ, मिरें, पिंपळी, चित्रक, चवक, यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर प्यालें असतां मंदाग्नि, शूल, गुल्म, आम, कफ, अरोचक यांचा नाश करील.

हिरडा, बेहडा, आंवळकटी, सुंठ यांचें चूर्ण करून दह्याचा मंड, कांजी, तक्र, पेया, मांस, रस, यांतून एकाबरोबर प्यालें असतां आमवात, संधिगत सूज यांचा नाश लवकर करील.

## शूललक्षणोपचार.

वायु वाढला ह्मणजे हृदय, कुक्षी, पाठ, माकडहाड, ओंटी, पोट, यांचे ठिकाणीं, तिडीक उत्पन्न करितो त्याला शूल असें ह्मणतात.

वेदना, तृषा, मूर्छा, आनाह, जडपणा, . अरति, श्वास, कास, हिक्का, इतके शूलाचे उपद्रव सांगितले आहेत.

भोजनोत्तर अन्न जिरूं लागलें असतां जो शूळ होतो तोच परिणाम शूल जाणावा.

पोट फुगणें, जीव गुंडाळून येंणें, मलमूत्राचा प्रतिबंध, अस्वास्थ्य, वेदना, स्निग्ध उपचारांनीं शमन, अशा लक्षणांनीं पित्तशूल जाणावा.

मलबद्धरोग, जाड्य, छर्दि, तृषा, ज्वर, भ्रम, अरुचि, कृशपणा, दुर्बलपणा अतिवेदना, हे १०उपद्रव ज्याचे शूलास आहेत तो मनुष्य नाहीं असें जाणावें.

एरंड, बेल, डोरली, रिंगणी, महाळुंग, यांचीं मुळें, पाषाणभेद ( लकड्या ), सुंठ; मिरें, पिंपळी, यांचा काढा, जवखार, हिंग,

सैंधव, एरंडेल तेल, यांणीं मिश्र करून कंबर, मांड्या, शिस्न, व हृदय, स्तन, इतक्या ठिकाणच्या शूलांवर प्यावा.

लहान शंखाचें भस्म, मिरें, मीठ, टांकणखार, सैंधव, बिडलोण, पादेलोण, हीं समांश घेऊन कलंबूक ह्मणजे कलंबा ह्मणजे कुसुमकाचरीतीचें रसांत गोळ्या करून प्रातःकाळीं किंवा भोजनसमयीं शक्तीप्रमाणें खाव्या; ह्मणजे परिणामशूळापासून मुक्त होईल.

वमन, लंघन, घाम काढणें, पाचन, फलवृत्ति ह्मणजे मलशोधन करण्याविषयीं गुदांत घालण्याची वात, क्षार, चूर्ण, गोळ्या, इतकीं शूळनाशक आहेत.

शतावरी, ज्येष्ठमध, लघूचिकणा, दर्भमूळ, गोखरूं, यांचा काढा करून थंड झाल्यावर गूळ किंवा साखर, व मध घालून प्यावा. ह्मणजे पित्तरक्तदाह, शूल, यांचा नाश करील. आणि दाह तात्काळ शमवील.

गेळफळ, कुटकी, पाण्यांत वांटून किंचित् ऊन लेप बेंबीवर करावा, तेणेंकरून शूल शमन होतो.

एकच सागरगोटा, तीनशें शूळांचा नाश करील; मग लसूण, सैंधव, हिंग, त्यांच्यांशीं युक्त सेवन केला तर फारच उत्तम.

सुंठ, एरंडमूळ यांचा अथवा इंद्रजव यांचा काढा, हिंग, पादेलोण, यांणीं मिश्रित वातशूळाचा निवारक आहे.

शतावरीचा रस, मधाशीं युक्त, असा शूलहारक आहे.

३१

चिंचेखार २० तोळे, मीठ ४ तोळे, सैंधव ४ तोळे, पादेलोण ४ तोळे, बिडलोण ४ तोळे, टांकणखार ४ तोळे, यांचें चूर्ण १२८ तोळे, लिंबाचे रसांत टाकून नंतर ४०तोळे शंख तावून त्या रसांत विझवावे, याप्रमाणें सात वेळ विझवून शुष्क करून त्यांत शंखाचें चूर्ण आणि हिंग ४ तोळे, सुंठ ४ तोळे, मिरें ४ तोळे, पिंपळी ४ तोळे, गंधक २तोळे, पारा २ तोळे, बचनाग २ तोळे टाकून सर्वांचा लिंबाच्या रसांत तीन दिवस खल करून, बोराचे आठीप्रमाणें, गोळ्या कराव्या, आणि एक एक गोळी प्रातःकाळीं भक्षण करावी व वरतीं ऊन पाणी प्यावें; तेणेंकरून सर्व शूल, गुल्म, अजीर्ण, परिणामशूल, अतिसार, संग्रहणी, यांचा नाश होईल.

हिंग १, बेहडा २, सुंठ ३, सागरगोटा४ याप्रमाणें भाग घेऊन चूर्ण करून ऊन पाण्याबरोबर प्यावें. तेणेंकरून शूल शमतो. गूळ, हिरडा, आणि तूप, लसूण, हे योग शूलनाशक आहेत.

गुळ, आलें, तीळ, यांचा मोदक परिणामशूलाचा नाशक आहे. हिंग, हिरडा वेखंड, वावडिंग, यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर प्यावें; तेणेंकरून आनाहशूल, हृद्रोग, विषूची, गुल्मवायु यांचा नाश होतो.

व्यायाम, मैथून, मद्य, खारट, तिखट, वेगरोध, आणि दिवानिद्रा, इतकीं शूलवान्मनुष्यांनें वर्ज करावीं.

## आनाहोदावर्तलक्षणोपचार.

बस्ति, लिंग, यांच्या ठिकाणीं, शूल, मूत्रकृच्छ्र, मस्तकपीडा, आणि आडसांधि, आखडणें, हीं लक्षणें मूत्रनिग्रहापासून होतात.

तेड, हिरडा, पिंपळी, यांचें चूर्ण करून निवडुंगाचे चिकाची भावना द्यावी. नंतर त्याच्या गोळ्या गोमूत्राबरोबर खाल्या असतां आनाहनाशाविषयीं श्रेष्ठ आहेत.

# किरकोळ औषधें.

## कफ झडण्यास औषध.

हळद २ तोळे, दारूहळद २ तोळे, मनशीळ २ तोळे, येणेंप्रमाणें कुटून प्रातःकाळीं ओढावयास दिलें असतां कफ झडेल.

## मेहास अनुपान.

पारा २ तोळे, गंधक २ तोळे, वंगभस्म २ तोळे, येणेंप्रमाणें कज्जली करून नित्य दोन गुंजा तुपांतून द्यावी.

आंग पोळल्यास लेप विड्यांचीं पानें चारशें व जिरें लावावें.

## धातुवृद्धीवर औषध.

हंसपादी लहान पाल्याची आणून वाळवून चूर्ण करावें. त्या चूर्णापैकीं सुमारें तीन बोटांनीं चिमटी घेऊन ती सुमारें पावशेर दुधांत घालून उभे राहून प्यावें. हा क्रम ७ दिवस ठेवावा. पथ्य—गव्हांची रोटी व तूपसाखर.

## गर्मीस औषध.

कळखापरी १ तोळा, हिराकस ३ मासे, मोरचूद ३ मासे, शि-

लाजीत १ मासा, येणेंप्रमाणें २१ लिंबांच्या रसांत खलून हरभऱ्या एवढी गोळी करून तुपांत गिळावी. खिचडी व तूप खावें.

## विंचवावर औषध.

शिंदीच्या पाल्याचे तुकडे करून ओढावयास द्यावे. आगकाड्या उगाळून लावाव्या.

## पित्त-शीत ज्वरावर काढा.

सुंठ, दालचिनी, रिंगणमूळ, काडे चिराईत, एरंडमूळ, धमासा, पित्तपापडा, आंवळकटी, गुळवेल,—येणेंप्रमाणें प्रत्येकीं पावलीभार जिन्नस आणावे; व सर्व कुटून पक्का अच्छेरभर पाणी ठेवून काढा करावा. उतरतांना पैसाभार खडीसाखर घालून द्यावें. काढा पांच रुपयेभार उरवावा.

## पित्तास औषध.

सुरवारी हिरडेदळ, सुंठ, खडीसाखर, मनुका, मौक्तिकभस्म येणेंप्रमाणें भस्म खेरीज करून बाकी औषधें पावली भार प्रमाणें घेऊन बारीक कुटून त्यांत भस्म टाकून गोळ्या करून द्याव्या.

## मनुष्याचें पुरुषत्व गेलें असल्यास औषध.

मुळीचें बीज दररोज ३ टांक गाईचे दुधांत खवा करून खाण्यास द्यावें. असें ७ दिवस द्यावें. पथ्य—आंबट, तिखट, तेलकट खाऊं नये. सात दिवसांत पुरुषत्व येईल.

## पिसाळलेलें कुत्रें चावल्यास औषध.

हिंगणाची अंतर साल ४ टांक वजन करून कुटावी. पहिल्या०

नं गूळ खावयास द्यावा. एक घटका गेल्यानंतर ३ टांक साल भुकटी ताकामध्यें प्यावयास द्यावी. पोटांतलि किडे पडतात त्या घटकेस गुण येईल.

**मनुष्याच्या अंगांत येणाऱ्या मरीआईच्या वाऱ्यावर औषध.**

हिंगणाची साल २ टांक दह्यामध्यें प्यावयास द्यावी. चार घटकांनीं गुण येईल.

## मूळव्याधीचें औषध.

रसकापूर लिंबाचे रसांत लावावा. खळगा म्हणून त्यांत बोरीचे कोळसे घालून त्यांत विस्तव घालून शेकावें. सात दिवसांत नीट होईल. **पथ्य**–तिखट, आंबट ,तेलकट खाऊं नये.

## पदरावर औषध.

लिंबाचे रसांत गुळ तीन दिवस चारावा. **पथ्य**–तिखट, आंबट आणि तेलकट खाऊं नये.

## वायु गुरमाचें औषध.

रसशेंदूर आल्याच्या रसामध्यें रोज मासाभर द्यावा. १४ दिवसांत नीट होईल. **पथ्य**–तेल व गुळ खाऊं नये. बाकी सर्व खावें.

## वायू गुरमाचें दुसरें औषध.

इंद्रावण १ तोळा, पादेलोण ६, सुंठ १, मिरें १, पिंपळी, १ सोनामुखी ३, जिरकीचें बीं २, हिंग ११, चित्रकमूळ ३, एक कांडीची लसूण ३ व घट सागर १ तोळा या सर्व जिनसांचें चूर्ण क-

रावें. **पथ्य**—गहूं, गुळ, दूध, दहीं, ताक, चिंच, वांगें, कोथिंबीर इतके जिन्नस वर्जावे; बाकी सर्व खावें.

## मूळव्याधीवर औषध.

गाईचें लोणी ३ पैसे भार, पाणी १० पैसे भार, खडीसाखर ३ पैसे भार हे पाण्यांत घालून पाक करावा. **पथ्य**—ज्वारीची भाकरी व तुरीची डाळ खावी; बाकी कांहीं खाऊं नये.

## गर्मीवर औषध.

उंबराचे झाडाचें जें पाळ साधारण मोठें असेल ती जागा खणून पाळ मोकळें करावें. त्या पाळाखालीं एक भांडें ठेवून करवतीनें तें पाळ कापावें. ह्मणजे चार प्रहरांत त्यांतून आलेला द्रव जो भांड्यांत सांठेल त्यांतील शक्तीप्रमाणें ४ तोळेपर्यंत द्रव घेऊन जिरें व खडीसाखर घालून द्यावा.

## गर्मीवर औषध.

रेवाचिनी ३ तोळे, सोरा १॥ तोळा, वेलदोडे अर्ध तोळा, कापूर चिनी अर्ध तोळा, तवसागिरी १ तोळा येणें प्रमाणें चूर्ण करून ७ पुड्या करून ७ दिवस गाईचें ताक एक शेर घेऊन त्यांत एक पुडी घालून द्यावें. **पथ्य** गाईचें ताक व भात सात दिवस खावें; बाकी कांहीं खाऊं नये.

## वायूस औषध.

काळी निर्गुडी, काळा माका, जाई, या तिन्ही झाडांच्या मुळ्या कुटून त्यांचें चूर्ण गरम पाण्यामध्यें सकाळीं व सायंकाळीं नि-

जतांना द्यावें. असें १४ दिवस करावें. **पथ्य**—गव्हांची रोटी व तूप, तुरीचें वरण, मिऱ्याचें तिखट घातलेलें, बाकी कांहीं खाऊं नये.

## परम्याचें औषध.

कांटे शेंवरीचा डिंक ४ तोळे, मुसळीकंद २ तोळे, पांढरा कात २ तोळे, जिरें अच्छेर, सोरामीठ ३ तोळे, येणेंप्रमाणें चूर्ण करून फकी द्यावी. वरतीं ताक प्यावें.

## तिडका, परमा यांजवर औषध.

जिरें पावशेर, सोरामीठ २ तोळे, वेलदोडे ४ तोळे, यांचें चूर्ण करून द्यावें. वरतीं ताक प्यावें.

## पिवळा डाग चिरगुटास पडतो त्या परम्यावरील औषध.

आंब्याची साल व धने समभाग २ भार प्रमाणें घेऊन रात्रीं पाण्यांत भिजत घालावे. आणि ४ भार वांटून रस काढावा आणि त्यांत ४ भार दहीं घालून प्यावा.

## इसबास औषध.

मनशीळ ३ मासे, पारा ३ मासे, आवळेगंधक २ मासे, मोरचूद २ मासे, रस कापूर १ मासा, रुईचा चीक ४ पैसेभार, गाईचें लोणी ६ पैसे भार एकंदर करून कांशाच्या भांड्यांत घालून कांशाच्या वाटीनें खलावें आणि तें मलम दिवसांतून ३ वेळां लावावें; म्हणजे इसाब बरा होईल.

## परम्याचें औषध.

शेरणीचा पाला आणून दररोज एक तोळा रस काढावा, आ-

णि आंत जिरें पैसाभार व खडीसाखर पैसाभार घालून द्यावा. सदरहूस पथ्य जोंधळ्याची भाकरी.

## गरमीवर औषध. ( दुःखाचें औषध. )

पत्री १ तोळा, वेलदोडे एक तोळा, मिरें १ तोळा, लवंगा १ तोळा, रस कापूर अर्ध तोळा येणेंप्रमाणें चूर्ण करून १५ पुड्या कराव्या, आणि प्रातःकाळीं १ व सायंकाळीं १ पुडी प्रमाणें तुळशीच्या पाल्याचे रसांतून द्यावी. ७ दिवस औषध घेईपर्यंत सर्व वातेड पदार्थ खावे, ८ वे दिवशीं प्रातःकाळीं एक पुडी पायाखाली घेऊन पाणी घेऊन स्नान करावें, आणि मग पथ्य गव्हाची रोटी, तूप व साखर सात दिवस करावें व सात दिवस तेल, तिखट, आंबट असें १४ दिवस पथ्य करावें.

## गरमीवर दुसरें औषध.

जायफळ १ तोळा, पत्री १ तोळा, लवंगा १ तोळा, मिऱ्यें १ तोळा, रस कापूर १ तोळा, शाळू ज्वारी दाणे १२; त्यांत रस कापूर खलावा. येणेंप्रमाणें चूर्ण करून विड्याचीं पानें १२५ चा रस काढून त्यांत सर्व खलून हरबऱ्या एवढ्या बारक्या गोळ्या बांधाव्या. तीन अगर चार गोळ्या खाव्या, उतार हरबऱ्याची आमटी व गव्हाचा सांजा. दहीं व दूध नाहीं; बाकी सर्व खावें. तोंड आलें तर तांदूळजाची भाजी तुपांतून प्रथम खावी. बाभळीच्या गुळण्या द्याव्या. तितक्यानें बरें न होईल तर गंधक आणून तो बारीक वांटून तुपांत खलावा, आणि कापसाच्या पेळवा भरून प-

ळीचे दांड्यावर घालून त्याचें तेल निघतें तें वाटींत घालून तोंडास लावावें.

## मूत्र बंद झालें असतां औषध.

मगर माशाचे डोक्यांतला खडा पाण्यांत उगाळून पाजावा. तोंडलीची मुळी आणून रस काढून अच्छेर भर ऊन पाण्यांत काढा करावा आणि त्यांत दहा पैसे भार साखर पिठी व कुडूचें बी पैसा भार घालून द्यावा. येणंप्रमाणें करावें आणि पळसाचे फुलानें वंवर व पोट हीं शेकावीं.

## वायूस उपाय.

जाईचा पाला ४ पैसेभार, निर्गुडीचा पाला ४ पैसेभार, पाजीच्या भाजीच्या मुळया ४ पैसेभार, माका ४ पैसेभार, शेवग्याचीं फुलें ४ पैसेभार, बाभळीची अंतर साल ४ पैसेभार, गजग्याचें बीं ४ पैसेभार, कडु लिंबाची साल पैसाभार, सुंठ चार तोळे, मिरें ४ तोळे. येणेंप्रमाणें चूर्ण करून दररोज तीन बोटाच्या चिमटींत जितकें येईल तितकें खावें. वर पाणी शिळें घागरींतलें वाटीभर प्यावें. असें एकवीस दिवस द्यावें. पथ्य—मीठ भाजून ज्वारी व गहू याचे बरोबर मेथीची भाजी खावी; पाणी थंड प्यावें.

## वायूस औषध.

मेथ्या १ चिपटें, शेत गहू १। चिपटें, यांची सोजी काढावी, साखर अडीसरी, गाईचें तूप कोळवें, मिरें १ तोळा, लवंग १ तोळा, लसूण सोलून १ तोळा, सर्वांचें चूर्ण एकत्र करून मग

त्यांत गाईचें तूप पातेल्यांत घ्यावें आणि त्यांत पीठ टाकावें आणि पळीनें हालवावें. जाळ थोडा लावावा आणि थोडें ओलें आहे तों-पर्यंत पळ्या भरून ताह्मनांत फडकें घालून त्यांत पळी पळी घालून फडक्यांत गोळे बांधावे, आणि १४ दिवस गाईचे दुधांत खावें, आणि ज्वारी व गव्हाची भाकरी तूप वरण इतके पदार्थ खावे. बाहेर निघू नये.

## मूळव्याधीस औषध.

उंबराचा डिंक ३ तोळे, गाईचें तूप १ तोळा, दोन्ही एकत्र करून तुरी सारख्या गोळ्या करून दररोज १ प्रमाणें सात दिवस घ्याव्या. ज्वारीची भाकरी व वरण खावें.

## मूळव्याधीस दुसरें औषध.

गांठीचीं हळकुंडें १२ तोळे, सोनामुखी १४ तोळे, यांचें चूर्ण करून अष्टमांश काढा करून त्यांत तें चूर्ण टाकून घ्यावें. पथ्य—ज्वारी अगर गहूं, वरण मीठ खावें.

## मूळव्याधीस उपाय.

काटे शेवरीची साल जाळावी; आणि ती राख काळ्या गाईच्या लोण्यांत खलावी, ती तांब्याच्या भांड्यांत खलून काढून तें मलम लावून नंतर बोरीच्या कोळशानें शेकावें.

## जखमेस मलम.

शंखजिरें ४ पैसेभार, धुवा साखर ४ पैसेभार, शेत गव्हांची

सोजी ३ पैसेभार येणेंप्रमाणें गाईचे तुपांत घालून ताम्ब्यांचे परातींत खलून तें मलम जखमेस लावावें.

## दुसरें मलम.

शिंगरूप १ तोळा, रस कापूर १ तोळा, मुडदार शिंग १ तोळा, मेण ४ तोळे, गाईचें तूप १४ पैसेभार, चिकण्या सुपाऱ्या ४ जाळाव्या. तुपांत मेण कढवून पाण्यावर ओतून तें काढून त्याजवर सर्व जिनसांचें चूर्ण घालून तांब्याचे परातींत खलावें. व तें मलम जखमेस लावावें.

## घोड्यांचे नाळेस उपाय.

जुनें सरम जाळून राख करून पाण्यांत लावावें, वरतीं मातीचा लेप करावा. कळीचा चुना व दहीं खलून लावावें. माक्याचा पाला व मोठें मीठ वांटून लावावें.

## पोटांतील सर्व रोगांवर औषध.

लवंग १ तोळा, कुटकी २ तोळे, सोनामुखी ४ तोळे, तीन वर्षांचा गुळ १० तोळे, जमालगोटा ह्मणजे जायफळाचें बी २ तोळे भाजावें. आणि सालपट काढून बारीक वांटावें. कडू इंद्रावनीचीं ९ फळें झाडासुद्धां आणून कुटून रस काढून १८ पैसेभार कढईंत घालून मग गुळ टाकावा. गुळाचा पाक चांगला झाला ह्मणजे वरचेवर चूर्ण टाकून खलून गोळया करून ठेवाव्या आणि त्या पैकीं माणसाची प्रकृति पाहून वालाप्रमाणें अगर ज्वारी

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
........ दि: ........
........ ता: ........ दि: ........

येवढी गोळी प्रकृति पाहून द्यावी.--दाळ झाल्यावर उतार तूप भात द्यावा. तेणेंकरून नाना परीचे रोग जातील.

## पौष्टिक औषध.

बाभळीचा डिंक ८० रुपयेभार, पिठी साखर ८० रुपयेभार, चांगल्या बदामाचें बीं ८० रुपयेभार, इसबगोल १० पैसेभार, बीजबंद १ पैसाभार, तालीमखाना १२ पैसेभार, दालचिनी २ तोळे, मदन मस्त १ तोळा, खडमकडा १ तोळा, सालंमिश्री १ तोळा, सफेत मुसळी १ तोळा, पंजाब मिस्त्री १ तोळा, खारीक ८० रुपये भार, उडदाचें दाळीचें पीठ भाजून ४ पैसेभार. येणेंप्रमाणें कुटावें. ४ पैसेभार तुपांत ४ पैसेभार औषध घ्यावें. वर पंचपात्रीभर दूध प्यावें.

## दांत बळकट होण्यास औषध.

चिंचोके मूठभर, बदामाची साल मूठभर, मोठें मीठ मूठभर, चिंच मूठभर, यांच्या राखेनें दांत घासावे ह्मणजे बळकट होतात.

## घोड्याचे गरीस औषध.

जिरें २ तोळे, साखर पिठी २ तोळे, चिगळीची भाजी ४ तोळे, तीळ १ चिपटंभर येणेंप्रमाणें औषध आणून त्याचे गोळे करून सात दिवस चारावे. आठवे दिवशीं धुऊन काढावी. ह्मणजे गर जाईल.

## पोटांत गांठ जाहली असेल तर त्यास औषध.

पंचक्षार, पंचलवणें हीं दोन्ही मिळून पांच तोळे आणावीं

आणि त्यांचें चूर्ण करावें व एक कडुवृंदावन आणून त्याची वरची साल काढून टाकून आंतील मगज घ्यावा. सदरचें चूर्ण व आंतील मगज मिळून एकत्र करून नारळ मोठा आणून त्यास भोंक पाडून त्यांत भरून रानशेणी आणून त्यांत नारळ घालून भट्टी लावून नारळाचें परडें जळालें ह्मणजे बाहेर काढून आंतील नारळ त्या औषधा मुद्धां कुटावा; आणि त्याच्या सुपारीपेक्षां लहान ८० गोळ्या कराव्या, आणि दररोज सकाळीं एक तुपामध्यें खावी व सायंकाळीं एक तुपामध्यें खावी. **पथ्य**—तेलकट, आंबट, वातूळ पदार्थ खाऊं नये. बाकी सर्व खावें. याप्रमाणें ४० दिवस पथ्य करावें.

## पोटावर लेप.

कोंबडीचें अंडें व कोंबडीचा गू दोन्ही एकत्र खलून लेप करावा.

## पोटांतील गांठीस दुसरें औषध.

काळा वेल, त्याची साल व पाला, कांटेशेवरीची साल व पाला, शंकेश्वरीची साल व पाला एकून तिन्ही मिळून ६ तोळे कुटून ऊन पाणी घालून रस काढावा आणि सकाळीं व सायंकाळीं वाटी वाटीभर द्यावा. **पथ्य**—तुरीचें काट व त्याच्याच तुगऱ्या व दाळीचें माडगें वगैरे तुरीचें याप्रमाणें १४ दिवस.

## पोटांत गांठ कसलीही असली तरी तीस औषध.

गांठीचे कुंभ्याचे पाल्याचा रस १ तोळा, वेल रिंगण्याचे पा-

घ्याचा रस १ तोळा, दोन्ही रस मिळून सकाळीं प्यावयास द्यावें. **पथ्य**—राळ्याचा भात व गाईचें दुध व गुळ याशिवाय सात दिवस कांहीं एक खाऊं नये. ७ दिवसांत गुण दिसेल आणि निकाल न होईल तर १४ दिवस घ्यावें.

## जुलाबास रेचक घेण्याचें औषध.

बाळहिरडे ४ मासे, पावशेर पाणी घालून काढा करावा. तो अष्टमांश उरवावा. नंतर त्यामध्यें नळीचें तेड बारीक करून तीन मासे घालावें, व साखर दोन मासे घालून घ्यावा.

## जुलाबास दुसरा उपाय.

कोष्टी याचें वर दोन गुंजा घेऊन बारीक कुटून तूप १ मासा व साखर १ मासा यांतून घ्यावें.

## अनंतभैरवाच्या गोळ्यांची कृति.

हिंगूळ २ तोळे, शुद्ध सुंठ २ तोळे, मिऱ्यें २ तोळे, पिंपळी दोन तोळे, बचनाग २ तोळे, टांकणखाराची लाही, कवडीचें भस्म. सदरहू औषधें बारीक वस्त्रगाळ करून खलांत घालून बुडे तोंपर्यंत कागदी लिंबाचा रस घालावा आणखी खल करावा. असा तीन वेळ करावा. हगवणीवर तांदुळाचें धुवण व मध यांत द्यावा, ज्वरावर मध व आल्याचा रस यांजबरोबर, उष्णज्वरावर खडी साखरेंत, वांतीवर वेलदोड्याची राख व मधामध्यें, क्षुधेवर मधामध्यें, सर्व रोगांवर विड्याच्या पानांत द्यावा.

## घोड्यास फार किडा उठल्यास खास उपाय.

तंबाकू वजन १। पावशेर, जुना गूळ वजन १। पावशेर, मिरच्या वजन १। पावशेर एकंदर कुटून पाणी घालून त्याच दिवशीं चारावें.

## दुसरें औषध.

रक्त पाजावें.

## घोड्यास खूरखूरीस औषध.

करडयाचें तेल कानांत घालावें. व नाकांत पिळावें व पाठीचे कनाच्यास चोळावें व काटे शेणी व मोठें मीठ असें कुटून चारावें.

## वातपित्तज्वर व जीर्णज्वर यांवर काढा.

गुळवेल अर्धातोळा, नागरमोथे अर्धातोळा, सुंठ अर्धातोळा, पित्त पापडा अर्धातोळा, कोडेचिराईत अर्धातोळा, या पांच औषधांचा काढा करून द्यावा.

## ओकारी, अरुचि, कांपरें, दाह, तहान यांजवर.

गुळवेल, कुटकी, इंद्रजव, कडू पडवळ न मिळेल तर कडू वृंदावन, बाळंत लिंबाची साल, नागरमोथा, सुंठ, रक्तचंदन येणे प्रमाणें औषधें आणून त्यांचा काढा करून उतरतांना मासाभर पिंपळीची पूड घालून एकदां द्यावा.

## आमांशावर औषध.

सोनामुखी २ तोळे, बांगडखार २ मासे, लकडी रेवाचिनी २ मासे, शेंदेलोण २ मासे, पादेलोण २ मासे, सज्जीखार २

मासे, येणेंप्रमाणें चूर्ण निरनिराळें करून ४ मासेप्रमाणें घेत जावें. वरतीं एक घोट ऊन पाणी प्यावें.

## रक्त मिश्रित आमांश.

बडीशेप ४ तोळे, कंकोळ १ तोळा, खडीसाखर ४ तोळे, खसखस ६ मासे, जायफळ ३ मासे या सर्व औषधांचें चूर्ण एकत्र करून तुपामध्यें ४ मासे प्रमाणें द्यावें.

## रूक्ष वायूस उपाय.

कोरफड १० रु० भार, दूध वजन ८० रुपये भार, साखर वजन ८०१॥ पक्का, पाणी २० रुपये भार. येणेंप्रमाणें पाक करून लेह करून ठेवावा. तो चार दिवसांनीं दोन रुपये भार द्यावा.

## पोट दुखतें त्यास उपाय.

आल्याचा रस ८ मासे, मध ३ मासे, तूप ६ मासे, येणेंप्रमाणें एकत्र करून द्यावें.

## सामान्य जुलाब.

नळीचें तेड १॥ मासा, सुंठीची पूड १ मासा येणेंप्रमाणें औषधें कुटून त्यांचें चूर्ण द्यावें.

प्रातःकाळीं अग्निकुमार मात्रा गोळी एक दररोज आल्याचा रस सुमारें ६ मासे व सैंधव २ गुंजा येणेंप्रमाणें घालून प्रातःकाळीं घेत जाणें.

सायंकाळीं सुवर्ण मालिनी वसंतमात्रा दररोज अडीच गुंजा व

मध मासे सहा व खडीसाखर मासे सहा अगर आल्याचा रस मासे सहा, (आल्याचा रस किंचित् ऊन करून नंतर) औषधाची पुडी अडीच गुंजांची त्यांत घालून सायंकाळीं घेत जावें. निजतेवेळीं काढा बाळहिरडा सुमारें ३ मासे, सुंठ सहा मासे व एरंडमूळ १ तोळा, येणंप्रमाणें जिन्नस घालून पक्का अच्छेर पाणी घालून पांच रुपये भार उरवून आंत कांहीं न घालतां काढा घ्यावा. वर विडा पाहिजे तर खावा. येणं प्रमाणें करावें. **पथ्य**—भात, वरण, मूग अगर तुरी, दूध गाईचें, साजूक तूप, भाजी दोडके, शेवग्याची शेंग भेंडी, तुपाची फोडणी, पाणी ऊन प्यावें. या प्रमाणें करावें.

## राघोपंत दादा करमरकर वैद्य राहणार मिरज यांचें औषध.

अश्वगंध १ तोळा, रिंगणमूळ १ तोळा, येणेप्रमाणें चूर्ण सकाळीं १ पैसाभार व सायंकाळीं १ पैसाभार प्रमाणें घ्यावें. वरतीं ऊन पाण्याचा घोट घ्यावा. पथ्य सामान्य वरणभात, तूप, ज्वारी, गहूं, गाईचें दूध.

## शंकराप्पा वैद्य.

ताडमपत्र, तोळा, मिरें २ तोळे, सुंठ ३ तोळे, पिंपळी ४ तोळे, वंशलोचन ५ तोळे, वेलदोडे अर्धातोळा, दालचिनी अर्धातोळा, खडीसाखर ३२ तोळे, चित्रकमूळ ६ मासे, येणेंप्रमाणें चूर्ण करून सुवर्ण मालिनी वसंत मात्रा २ गुंजा व मध ९ मासे व तूप १६ मासे याप्रमाणें प्रातःकाळीं घेत जावें. **पथ्य**—सामान्य करावें.

## नाना वैद्य लागवणकर रत्नागिरीचे यांचा काढा.

धमासा २ तोळे, रिंगणमूळ २ तोळे, जेष्ठमध २ तोळे, नागरमोथे २ तोळे, हिरडेदळ २ तोळे, सुंठ २ तोळे, शाहजिरें २ तोळे, गुळवेल २ तोळे, पिंपळी २ तोळे, अडुळसा २ तोळे, पित्तपापडा २ तोळे येणेंप्रमाणें दर एक औषध दोन तोळे प्रमाणें घेऊन समभाग पुड्या ७ करून पाणी पाऊण शेर घालून शिलक काढा तीन तोळे राखून आंत मध चार मासे घालून औषध उगाळून घेत जावें. सायंकाळीं निकाढाही घ्यावा.

## विष्णुपंत वैद्य अळतेकर.

काळा माका, काळ्या टाकळीच्या मुळ्या अगर पाला, लसूण, कांगण्याचा पाला, आलें येणेंप्रमाणें जिनसांचा रस काढून त्यांत मध, जवखार चिमूटभर, पिंपळीची पूड चिमूटभर टाकून घ्यावें, तो एकंदर सकाळीं तोळा व सायंकाळीं तोळा याप्रमाणें घ्यावा.

## कफ झडण्यास काढा.

अडूळसा, रिंगणीमुळ, चवे, चित्रकमूळ, पिंपळी, पिंपळमोड, सुंठ, बाळंत लिंबाची साल, येणेंप्रमाणें प्रत्येक अर्ध्या तोळ्या प्रमाणें जिन्नसा घ्यावे, व अच्छेर पाणी घालून काढा निकाढा घ्यावा.

## घोड्याचे सरदीचें औषध.

लसूण १० तोळे, तंबाकू १० तोळे, निरगुडीचा पाला १० तोळे, दोर गुंजेची मुळी १० तोळे, मिरच्या तांबड्या १० तोळे, हे

चार जिनस करडईचे तेलांत पूड तळून ती गोळी ऊन पाण्यांत करावी, आणि चारावी. कांज्या देऊन एक घोट द्यावा, व गोळी लिंबा एवढी असावी.

### वदास औषध.

काजूची बी सुंठ व गुग्गुळ उगाळून वर लेप लावावा.

### दुसरें औषध.

पळसाचा डिंक व हिवराचा गड्डा व तीन वर्षांचा गूळ येणें-प्रमाणें बारीक पूड करून लेप द्यावा, तो तीन दिवसांनीं एक याप्रमाणें तीन लेप द्यावे.

### धडा उठतो त्यास उपाय.

विड्याचे पानास चुना न लावितां शेराचा चीक पानास लावून तो विडा खावयास द्यावा ह्मणजे धडा बंद होईल.

### शौचास बंद झालें तर उपाय.

शिककईचें बोंड पाण्यांत उगाळून पश्चिमद्वारास लावावें ह्मणजे शौचास होईल.

### परम्यास उपाय.

गुळवेलीचें सत्त्व २ गुंजा व दारूहळद शेळीच्या दुधांत तयार करून २ गुंजा, व सराट्याची पूड २ मासे, मध ३ मासे व गाईचें तूप ४ मासे असें एकत्र करून दोन सरकें द्यावीत.

पथ्य गव्हांची रोटी, गाईचें तूप.

## उलटीस उपाय.

मोरांच्या पंखाची राख २ मासे, वेलदोड्याची राख, बोराच्या त्रियाची पूड मधामध्यें कालवून घेणें. तेलकट आंबट खावूं नये.

## पित्तास औषध.

लिंबें २ आणून ४ फांका करून त्यामध्यें एकांत मीठ, दुसऱ्यांत खडीसाखर, ४ तिसऱ्यांत सुंठ, चौथ्यांत मिरें. ३ चारी फांका तापवून थंड झाल्या ह्मणजे द्याव्या. वर आंकडे घातल्याप्रमाणें द्याव्यीं.

## तापास उपाय शेस पित्तावर.

अर्धा तोळा सुंठ, अर्धा तोळा दालचिनी, खडीसाखर पाऊण तोळा, एकत्र करून अष्टमांश काढा द्यावा. तेलकट आंबट खावूं नये. तो काढा निकाढा द्यावा.

## तापास उपाय.

दालचिनी ६ मासे, बेंदाणा ६ मासे, खडीसाखर ६ मासे, एकून जिन्नस एकत्र करून अष्टमांश द्यावा.

## घाम येण्यास उपचार.

सुंठ, लसूण, मिरें, शेवरीचा पाला, येणेंप्रमाणें जिन्नस कुटून पिवळे फडक्यांत घालून पोतांडी बांधावी आणि ती मुसमटींत घेऊन तिचा वंश घ्यावा ह्मणजे घाम येतो.

## जखमेवर.

सतापाच्या सालीची बुकणी जखमेवर घालणें.

## पाण्याचें बर्फ करण्याची कृती.

धांगडीचा वेल पानासहित आणून परातींत पाणी घेऊन त्यांत त्या पाल्याचा चूर करून टाकावा, ह्मणजे पाणी बर्फासारखें होतें. तसेंच चांदवेलीचा पाला कुटून पाण्यांत मिसळावा ह्मणजे पाणी बर्फासारखें थिजतें.

## व्रणावर उपाय.

करवंदीची गर्भसाल, रुईची गर्भसाल घेऊन बारीक बुकणी करणें व कापसाचे बियांना खड्याहिंगुळाचीं २ पुटें देऊन ठवणें व लागेल त्या वेळेस चिलमींत दोन्ही सालींचें चूर्ण थोडें घालणें व पुटें दिलेले ७ बियांवर घालून थोडें आणखी सालीचें चूर्ण घालून सावकाश ओढणें. असें ७ दिवस. ७ दिवस स्नान करूं नये. पथ्य—ताक भात करणें, व पुढें ६ दिवस अपथ्य करून पुन्हा ७ दिवस औषध न घेतां पथ्य करावें. तोंडास आल्यास करवंदीचा पाला वाळलेला त्याची राख घेऊन पिणें व चूळ भरणें.

## नारूवर.

नारळाचे अर्ध शेर पाण्यांत तुरटीची लाही १ मासा घालून पिणें. असें तीन दिवस करणें.

## जलोदरावर.

पांढऱ्या गोकरणीची साल पाण्यांत उगाळून द्यावी.

पथ्य—रोटी व मुगाचें वरण, पाणी व ताक देऊं नये.

## मूत्र जुलाब.

वंशलोचन पानाचे विड्याबरोबर देणें, संध्याकाळचे वेळीं, ह्मणजे सकाळीं मूत्र साफ होतें.

पापडखार, चुना व गूळ एकत्र करून दिला असतां पोटदुखी राहते.

## शूळावर.

काळ्या माक्याचा रस, पादेलोण, टाकळी, काळीचा रस, काळीनिगडी, शेवग्याची साल, लसुणाचा रस, आल्याचा रस, मध, गुल्मावर (वायुगुल्म) पोटांत उत्पन्न होतो. ४२ दिवस. पथ्य-जोंधळ्याची भाकरी; डाळ मीठ नाहीं.

## गरमीपासून डोळे लाल झाल्यास.

कलमी दालचिनी २॥ भाग, राजापुरी साखर १० भाग, तूप १० भाग हे तुपांत शिजवावे. खाण्यास ९ रुपये भार देणें. पथ्य-डाळ, भात मीठ व तिखट देऊं नये.

## उष्ण कडकीवर.

कवारफोड, तूप, खसखस, राजापुरी साखर पातेल्यांत भाजून नंतर खलावें व तसें शीत झाल्यावर खाण्यास ७ दिवस द्यावें. ह्मणजे शरिराची जळजळ इत्यादि नीट होतील.

## वायूवर.

वसंत कुसुमाकर याचें अनुपान.—वेलदोडा, जायपत्री रति, ख-

-डिमाखर १ तोळा यांतून पूर्वी सदहू औषधें घतल्यावर डाळिंबाचे दाणे सुमारें दोन तोळे द्यावे. पथ्य—गव्हांची पोळी, मुगाचें वरण, भात, साखर व तूप.

वसंत मालिनी, वेलदोडा, वंशलोचन, रति, मध २ मासे. या अनुपानांत सदर औषधें एक रति द्यावें. पथ्य वरच्याप्रमाणें. अंगूर तीन तोळा वर खावा.

पोलादभस्म—हें खडीसाखर अर्ध तोळा, खारीक, पिंपळी २ रति, वंशलोचन १ रति, जायपत्री २ रति यांतून द्यावें. पथ्य-वरच्याप्रमाणें गव्हांची पोळी खाऊं नये. गाईचें दूध व भात. वरण मुगाचें.

त्रिवंगभस्म—पिठीसाखर अर्ध तोळा, लवंग १ रति, बेदाणा ३ मासे, यांतून वरील भस्म सुमारें १ रति द्यावें. पथ्य वरच्याप्रमाणें.

कांतिसार—वेलदोडा १, खडीसाखर अर्ध तोळा, यांतून द्यावें. पथ्य वरच्याप्रमाणें.

रूपरस—याचें अनुपान व पथ्य कांतिसाराप्रमाणें.

### घेण्याचा काळ.

आश्वीनमासांत कांतिसार व रूपरस.

वसंत कुसुमाकर कार्तिकमासांत प्रातःकाळीं द्यावा.

मार्गशीर्षमासांत वसंतमालिनी द्यावी.

पौषमासांत पोलादभस्म द्यावें आणि माघमासांतही तेंच द्यावें.

त्रिवंगभस्म फाल्गुनमासांत घ्यावें आणि चैत्र वैशाखपर्यंत तेंच चालवावें.

## रात्रौ निजते वेळेस मस्तकावर घालावयाचें औषध.

वेलदोडा अर्ध तोळा, लवंग अर्ध तोळा, कापूर अर्ध तोळा. बदाम गर २ तोळे, कंकोळ अर्ध तोळा, जायपत्री अर्ध तोळा सदर्हू पदार्थ कुटून दीडपावशेर कच्चे वजन गाईचें तुपांत घालून अग्नीवर कढवावें; नंतर गाळून शिशांत ठेवावें. प्रति दिवशीं अर्ध तोळा घालावें; वर गोड्या एरंडाचें पान घालावें.

## अंगाला लावण्याचें तेल.

तिळाचें तेल २० तोळे, सुंठ अर्ध तोळा, जायफळ १ तोळा, लवंग अर्ध तोळा, कापूर आरतीचा १ तोळा, तुरटी अर्ध तोळा, सदर्हू औषधं कुटून बारीक करून अग्नीवर सदर्हू तेल ठेवून त्यांत घालून कढवावें.

## ग्रीष्मकाळांत अंगास लावावयाचें दुसरें तेल.

तिळाचें तेल २० तोळे, जिरें १ तोळा, आंवळकाटी १ तोळा, वाळहिरडा १ तोळा, ऊद १ तोळा, कंकोळ २ तोळे, कापूर २ तोळे. सदर्हू औषधें कुटून त्यांत सदर्हू तेल घालून अग्नीवर पूर्वीप्रमाणें कढवावें आणि शिशांत भरून ठेवावें व अंगास लावावें.

## वातरक्तावर अंगास लावावयाचें तेल.

सुंठ २ तोळे, बेहडा २ तोळे, आंवळकटी २ तोळे, कापूर २

तोळे, कडुलिंबाचा पाला ५ तोळे, आंब्याचा पाला ५ तोळे, लिंबुणीचा पाला ५ तोळे, डाळिंबाच्या झाडाचा पाला ५ तोळे, तुळशीचा पाला ५ तोळे, जाईचा पाला ५ तोळे, गुलाबाचा पाला ३ तोळे, कण्हेरीचा पाला ३ तोळे, धोतऱ्याचा पाला २ तोळे, रसकापूर ३ मासे, जायपत्री ३ मासे, कचोरा ३ मासे, नागरमोथा ३ मासे, लवंगा तीन मासे, कोष्टकोळिंजन ३ मासे, कंकोळ अर्ध तोळा, वेलदोडे ३ मासे, बेलाचा पाला ४ तोळे, शेंडवाचा पाला २ तोळे, पानवेलीचीं पानें ३ तोळे, गोड्या एरंडाचा पाला ५ तोळे, तिळांचें तेल १ शेर, ऊद १ तोळा, बाळहरीतकी ३ मासे, मैदालकडी १ तोळा, केशर २ मासे, पारिजातक पुष्पें २ तोळे, सफेत चंदन १ तोळा, काडेचिराईत १ तोळा, चिंच्याचा पाला ३ तोळे.

## वायगोळ्यावर औषध तोळेवार.

इंद्रजव ९ तोळे, बाळहिरडा ३ तोळे, बेहडा २ तोळे, काळी मिरीं १ तोळा, पादेलोण ५ तोळे, शेंदेलोण ५ तोळे, समुद्र लवण खावयाचें ४ तोळे, वडागर मीठ ३ तोळे, सोनामुखी ३ तोळे, सुंठ १ तोळा, हुऱ्याचा चीक ७ तोळे. येणेंप्रमाणें औषधें कुटून हुऱ्याच्या चिकांत भेजवून तीं औषधें मातीच्या गाडग्यांत घालून वर झांकण ठेऊन कापड मात घट्ट करून, सुमारें ५० शेणांची थाळ करून तें गाडगें मध्यें ठेवून अग्नि द्यावा. याचा मंत्र औषधाची मुद्रा.

अनुक्रम ५६७ ... दि: ३।३ ...
६०५ ... ९२६८

## उलटा तरकस उलटा तर उलटी चढे महंदावीर.

सदरहू भस्म तयार झाल्यावर त्यांतून अर्ध तोळा अगर बहुतेक दिवसांचा रोग असल्यास एक तोळाभर एकंदर वांटून बारीक करून प्रातःकाळीं द्यावें आणि वर ताक सात आठ रुपये भार द्यावें. पथ्य—आंबट, तिखट, तेलकट, गव्हांची पोळी व तिजबरोबर तूप सात रुपये भार खावें व थोडा भातही खावा.

## धातुपुष्ट.

नागरमोथा ३ मासे, वंशलोचन ५ मासे, वेलदोडे ३ मासे, सालममिश्री २ मासे, तालीमखाना ३ मासे, काळींमिरीं २ मासे, जायफळ २ मासे, खवा १० तोळे, तूप २१ तोळे, गव्हांचें पीठ १५ तोळे, कलमी दालचिनी २ मासे, जिरें ३ मासे, सफेदमुसळी ५ मासे, बारीक पिंपळी १ मासा, जायपत्री २ मासे, कंकोळ २ मासे, खडीसाखर १५ तोळे, बेदाणा ११ तोळे, वसंतकुमार ३ रती, ( पांच तंदुलांची एक रती. )

येणेंप्रमाणें जिनसा कुटून वस्त्रगाळ करून प्रथम कढईत तूप घालून त्यांत गव्हांचें पीठ घालून व त्यांत बेदाणा कुटून मैला करून घालावा. चांगले प्रकारें तुपांत भाजून मग खालीं उतरून मग त्यांत सदहु औषधें घालावीं आणि पळीनें तूप घाटावें आणि त्यांत भस्म व वसंत कुसुमाकर घालून घाटून मग चांगल्या बरणींत अगर कल्हईच्या डब्यांत ठेवावा आणि प्रतिदिवशीं त्यांतून दोन तोळे प्रातःकाळीं व दोन तोळे सायंकाळीं खावा.

## मलशुद्धीवर व अन्नपचनावर चूर्ण.

जायपत्री ३ मासे, कंकोळ २ मासे, पिंपळी बारीक २ मासे, वंशलोचन ३ मासे, विड्याच्या पानाचा रस ४ मासे, वेलदोडे २ मासे, लवंगफुल १ मासा, बाबळीचा पाला २ मासे, मनुका ३ मासे, आंवळकटी २ मासे, सोनामुखी ५ मासे.

येणेंप्रमाणें औषधें कुटून वस्त्रगाळ करून उत्तम मधांत भिजवून तीन तीन माशांच्या गोळ्याप्रमाणें गोळ्या कराव्यात. सायंकाळीं एक गोळी खावी, वर किंचित् उदक घ्यावें.

## चूर्ण धातुशुद्धि, झोंप व रक्तशुद्धीवर.

वंशलोचन अर्धतोळा, वेलदोडे ३ मासे, नागरमोथे ५ मासे, कचोरा ५ मासे, कमलबीजाचा गर ५ मासे, केशर १ मासा, कंकोळ दोन मासे, आंवळकटी ३ मासे, काळींमिरीं १ मासा, सुंठ २ मासे, सफेत चंदन १ मासा, खसखस तीन मासे.

येणेंप्रमाणें औषधें कुटून वस्त्रगाळ करून चूर्ण करावें. या चूर्णांतून प्रत्यहीं ३ मासे चूर्ण उत्तम मध २ मासे घेऊन त्यांत कालवून प्रातःकाळीं व सायंकाळीं घ्यावें.

## यादी पाकाची सौभाग्यसुंठीची.

सुंठ २० तोळे, छोटी पिंपळी ५ तोळे, वंशलोचन ३ तोळे, वेलदोडे २ तोळे, पिंपळमूळ ४ तोळे, हरबऱ्याच्या डाळीचें पीठ दीडशेर, खडीसाखर २ शेर, सराटे ३ तोळे, शतावरी ४ तोळे,

मेथी ३ तोळे, बेदाणा ३ तोळे, बदामगीर ९ तोळे, पिस्ते ४ तोळे, तूप १॥ शेर, खवा १ शेरभर.

येणंप्रमाणें औषधें कुटून वस्त्रगाळ करून नंतर साखरेचा पाक करून ठेवावा. दुसऱ्या भांड्यांत ह्मणजे कढईंत तूप घालून त्यांत हरबऱ्याचें पीठ भाजावें. नंतर त्यांत खवा घालून भाजावा. नंतर तो पदार्थ सर्व साखरेच्या पाकांत घालून अगर साखरेचा पाक त्यांत घालून मग ती कढई खालीं उतरून त्यांत वरील औषध घालून खूप घोटावें. नंतर दोन अगर तीन तोळे प्रमाणाचा लाडु अशा प्रमाणें लाडू करावेत आणि प्रातःकाळीं एक व सायंकाळीं एक असे प्रत्यहीं दोन लाडू खावे.

## औषध नाकांत ओढावयाचें.

गाईचें तूप ३ तोळे, कंकोळ २ मासे.

कंकोळाची वस्त्रगाळ पूड करून ती गाईचे तुपांत घालून अग्नीवर किंचित् तापवून तें तूप एरंडाच्या पानाच्या नळींतून नाकांत सोडून द्यावें.

## मुलाचे पोटांत होतें त्यावर औषध.

दूध गाईचें पावशेर अथवा १० रुपये भार, गव्हाचें पीठ २ तोळे, खडी साखर २ तोळे, तूप २ तोळे, बदामगर २ मासे, येणंप्रमाणें औषधांतून प्रथम गव्हाचें पीठ तुपांत भाजावें. नंतर त्यांत दूध, खडी साखर व बदामगर घालून पळीनें ढवळावें, आ-

णि तें दिवसांतून दोन तीन वेळां थोडें थोडें घ्यावें. वरील औष-
ध चार दिवस करावें.

## चांदी भस्म करण्याची कृति.

चांदी २ तोळे, कागदी लिंबाचीं पानें २ तोळे, वंश लोचन १ तोळा, ज्येष्ट मध १ तोळा, अफु अर्ध तोळा. येणें प्रमाणें औषधें कुटून तीं शेळीच्या दुधांत गोळा करून त्यांतून अर्धें औषध खालीं व अर्धें वर आणि मध्यें चांदी घालून एक गोळा करावा. नंतर तो गोळा एका पांढऱ्या फडक्यांत घालून त्यावर माती कालवून दोन अंगुळें सभोंवता थर द्यावा. आणि तो गोळा उनांत सुकवावा. नंतर एक हात औरस चौरस खळगा काढून त्यांत रानशेणी अगर घरगुती शेणी सुमारें ५० पैकीं प्रथम तळा-ग पांच सहा शेणी घालून त्यांत सदरहू गोळा ठेवून नंतर आजु-बाजूस व वर अशा बाकीच्या शेणींचा थर बसवून अग्नि मध्यभा-गीं घ्यावा. नंतर दुसऱ्या दिवशीं थंड झाल्यावर तो गोळा का-ढून तो न फोडतां दुसऱ्या दिवशीं पूर्वीप्रमाणेंच आंच द्यावी. या-प्रमाणें तीन आंची द्याव्या. नंतर तो गोळा फोडून वंशलोचन एक तोळा त्याची पूड करून त्यांत ती चांदी मध्येंच ठेवून पूर्वी-प्रमाणें फडक्यांत बसवून वर चिकण मातीचा दोन अंगुळें थर देऊन सारखा गोळा करून उनांत वाळवावा. पूर्वीप्रमाणें एक आंच द्यावी. थंड झाल्यावर तो गोळा काढून फोडून त्यांतील लाही प्रमाणें बनलेली चांदी घेऊन खलांत खलून शिशींत ठेवावी.

## वंग भस्म करण्याची युक्ति.

भांग १ शेर, गव्हाचा भुसा १० तोळे, कथील ८ तोळे, हातभर औरस चौरस खळगा खणून त्यांत गोणपाट हांतरून त्याजवर भांग थोडी हांतरून त्याजवर कथिलाच्या पातळ अर्ध्या अर्ध्या पैप्रमाणें तुकड्यांचा थर हांतरावा, आणि त्याजवर गव्हाचा भुसा हांतरावा आणि त्याजवर गवऱ्या अगर वरमुती शेणी घालून खळगा भरावा आणि अग्नि द्यावा. नंतर थंड झाल्यावर सदरहु तुकड्याच्या लाह्या होतील. त्या खलामध्यें बारीक करून ठेवाव्या. यास वंग भस्म ह्मणतात. हें घेण्याचें अनुपान. दुधाची साय अगर मलई २ तोळे, खडीसाखर अर्ध तोळा, यांतून सदरहू भस्म प्रत्यहीं दोन गुंजा घ्यावें व याचे अनुपानांतून अभ्रक एक गुंज घ्यावा.

## ताम्र भस्म करण्याची कृति.

मेथी २ तोळे, हिंग १ तोळा, कमलबीज अर्ध तोळा, तांबें २ तोळे. प्रथम तांबें गोमूत्र पावशेर त्यांत घालून चुलीवर कढवावें, नंतर साफ पाण्यानें धुऊन घोरीचें पावशेर दुधांत उकळून नंतर साफ पाण्यानें धुऊन नंतर मेथी, हिंग व कमलबीज यांची बारीक फक्की करून एक हात औरस चौरस खळगा खणून त्यांत तळांत कांहीं शेणींचा थर हांतरून नंतर वरील चूर्ण अर्धें खालीं व अर्धें वर आणि मध्यें सदहू तांब्याचा पत्रा ठेवून वर फडकें बांधून त्याच्या सभोंवतीं चिकणमातीचा दोन अंगुळें थर देऊन तो गोळा उन्हांत

वाळवावा आणि तो गोळा सदर्हू खळग्यांत ठेवून खालीं वर शेणींचा थर बसवून अग्नि द्यावा. नंतर थंड झाल्यावर पुन्हा दुसऱ्या दिवशीं त्याच गोळ्यास आंच पूर्वीप्रमाणें द्यावी. अशा पांच आंची द्याव्या. नंतर तो गोळा फोडून त्यांतील तांब्याचा तुकडा भाताच्या तांदुळांत पुरून दहा दिवस ठेवावा. दहा दिवसांनंतर काढून खलांत बारीक खलून कुपींत भरून ठेवावें.

## हें भस्म घेण्याचा प्रकार.

मध १ मासा, वंशलोचन १ गुंज, वेलदोडा १ यांतून सदर्हू भस्म एक गुंज प्रत्यहीं प्रातःकाळीं एकवार घ्यावें. खाणें चांगले प्रकारें असावें.

## पुष्टिकारक व धातुशुद्ध औषध.

कोंहोळ्याची साल छायाशुष्क करून त्याची बारीक वस्त्रगाळ फकी करून तिच्या मानानें खडीसाखर तींत मिश्र करून ती फकी एक तोळा प्रत्यहीं प्रातःकाळीं व एक तोळा सायंकाळीं घ्यावी; ही फकी बहुतकरून उष्ण काळांत घेण्यास फार प्रशस्त आहे.

## इंद्रिय जुलाब.

दूध १ शेर घेऊन त्यांत २ शेर पाणी घालून २ तोळे कलमी सोरा घालून घ्यावें; दरएक वेळेस ग्लास ग्लास घ्यावें. याप्रमाणें दोन चार वेळ घ्यावें आणि आपल्यास रेच पुरे आले हा-

णजे औषध घेण्याचें बंद करावें. ह्मणजे रेच बंद होतील.

वरच्या जुलाबाचा उतार दूधभात जेवावा.

## धनंजयवटी चूर्ण.

कलमी दालचिनी १ तोळा, वंशलोचन १ तोळा, कंकोळ १॥ तोळा, वेलदोडे ४ मासे, सुंठ अर्ध तोळा, कचोरा १ तोळा, नागरमोथा ३ मासे, गोखरूं २ मासे, जेष्ठमध १ तोळा, सालं-मिश्री २ तोळे, सफेतमुसळी १ तोळा, तालीमखाना १ तोळा, इसबगोल १ तोळा, सफेत चंदन अर्ध तोळा, केशर २ मासे, बारीक पिंपळी १ मासा, खडी साखर ७ तोळे,

येणेंप्रमाणें औषधांचें चूर्ण करून वस्त्रगाळ केल्यावर त्यांत कांतीसार पांच रती घालून शिशांत ठेवावें आणि प्रत्यहीं प्रातः-काळीं एक तोळयाप्रमाणें द्यावें.

## केस येण्यास औषध.

कलमी सोरा एक तोळा, बदाम गीर १ तोळा, गंधक जेन्या अर्ध तोळा, तिळाचें तेल ५ तोळे येणेंप्रमाणें औषधें बारीक करून तिळांच्या तेलांत घालून तें तेल अग्नीवर जरा कढवावें नंतर गाळून शिशांत भरून ठेवावें, आणि प्रत्यहीं निजते वेळीं अर्ध तोळा तेल मस्तकावर घालून वर गोड्या एरंडाचें पान बा-लावें ह्मणजे केस येतील.

## मल शुद्धीवर चूर्ण.

मुरवारी हिरडे २ तोळे, सोनामुखी २ तोळे, रेवाचिनी २

तोळे, सैंधव १ तोळा, पादेलोण अर्ध तोळा, मिरीं अर्ध तोळा, सुंठ अर्ध तोळा, यांचें चूर्ण करून रात्रौ ऊन पाण्याशीं ३ मासे द्यावें ह्मणजे सकाळीं शौचास साफ होतें.

## चंदनादि चूर्ण.

कंची पांढरा चंदन, तगर, वंशलोचन, वाळा हीं समभाग व सर्वांबरोबर खडीसाखर घालून चूर्ण करून नित्य ३ मासे दोन वेळ दुधांत देत जावें, ह्मणजे दाह, पित्त व उन्हाळे इत्यादि रोग दूर होतात.

## चोपचिनी चूर्ण.

चोपचिनी पाव तोळा, पिठीसाखर ४ तोळे, पिंपळी, पिंपळ मूळ, मिरीं, लवंग, अकलकारा, खुरासनी, ओवा, सुंठ, वावडिंग, दालचिनी, यांचें चूर्ण ऊन पाण्याबरोबर देणें ह्मणजे प्रमेह, उपदंश, क्षीणता, उपदंशानें धरलेले सांधे असतील ते बरे होतील.

समाप्त.

शिरा, संधी, कमर, छाती, पोट, पाठ, बोटें, आमाशय इ. शरीरस्थ वायू व ठणका तसेंच खरूज खौंड गळवें व्रण. हे सर्व विकार त्वरीत बरे करतें. डबी. १० आणे.

६ नेत्रांजन. डोळ्यांतील फुलें, बिंदु, वडस, सारा, लाली, कंडु, फूट, श्राव, चिकटा, खुपऱ्या, हे रोग फार त्वरीत बरे होतात. डबी १ रु.

७ पटकी, अजीर्ण, थंडी, इत्यादि, जुलाब २ गोळ्यांनींच बंद होतात ही प्रतिज्ञाच आहे. सोळा गोळ्यांची डबी १ रु०.

८ आमांश तांबडा, पांढरा, मिश्र, ८।१० गोळ्यांतच कायम बंद होतो. १६ गोळ्यांची ड० १ रुपया.

९ संग्रहणी, जंत, कृमि, व तत्संबंधीं अतिसार अग्निमांद्य, ज्वर, अरुची, पोटदुखणें, हे रोग त्वरीत बरे व्हावयाचेच डबीस १ रुपया.

१० दंतरक्षकपूड—ही चोळिल्यानें दांतांतील व्रण, कीड, रक्त, पू. इत्यादि रोग जाऊन दांत त्वरीत स्वच्छ व मजबूत होतात. हिच्या सतत सेवनानें दंतरोग कधींच होत नाहीं. डबी ६ आणे.

११ विंचवाचें वीष, औषध लावितांच तात्काल उतरतें इतक्या प्रतिज्ञेचें औषध दुसरें कोठेंही नाहीं. ३ तोळ्यास ८ आणे. इतकें ४० मनुष्यांस पुरतें.

१२ दमा ( श्वासव्याधि ) व तत्संबंधीं ज्वर, कफ, घुरघुर,

इत्यादि सर्व विकार १२ दिवसांत जातात. डबी १ रुपया.

१३ वीर्यस्तंबकगुटि. ही सेवन केल्यानें थोड्याच दिवसांत कांहीं कारणांनीं आलेलें नपुंसकत्व इंद्रीयशिथीलता, कडकी, इ० विकार जाऊन धातू व रक्त यांची शुद्धि आणि वृद्धि होते. पातळ झालेलें वीर्य घट्ट होऊन त्याचें स्तंभन होतें. शक्ति वाढते. स्त्रिया अथवा पुरुष यांस उपदंश वगैरे रोगांपासून झालेला अशक्तपणा ह्यापासून नाहींसा होऊन उभयसंबंधें संततीस आडथळा आणणाऱ्या सर्व रोगांचें निवारण होतें. डबीस ५ रुपये.

औषधें खात्रीचीं असल्याबद्दल हजारों सर्टिफिकीटें आहेत. याशिवाय आणखी मोठ्या मोठ्या रोगांवर नवीन खात्रीचीं औषधें व ग्रंथस्तमात्रा, रसायनें, धातूंचीं भस्में, पाक, तेलें, चूर्णें, गोळ्या वगैरे माफक दरानें देऊं. बंगी नाटपेड. किं० आगाऊ. औषधें व्हाल्युपेएबल पार्सलनेंही पाठवूं. पत्ता सुवाच्य. अनुपान खर्चासोबत देऊं. एक आणा पाठवा बहुत औषधांची छापील यादी पाठवूं. आमचेकडे "गुलाब, हिना, केवडा, बकुल" इ० सुगंध अत्तरें व मसाल्याचीं तेलें माफक दरानें उत्तम प्रकारचीं मिळतील.

कृष्णशास्त्री त्रिबलकर वैद्य.
मु० आंजर्ले ता० दापोली जि० रत्नागिरी.

॥ श्री ॥

# सुलभ प्रसूति

अर्थात्

## गर्भविमोचनसंबंधीं माहिती.

हें

पुस्तक

**मोरो विनायक शिंगणें**

यशवंतविजया नाटिका व मुंबईचा वृत्तांत

ह्या पुस्तकांचे कर्ते यांनीं तयार केलें

तें

मुंबईंत

"श्री कल्पतरु प्रेस" मध्यें छापून प्रसिद्ध केलें.

सन १८९१.

यापुस्तकासंबंधीं सन १८६७ च्या २५ व्या अक्टाप्रमाणें ग्रंथकर्त्यानें सर्व प्रकारचे हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत दोन आणे.

# सूचना.

आपल्या हातून आपल्या देशभगिनींची कांहीं तरी सेवा घडावी ह्या मुख्य हेतूनें हें लहानसें पुस्तक मीं लिहिलें आहे. मी स्वतः डाक्टर नसतांही हें धाडस केलें आहे, तरी पण हें त्यांस थोडेंबहुत तरी उपयोगी पडेल अशी मला उमेद आहे. हें पुस्तक लिहितांना चाईल्डबर्थ नामक इंग्रजी व लोकप्रिय डा. भालचंद्र कृष्ण भाटवडेकरकृत अबलासंजिवनी, के. डा. सखाराम अर्जुनकृत गृहिणीकंठभूषण, सुईण वगैरे पुस्तकांचा बराच उपयोग केला आहे. ह्या पुस्तकांत गरोदर स्त्रीनें कोणत्या प्रकारें वर्तन करावें, बाळंत झाल्यावर कसें वागावें व मुलांची सुश्रुषा कशी ठेवावी वगैरे विषय विशेष पाल्हाळ न करितां थोडक्यांत लिहिले आहेत. करितां माझ्या आर्य भगिनींस एवढीच विनंति आहे कीं, त्यांनीं एकवार तरी हा माझा वेडा वांकडा प्रयत्न वाचून व त्यांतील सूचनांकडे लक्ष देऊन वेळीं त्यांचा उपयोग करून घ्यावा. ह्या माझ्या प्रयत्नाचा कांहीं उपयोग होतो असें ऐकल्यानें माझ्या श्रमाचें सार्थक्य झालें असें मी समजेन. ह्या पुस्तकांत दोष राहिले असल्यास त्यांकडे लक्ष न देतां फक्त गुणग्रहण करावें अशी माझी सर्वांस विनंति आहे.

हें पुस्तक लिहितांना माझे मित्र रा. रा. बाळकृष्ण बापू आचार्य ह्यांनीं जें मला सहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

पुस्तककर्ता.

मुंबई, काकडवाडी
घर नंबर ४ गिर-
गांव. २९ मे १८९१.

११८
मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ३३७
२४३४

# सुलभप्रसूति

अर्थात्

## गर्भविमोचनसंबंधीं माहिती.

**घरांतील सुख**—मनुष्यास सुख-प्राप्त व्हावें ह्मणून प्रथमतःच ह्या जगांत जगन्नियंत्या परमेश्वरानें आह्मा मानवी प्राण्यांमध्यें कुटुंबव्यवस्था लावून दिली आहे. ह्या कुटुंबांत नवरा आणि बायको अशीं दोन मनुष्यें निर्माण करून त्यांनीं मोठ्या प्रीतीनें रहावें, एकमेकांस एकमेकांनीं सुख द्यावें, एकमेकांस उपयोगी पडावें असे नियम घालून दिले. अशा रीतीनें त्यांनीं आपला काळ आनंदांत घालवून ज्या प्रभूनें आपणास नरदेह दिला ज्यानें आपणास सुख-संपत्ति दिली, आणि जो आपला हा संसार सुखानें चालण्यास सामर्थ्य देतो, त्या प्रभूचे गुणानुवाद गाऊन इहपरत्रीं ह्या मनुष्यदेहानें सार्थक करून घ्यावें हाच त्यांनीं आह्मांस नरतनु देण्याचा मुख्य उद्देश. अशीं दंपत्यें नांदत असतां त्यांस एखादें मूल झालें कीं तो आनंद दुणावतो, एवढेंच नाहीं तर, तीं पूर्वींपेक्षांही एकमेकांवर जास्त प्रीति करूं लागतात. त्यांस प्रथमचेंच मूल झालेलें असलें ह्मणजे त्यांच्या आनंदास पारावार नसून त्यांस असें होऊन जातें कीं ह्यास कोठें ठेऊं व कोठें नाहीं. तीं त्याजकडे वारंवार पाहतात, वारंवार त्याचे मुके घेतात, आणि त्यास वारंवार कुरवाळतात. अशा अनेक तऱ्हेनें ते आपली मुलांवरील प्रीति प्रदर्शित करितात. एकदां का तें किंचित् बोलूं लागलें कीं, त्याचे ते मंजुळ शब्द ऐकण्यास तीं इतकीं आतुर होऊन जातात कीं त्यापुढें गंधर्वांचें गानही मं-

मूळ वाचाचा ध्वनिही त्यांस तुच्छ वाटतो! पंत ह्मणतात- " जारे बोबडे पित्यानें मन मोहावें तथापि तोकानें " मुलाचे कसेही वेडेवांकडे बोबडे शब्द असले तरी त्यांनीं मातापितरांचें मन मोहून जावयाचेंच! सारा दिवस श्रम करून थकला भागला मनुष्य घरीं आला आणि त्यानें जर आपल्या मुलांचीं प्रफुल्लित अशीं मुखकमलें बघितलीं तर त्यास झालेले सगळे श्रम तो चट्सारे विसरून जातो. मुलें निरोगी असतात त्यावेळीं त्यांस मोठा आनंद होतो, पण तींच जरका दुखणाईत झालीं तर त्यांचें मन काळजीनें ग्रस्त होऊन त्यांस अन्नही गोड न लागून रात्रंदिवस तळमळ लागते. आईबापांची मुलांवरील प्रीति तर मोठी विलक्षण असते! तर अशीं जीं आपलीं लाडकीं मुलें त्या मुलांचा गर्भ राहिल्या दिवसापासून प्रसूतिकाळपर्यंत व पुढेंही त्यांस कोणते उपाय योजले असतां सुख होईल अशा विषयीं विचार करूं.

## प्रसूतीपासून होणारे भयंकर परिणाम.

आपल्या देशांत गर्भविमोचन विद्येविषयीं अज्ञान असल्यामुळें फारच भयंकर परिणाम घडून येत असत व हल्लींही घडतात. असले परिणाम मागें इंग्लंद देशांत सुद्धां तिकडे ह्या विद्येचा प्रसार नसल्यामुळें वारंवार घडून येत असत. परंतु, आतां ह्या ज्ञानाचा प्रसार तिकडे झाल्यादिवसापासून मुलांच्या मरणाची संख्या फारच कमी होत चालली आहे. प्रसूतीपासून स्त्रियांस मोठमोठे रोग जडतात, त्यांची शक्ति कमी होते, आंगांतील धमक नाहींशी होऊन त्यांस पांडुरता येते, कधीं कधीं त्यांच्या जिवावरही बेततें, कधीं लेंकरूं व त्याची आई हीं दोन्हीही आजारी होतात, कधीं गर्भाशय स्थानभ्रष्ट होतो, अशा तऱ्हेचे अनेक भयंकर परिणाम घडतात. आतां हे भयंकर परिणाम कशामुळें घडतात ह्याविषयीं विचार करूं लागलों तर आपल्या नजरेस असें येईल कीं, गर्भविमोचन विद्येविषयीं अज्ञान हेंच होय. वर दिलेल्या कारणांशिवाय आणखी १ स्वच्छ हवा, २

मराठी ग्रंथ संग्रहालय

पौष्टिक आहार, व स्वस्थता ह्यांचा अभावही वरील प्रकारास बहुतांशी कारणीभूत होतो ह्मणून प्रत्येक मनुष्यानें प्रसोदर स्त्रीस जेणेंकरून सुख होईल असे उपाय योजले असतां प्रमेहादिकरून फारसे भयंकर परिणाम होण्याचा संभव कमी. शुद्ध हवा ही मनुष्याची शक्ति वाढविण्यास अत्यावश्यक आहे. व्यायाम करण्याचीही संवय असली पाहिजे. घरांतल्याघरांत कोंडून घेतल्यानें कधीं कधीं क्षयाचे उपद्रव होण्यास उशीर लागत नाहीं.

## निरोगी व सुदृढ मलें होण्याचा उपाय.

अशी एक ह्मण आहे कीं " बाप तसा लेंक" बापच जर अशक्त, दम्या किंवा कागदी पहेलवान असेल तर त्यास मुलें देखील तशींच होणार. तर असें न व्हावें व प्रजा सुदृढ व निरोगी व्हावी ह्मणून पुढील गोष्टींकडे अवश्य लक्ष दिलें पाहिजे.

## शरिराची पूर्ण वाढ.

साधारणपणें आपण घर जरी बांधावयास घेतलें तरी त्यास मजबूत पाया घालतों, तेव्हां तें मजबूत होऊन कांहीं कालपर्यंत टिकतें. तेंच जर कच्चे पायावर उभारलें तर तेव्हांच पडून जावयाचें. हीच स्थिति मनुष्यास लागू आहे. वैद्यशास्त्राप्रमाणें मनुष्याची पूर्ण वाढ होण्याला पुरुषास २५ व स्त्रीस १६ वर्षें पुरीं झालीं पाहिजेत; ह्मणजे २५ वर्षांनंतर पुरुषाचें व १६ वर्षांनंतर स्त्रीचें लग्न करावें. पण ही चाल प्रचारांत येण्यास अजून बराच अवकाश पाहिजे. आमच्या देशांत हल्लीं बाललग्नाची चाल इतकी कांहीं जारीनें चालू आहे कीं, तिच्या योगानें आह्मी वीर्यहीन झालों, आमचें शौर्य गेलें, आमचें वैभव गेलें, आमचा मान नाहींसा झाला, आमची मानसिक शक्ति कमी होत चालली व त्यामुळें आह्मी बलहीन झालों. यामुळें परकीय लोक आमची पायमल्ली करूं लागले व शेवटीं तिशी पुरी झाली नाहीं तोंच आह्मांस अंधत्व येऊं लागून चाळिशीच्या सुमारास

हातांत काठी लागूं लागली, गाल बसूं लागून केंसांस पांडुरता आली; डोळ्यांवर चाळिशी येऊन बसली व हळुहळू मृत्यूची वाट बघूं लागतों न लागतों इतक्यांत आह्मी नातवाचे धनी झालो. एवढें कशानें झालें? तर वर सांगितल्याप्रमाणें आमच्या बालविवाहाच्या चालीनें. आधींच अशक्त त्यांत मागें बायकोचें लोंढण. तिसी लोटून तिसरूटही फुटलें नाहीं तोंच एक दोन मुलें ' बाबा बाबा ' ह्मणत पाठीमागें आहेतच ! तेव्हां अर्थात आह्मास आमची वाढ पूर्ण होऊं देण्यास अवकाश नसतो. मग सुदृढ होऊन दीर्घायु होण्याची गोष्ट लांबच राहिली !

आरिस्टाटल ह्मणून ग्रीस देशांत एक प्रसिद्ध तत्ववेत्ता होऊन गेला. त्यानें दोन हजार वर्षांपूर्वी असें ह्मटलें आहे कीं, वीर्यसंचय पूर्ण होण्यापूर्वी स्त्रीसंभोग केल्यानें प्रजा दुर्बळ होते मुलांपेक्षां मुलींचा भरणा फार होतो व तीं ठेंगणीं होतात. हा प्रकार जेथें लवकर लग्न करण्याची चाल आहे तेथें दृष्टीस पडतो. हा नियम मनुष्यांसच लागू आहे एवढेंच केवळ नव्हे तर जनावरांसही लागू पडतो. बालपणीं लग्न होऊन ज्यांचा पुरुषांबरोबर संबंध लवकर जडतो त्या वयांत येऊन लग्न झालेल्या मुलींपेक्षां बहुतांशीं वांझ निपजण्याचा संभव जास्त असतो

आपल्या देशांतील हवा उष्ण असल्यामुळें बहुतकरून स्त्रीस १२ किंवा फार झालें तर १३ वे वर्षी न्हाण येतें. न्हाण आलें ह्मणून शरीरांतील सर्व अवयव पूर्ण विकास पावतात असें मुळींच होत नाहीं. न्हाण आल्यापासून पुढें तीन वर्षांनीं गर्भधारण संस्कार करावा अशी वेदाज्ञा आहे, पण ती आह्मी कोणीकडच्या कोणीकडे झुगारून देऊन तिच्या ऐवजीं न्हाण आल्यादिवसापासून १६ दिवसांचे आंतच ओटभरण झालें पाहिजे असें शास्त्र घेऊन बसलो आहों. होणार त्यास उपाय नाहीं. कलकत्यांतील नामांकित डॉक्टर महेंद्रलाल सरकार असें ह्मणतात कीं " कोणत्याही स्त्रीस न्हाण आल्याबरोबर तिचें गर्भाधान झालें तर तिच्यापासून सुदृढ प्रजा कशी

उत्पन्न व्हावी? दांत हे कठीण पदार्थ चावण्याकरितां दिले आहेत हे निर्विवाद आहे. पण ज्या लहान मुलांस नुकतेच दांत अलेले आहेत अशा मुलांस फक्त कठीण पदार्थावर ठेऊं गेले तर त्यापासून किती भयंकर परिणाम होतील बरें!"

मुलींस लेंकरांच्या आया होऊं देण्यापेक्षां त्यांस गर्भधारणाच्या पूर्ण वयापर्यंत वाढूं देणें हें फार चांगलें. सोळा वें वर्ष हें गर्भ धारणास उचित वर्ष आहे अठरावें त्यापेक्षा चांगलें. विसावें तर त्याहीपेक्षां उत्तम. पुरुषाचें वय २०च्या वर असावें. २५ वें त्याच्यापेक्षां उत्तम. हें वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच असेल. साधारण १५वे वर्षापासून तों ४५ वे वर्षापर्यंत स्त्रियांमध्यें गर्भधारण करण्याची शक्ति असते. आपल्या देशांत ११ व्या वर्षीसुद्धां स्त्रियांस मुलें झालेलीं पाहण्यांत येत त

## गर्भारपण.

**गर्भाशय व गर्भधारण चिन्हें**—गर्भाशयाचा आकार मांसाळ पिशवीसारखा असून चापटलेल्या पेरूप्रमाणें असतो. हा बहुतकरून सर्व बाजूंनीं मांसाच्या दोऱ्यांनीं वेष्टित असून त्या एकमेकांत गुंतलेल्या असतात व त्यास रक्तवाहिन्यांच्या योगानें पोषण मिळतें. गर्भाशयाचे मुख्य दोन भाग असतात. पहिला भाग वर असून मोठा असतो. येथेंच गर्भधारण होतें. खालचा भाग गर्भारपणांत वरच्या भागाच्या लगतच राहून शेंवडासारख्या पदार्थाचा त्याजवर दट्टया असतो. त्यास जरायु ह्मणतात. जसजसा गर्भ वाढतो तसतसा गर्भाशयही वाढत जातो.

स्त्रीस श्रम होऊन तिला ग्लानी येणें, तहान लागणें, मांड्या भरून येऊन आंग जड होणें, स्त्री ऋतुव्यापार पुरा होऊन उठल्यानंतर शुक्रशोणित बाहेर न पडणें, व जननेंद्रियाचें स्फुरण होणें, आनंद वाटणें; सर्वांगावर शहारे येणें, छाती उडणें हीं सर्व साधारणपणें गर्भधारणाचीं चिन्हें जाणावीं. गर्भ राहिल्यावर कोणताही विकार न होतां जर पूर्णपणें ऋतु

व्यापार बंद असला तर तें गर्भधारणाचें विश्वसनीय चिन्ह जाणावें. एकदां गर्भ राहिला ह्मणजे हळूहळू स्तनांची वृद्धि होऊं लागून ते गांठळ व स्पर्शासह्य होतात, व चूचुकासभोंवतालचा भाग ( कुचाग्रभाग ) काळसर तांबडा होतो. तोंडास पाणी सुटतें व शरीर कृश होतें.

**गर्भाशयांतील वाढ.**—पुरुषाच्या अंडाप्रमाणें गर्भाशयाच्या दोहों बाजूस व त्यांशीं बांधलेले असे स्त्रियांच्या शरीरांत पोटाच्या खालच्या भागीं बदामाएवढे अंडाशय नामेंकरून दोन पिंड असतात. ह्या दोन्हीं पिंडांत बीजरूपी अति सूक्ष्म ह्मणजे केवळ सूक्ष्मदर्शक यंत्रानें दिसणारे असे सजीव पिंड उत्पन्न होतात. पहिल्या महिन्यांत गर्भ मोठ्या मुंग्यापेक्षां जास्त मोठा नसतो. दुसऱ्या महिन्यांत एक इंचाएवढा होतो, त्यावेळेस शरीरापेक्षां डोकें मोठें असतें व हातपाय फुटूं लागतात. तिसऱ्या महिन्यांत पांच अंगुळांपर्यंत गर्भ वाढतो त्यावेळीं बोटें दिसूं लागतात. ह्याच महिन्यांत गर्भाशयाचा आणि त्याचा संबंध सुदृढ नसल्याकारणानें तो बहुधा पतन पावतो. चवथ्या महिन्यांत त्याची वाढ सहा अंगुळांपर्यंत होते व ह्याच महिन्यांत गर्भ कोणत्या जातीचा आहे ह्याची ओळख होऊन गर्भास चलनशक्ति आल्याचा भास होतो. ह्यासच चैतन्योत्पत्ति ( गर्भाचें चलनवलन ) ह्मणतात. हीं १४० दिवसांनीं सुरू होते. ह्याचवेळीं गर्भास जीव आला असें समजतात. पांचव्या महिन्यांत त्याची वाढ ९ इंच होते. ह्या महिन्यांत गर्भ बाहेर आला तर लागलाच मरतो. सहाव्या महिन्यांत त्याची वाढ एक फूट होते. ह्या महिन्यांत जन्म झाल्यास तो फार तर तास दीड तास वांचतो. सातव्या महिन्यांत तो पंधरा इंचांपर्यंत वाढून केंस वाढण्यास सुरुवात होते. ह्या महिन्यांत जन्म झाल्यास तो कित्येक दिवस वांचूं शकेल पण वाढणार नाहीं. आठव्यांत त्याची वाढ सोळा इंचांपर्यंत होते. ह्या महिन्यांत जन्मलेल्या मुलाचा आवाज अगदीं बारीक असतो खरा, पण तें वाढतें. नववा महिना किंवा २८० दिवस अगर ४०

सप्तकें होऊन जर मुलाचा जन्म झाला तर तो सुदृढ होऊन वांचतो व त्याचे सर्व अवयव पूर्ण झालेले असतात.

गर्भाशयामध्यें मूल असतें त्यावेळीं त्याचें पोषण त्याच्या आईच्या रक्तापासून होतें. गर्भाच्या नाभींत नाळ असतें त्याचा आणि गर्भाचा संबंध असतो. तेथून तें रक्त येऊन बाळकास मिळतें. गर्भाशय आणि नाळ हीं दोन्हीं रक्तानें भरलेलीं असतात. ह्यांचीं द्वारें जरी मोकळीं नसतात तरी त्यांजवरील आवरण इतकें पातळ असतें कीं, त्यांतून आईचें रक्त मुलाच्या आंगांतील रक्तास स्वच्छ राखूं शकतें. नाळांत तीन रक्तवाहिन्या (शिरा) असतात, त्यांतून दोन नळ्या गर्भास स्वच्छ रक्त पुरवितात आणि एक गर्भाच्या आंगांतील अशुद्ध रक्त स्वच्छ करण्याकरितां बाहेर काढिते. हें नाळ दाबून धरलें किंवा कापून टाकिलें तर मनुष्याच्या गळ्याला दोरीनें आंवळून गच्च बांधिलें ह्मणजे तो जसा तडफडून मरून जातो, तशीच अवस्था गर्भाची होऊन तो मरून जातो. गर्भाशयांत पाण्यासारखा एक प्रकारचा पातळ पदार्थ असतो. हा पदार्थ गर्भाशय नेहमीं प्रसृत ठेवतो व तो प्रसृत राहिल्याच्या योगानें गर्भावर जरी दाब पडला तरी त्यास धक्का न पोंहचतां तो सुरक्षित राहून त्यास स्वस्थपणें वाढतां येतें. गर्भाशयांत असतां खालीं डोकें व वर पायें ह्याप्रमाणें गर्भाची स्थिति नेहमीं राहून हात छातीवर असतात.

**गर्भावस्थेचे दिवस जाणण्याविषयींची माहिती**—वर विदित केल्याप्रमाणें गर्भिणी स्त्रियांचें रजोदर्शन बंद राहिल्यादिवसापासून तों प्रसूति होईपर्यंत ४० सप्तकें ( आठवडे ) किंवा २८० दिवस लागतात. आतां एवढें खरें कीं, हे दिवस स्त्रीपुरुषांच्या वयाच्या मानानें पाहूं गेलें तर अधिकउणे होतात. भर तारुण्यांत जर स्त्री गरोदर राहिली आहे, तर वरील दिवसांपेक्षांही ती बाळंत होण्यास कांहीं दिवस कमी घेईल व तीच जर तारुण्यदशेच्या बाहेर गेली आहे तर प्रसूतीला वेळ अधिक घेईल. चैतन्यो-

त्पत्ति ही कधीं कधीं दिवस मोजण्याचे कामीं मोठी मदत करिते. पण साधारणतः हिचा सर्वच स्त्रियांत भास होतो असें नाहीं. समजा एखादी बाई जानेवारीचे १८ वे तारखेस गरोदर राहिली, तर, वर सांगितल्याप्रमाणें तिला. जून महिन्याचे तिसऱ्या किंवा चौथ्या तारखेस चैतन्य येऊन ती अक्टोबर महिन्याचे २२ वे तारखेस किंवा एक दोन दिवस अलीकडे किंवा पलीकडे खचित प्रसूत होईल. मनुष्य प्राण्यामध्यें गर्भ ३०० दिवसांवर आजपर्यंत कधींच गेली नाहीं. पण कित्येक वैद्य ३११ दिवसांचें प्रमाण धरितात.

जाति—एकदां गर्भ राहिला ह्मणजे कित्येक लोक जोशाकडून प्रश्न पाहतात. मग जोशी पृच्छकाच्या इच्छेचा कल पाहून मुलगा किंवा मुलगी होईल असें सांगतात. त्यामुळें स्त्रियांस आनंद होतो. पण त्याविरुद्ध आल्यास त्यांची उत्कट इच्छा पूर्ण न होऊन भयंकर परिणाम होतात. कित्येक समवयस्कस्त्रिया जी स्त्री गरोदर असेल तिला फसवून धोत्रा खाऊं घालतात, आणि जेव्हां त्याचा अम्मल तिच्यावर बसतो तेव्हां त्या उन्मादांत ती भलभलते चाळे करूं लागते. पुरुषासारखे भाषणाचे प्रकार असल्यास मुलगा होईल असें अनुमान करितात, व स्त्रियांसारखें भाषण केल्यास कन्येचें अनुमान करितात. पण ज्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या वयामध्यें अंतर असेल त्याप्रमाणें पुरुष जातीची संतति होण्याचा विशेष संभव असतो.

अलीकडे कित्येक शोधकांनीं स्त्रीपुरुष जातीच्या निर्णयाविषयीं बरेच शोध लावले आहेत त्यांपैकीं कांहीं खालीं देतों—

उजवा स्तन डाव्यापेक्षां मोठा होऊन त्यांतून पातळ व पांढरा चीक येतो. स्तनांचीं मंडळें जांभळ्या रंगाचीं होतात. कपाळपट्टी व नाकाचा शेंडा हीं तकतकीत दिसतात. उजव्या बाजूनें पोट मोठें होतें व गर्भ उजव्या बाजूस फिरतो; नेंबी. उथळ होते व पाव इंच वर येते. चालतांना उजवा

...य पुढें जातो व तो हलका पडतो. आंगावर विशेष तजेला येतो. अशी लक्षणें ज्या स्त्रीस होतात त्या स्त्रीस मुलगा होईल म्हणून खास समजावें. स्तनांतून पिंवळा चिकट पदार्थ येणं, रुगळें तोंड तुकतुकीत दिसणं, स्तनां-चीं मंडळें काळ्या रंगाचीं होणें, गर्भ डाव्या बाजूस फिरूं लागणें, श्वा उथळ होणं पण तिचें वर न येणें, डावा पाय पुढें टाकून तो भारी पडणें ही लक्षणें होत असलेल्या स्त्रीस मुलगी होईल असें समजावें.

## गरोदर स्त्रीचें वर्तन.

गरोदर स्त्रीची प्रकृति चांगली असेल तर तिनें घरांतील नेहमीचा काम-धंदा अवश्य करावा, पण जसजसे महिने अधिक भरत जातात तसतसे तिनं श्रमाचें काम करण्यास झटूं नये. काम केल्यावांचून सुटकाच नसेल तर मधून मधून विश्रांति घेत जावी गरोदर स्त्रीनें पुढें दिलेल्या गोष्टींच्या संबंधानें विशेष खबरदारी ठेवावी. ओझें उचलणें व चढउतर करणें, नाचणं व घोड्यावर बसणं, एकाएकीं भीति उत्पन्न करणाऱ्या गोष्टी व संताप, भयहेतुक पदार्थाचें दर्शन व उच्चनीच आसनावर बसणें, मलमूत्रावरोध, शरीरास त्रास देणं, रें कर्म व मैथुन, अधिक भक्षण व रात्रीस जागरण, शोक व ज्या पदार्थांपासून तृप्ति होत नाहीं अशा पदार्थांचें सेवन, इत्यादि गोष्टीपैकीं कोणतीही गोष्ट जर घडून आली तर त्या योगानें गर्भस्राव होण्याचा संभव असतो म्हणून ती अवश्य टाळावी.

अन्न हें नेहमीं हलकें असून शरीरपोषक असावें. गर्भारपणीं स्त्रियांचें पुष्कळ वस्तूंवर मन जातें; पण ज्या वस्तूंवर त्यांचें मन गेलें असेल त्या जर अपायकारक नसतील तर त्यांनीं त्या खुशाल खाव्या, पण त्याच जर अपायकारक असतील तर मुळींच वर्ज कराव्या.

कधीं कधीं असें होत कीं स्त्रिया आपली इच्छा भलत्याच अपायकारक वस्तूवर दाखवून त्या ती भक्षण करितात, पण त्यापासून त्यांसच त्रास पोहचतो असें नाहीं, तर त्यांच्या गर्भातील लेंकरासही तें त्यांचें स्ना-

णें नडतें. ह्या असल्या अपायकारक जिनसा खाण्याची इच्छा त्यांस डोहाळे होतात तेव्हांच बहुतकरून होते, एरव्हीं होत नाहीं. करितां असल्या विकार वासना मनांत न येऊं देण्याविषयीं त्यांनीं जपावें हें चांगलें. स्त्रिया गरोदर असतां त्यांची मनोवृत्ति पालटून त्या क्षुब्ध होतात. ह्याचें कारण गर्भाशयाचा आणि मस्तकांतील मेंदूचा चमत्कारिक संबंध असतो व त्याच्या अव्यवस्थेमुळें त्यांस एक प्रकारचा उन्माद उत्पन्न होतो. ह्यामुळें त्या शीघ्रकोपी व चिरडखोर होतात. व कांहीं अंशीं स्वच्छंदी होऊन आपल्या मनांतील लहरीप्रमाणें कधीं कधीं अविचारानें वागूं लागतात. अशा स्थितींत त्यांस दटाविलें असतां किंवा त्यांच्या मनांत जो विचार आला असेल तो न करूं दिल्यानें त्या शांत होण्याबद्दल अधिक क्रोधास चढतात. अशा प्रसंगीं त्यांस दोन समजुतीच्या गोष्टी सांगून त्यांचें मन वळेल असें करावें. कठोरपण दाखविल्यानें किंवा मारहाणीनें कांहींएक घडणें नाहीं.

शौचास नेहेमीं जावें, मळावरोध करूं नये. कोठा जड वाटल्यास थोडेंसें एरंडेल किंवा ज्या औषधापासून मळशुद्धि साफ होईल असें एखादें चूर्ण घ्यावें. अवेळीं जेऊं नये किंवा फार उपास करूं नयेत. मिताहार असावा. फळें व भाजी खाणें व साधारण व्यायाम हा जर नित्य नेमानें ठेविला तर औषध घेण्याची फारशी जरूर पडणार नाहीं. उमासे व वांती यांपासून पीडा होत असली तर कित्येक ठिकाणीं पहांटे एक वाटीभर थंड पाणी गरोदर स्त्रीस प्यावयास देतात. हें कांहीं अंशीं चांगलें खरें, पण प्रकृतीस मानल्यास चांगलें, नाहींतर त्यापासून कदाचित् अपाय होण्याचा संभव असतो; सोडावाटर देणें हें सर्वांत उत्तम.

प्रातःकाळीं उत्पन्न होणारे उमासे व वांती ह्यापासून गरोदर स्त्रीला आमही चरात पोंहनतो तर त्याचें निवारण व्हावें ह्मणून तिच्या जननाची नेहेमीं तरतूद ठेवावी. ज्या खाण्यापासून कोठा नेहेमीं जड राहील अस-

पदार्थ मुळींच खाऊं नये. उठल्याबरोबर थोडासा भाकरीचा तुकडा किंवा थोडेंसें दूध अगर काफी हीं प्यावयास द्यावीं. एवढ्यानेंही जर आराम वाटेनासा झाला तर लवंगाचें चूर्ण करून त्यांत उकळतें पाणी घालून भांड्यावर झांकण देऊन तसेंच निवडून मग दोन चमचे तें पाणी पिण्यास द्यावें.

प्रथमच जर चैतन्योत्पत्ति झाली तर तिच्यापासून उत्पन्न होणाऱ्या ठणकेमुळें कधीं कधीं गरोदर स्त्रियांस मूर्च्छा येते. अशा वेळीं तीस भीत्युत्पादक गोष्टी न सांगतां ज्यांच्यापासून तिला आनंद होईल अशा गोष्टी सांगाव्या.

मूल जन्मण्याचे पूर्वींच किंवा जन्मतांच त्याच्या आईच्या स्तनांत दूध उत्पन्न होतें, हेंच त्या मुलाचें अन्न होय. व हेंच त्याच्या पोषणास योग्य. दूध उत्पन्न झालें ह्मणजे तें पहिल्यानेंच पुष्कळ येऊं लागतें,तेव्हां स्तनांत रक्ताचा अंश वाढल्यानें ते फारच ताठ होतात.त्यावेळी मुलास स्तनाला लावून त्याजकडून तें पिववावें किंवा चोखून दूध ओढावें. आरंभीं उत्पन्न होणाऱ्या दुधामध्यें रेचक धर्म असतो आणि बालक जन्मल्यावर गर्भावस्थेंत असतां आंतड्यांत सांचलेल्या मळाचा झाडा व्हावा ह्मणून ईश्वरानें त्या दुधांत वरील धर्म ठेविला आहे ह्मणून इतर औषधाची मुळींच जरूर लागत नाहीं. दूध उत्पन्न होतेवेळीं प्रसूतिकांस थंडी वाजून ताप येतो व तें मोकळेपणीं सुटतांच घाम निघून ज्वर शांत होतो. स्तनांत दूध भरलें ह्मणजे त्याच्या वजनानें स्त्रियांस फार वेदना होतात, त्या होऊं नयेत ह्मणून गळ्यांतून पट्टा बांधून ते टांगून ठेवावे. फारच ताठलेले असले तर तेल लावून हलक्या हातानें चुचुकापासून उराकडे चोळीत जावें. स्पर्श असह्य असल्यास एक शेर थंड पाणी घेऊन त्यांत २ तोळे नवसागर टाकून एक वाइन*ग्लास मद्यार्क टाकावा. मग त्यांत एक स्वच्छ कापडाची घडी

* एक वाईन ग्लास ह्मणजे सुमारें पांच तोळे.

भिजवून समोरी बारा तासपर्यंत स्तनावर ठेवावी. असें केल्यानें बराच आराम वाटेल. दूध प जल्यावर चूचुक कोरड्या वस्त्रानें साफ पुसावें.

कधीं कधीं गर्भाचा भार गरोदर स्त्रियांचे पायांवरील शिरांवर पडून त्या सुजतात. ही सूज आली असतां भिण्याचें कारण नाहीं. फक्त त्यास एवढाच उपाय करावा कीं, गरोदर स्त्रीनें सगळा दिवस फिरण्याची पायांस तसदी न देतां पडून राहावें किंवा पायासभोंवतीं वस्त्र गुंडाळावें.

गर्भपतन—गर्भ राहिल्या दिवसापासून तो दुसऱ्या महिन्यांत अगर चौथ्या महिन्यापर्यंत पतन पावण्याचा संभव असतो. कधीं कधीं ह्या नेमानेंही उल्लंघन होतें, ह्मणजे शास्त्रमताप्रमाणें सहावे महिन्यांतही पतन पावण्याचा संभव असतो. कारणाशिवाय थकवा वाटणें, ग्लानि येणें, पोटांत वेदना उत्पन्न होऊन त्यांचा सर्वांगांत प्रसार होणें, मोंवळ येणें हीं चिन्हें होऊन जर इंद्रियद्वारें रक्तस्राव होऊं लागला तर गर्भपतन खचित होणार ह्मणून समजावें. तर तो पतन पावूं नये ह्मणून गरोदर स्त्रियेस साबुदाण्याची पेज, कांजी व दूध हीं प्यावयास द्यावीं. पिण्यास थंड पाणी द्यावें. तीस शुद्ध व थंड हवा येत असेल अशा ठिकाणीं उताणें निजवून तिच्या ढुंगणाखालीं उशी द्यावी. पोटावर व इंद्रियावर बर्फ ठेवावा आणि पोटांत अफूच्या अर्काचे दहापासून पंधरा थेंब प्रत्येक तीन तासांनीं तीनपासून चार वेळ द्यावे इंद्रियांत पिचकारीनें थंड पाणी घालावे व वारंवार थंड पाण्यांत घड्या भिजवून त्या इंद्रियावर ठेवाव्या ह्मणजे रक्तस्राव बंद होईल. इतक्याही उपायांनीं जर तो बंद नच राहिला तर कापसाच्या गुंड्या करून त्या इंद्रियांत भराव्या, येणेंकरून दाब पडून गर्भपतन पावण्याची भीति दूर होईल. संवयीच्या स्त्रियांस गर्भपात जसा लवकर होतो तसें गर्भधारणही लवकर होतें.

मिथ्या भीति—गरोदर स्त्रीजवळ प्रसूतीच्या वेळीं अमूक अमूक तऱ्हेनें वेदना होऊन फार त्रास होतो, प्रसूति कधीं लवकर होते, कधीं उशीरा

मराठी ग्रंथ संग्रहालय

होत नाहीं प्रसूतीच्या वेळीं फार त्रास पडतो व त्यापासून कधीं कधीं प्राणहानीही होते इत्यादि गोष्टी मुळींच काढूं नयेत. असल्या गोष्टी काढण्याचें जेवढें टाळवेल तेवढें टाळावें. कित्येक सुज्ञाही लोक गरोदर स्त्रियांस बाळंतपणाची माहिती व्हावी, व त्यांनी वेळ प्रसंग आल्यास सावध रहावें म्हणून मुद्दाम अशा गोष्टी सांगत असतात. परंतु त्यांचा हेतु एकीकडेसच राहून त्याच त्या गोष्टी वारंवार मनांत आणून गर्भिणी आपणांस काळजी व भीति ह्यांत ग्रस्त करून टाकतात, तेणेकरून भयंकर परिणाम झालेले वारंवार पाहण्यांत येतात.

प्रसूतीसंबंधी तयारी—स्त्री गरोदर राहिल्या दिवसापासून वर दर्शित केल्याप्रमाणें चाळिसावें सप्ताह लागलें म्हणजे तिची बाळंत होण्याची वेळ जवळ आली असें समजून प्रसूतिसंबंधी सर्व तयारी अगोदर करून ठेवावी, म्हणजे वेळेवर पंचाईत पडणार नाहीं. कित्येक स्त्रिया पूर्वी तयारी करून न ठेवित। वेळेवर धांवाधांव करितात तेणेकरून कधी जिन्नस वेळेवर न मिळून त्या पस्ता तात तर असें कधी करूं नये. चपळ हुशार, पोक्त व अनुभवशीर अशी सुईण पाहून ती वेळेवर हजर राहील अशी तजवीज करून ठेवावी. त्याच प्रमाणे बाळंतिणीची खोलीही साफ व स्वच्छ असावी. खोलीस रंग द्यावा.

स्वच्छ हवा—बाळंतिणीचे खोलींत स्वच्छ हवा येईल अशी खेळती असावी. जेवढी ती त्यांस मिळेल तेवढा तिच्यापासून त्यांस । [illegible] जास्त आराम वाटणार आहे. तरी पण अगदीच उघड्यावर पडणें हें हितावह नाहीं म्हणून होईल तेणेंकरून स्वच्छ हवेचा जरूर ताजा पुरवठा बाळंतिणीस खोलींत करवेल तितका करावा. स्वच्छ हवेच्या अभावामुळें कधीं कधीं स्त्रियांस दुःसह दुखणीं जडतात.

[illegible]—[illegible] जन्म देणें हें काम कांहीं फुकाचें नाहीं. ह्याचा ज्या बायांस अनुभव नाहीं त्यांस ह्या सर्व गोष्टी ऐकून थक्क वाटते, व [illegible]

कीं आह्मीं बाळंत झालों तर अशा कधीं देखील घाबरणार नाहींत. ह्मटलें आहे 'नहि वंध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्' किंवा 'बाळंतिणीच्या वेदना बाळंतीण जाणें' ह्याचा त्यांस काय अनुभव. गर्भारपणीं किती पथ्य करावे लागतात, व किती काळजी वहावी लागते हें ज्या गरोदर असतात त्यांसच समजतें. अशा वेळीं बाळंतिणीस पौष्टिक अन्न प्रत्येक दोन किंवा तीन तासांनीं द्यावें. पण अशा स्थितींत फारसा व्यायाम होत नसल्या कारणानें त्यांस अन्न जिरत नाहीं ह्मणून त्यांनीं अशा वेळीं दोन घांस कमी खाणें फार चांगलें. तापविलेलें पाणी नेहमीं प्यावें, तेंही फार देऊं नये तर थोडें थोडें द्यावें. चहा पिणें वाईट नाहीं, त्याच्या योगानें हुशारी वाटते. पण तोही माफक व नियमितवेळीं घ्यावा.

**मूत्राशय आणि आंतडीं**—गर्भाशयाच्या पुढच्या भागाला मूत्राशय असून त्याच्या खालींच आंतडें असतें. तें जर पूर्ण असतें तर गर्भाशयांतून मूल बाहेर पडण्यास फार त्रास पडला असता. सर्वांत मूत्राशयाची फार काळजी घेतली पाहिजे. अति मेहनतीच्या योगानें मूत्राशयाचा मार्ग बंद होऊन लघवी साफ सुटत नाहीं. कित्येक प्रसंगीं मूत्राशय फुटून तात्काळ मृत्यु येतो. मूत्राशय बिघडला असतां मूत्रविसर्जक यंत्राच्या योगानें तो बसविला असतां नीट होतो, पण ह्या यंत्राचा उपयोग चांगल्या हुशार व माहीतगार सुईणीशिवाय कोणीं करूं नये. मूत्राशय भरून राहिला आणि गर्भिणी स्त्रीस फार श्रम पडूं लागले तर पोटाचा खालचा भाग गरम पाण्यानें शेकावा अगर एरंडेलाचा जुलाब द्यावा ह्मणजे जरा आराम वाटेल.

**मिथ्या वेदना**—प्रसूतीला दहा किंवा पंधरा दिवस राहिले ह्मणजे ह्या वेदना होण्यास सुरवात होते. ह्या प्रथम पोटाच्या निरनिराळया भागांत उत्पन्न होतात. ह्याचें कारण खाण्यापिण्याचा अनियमितपणा, बद्धकोष्ठ मानसिक व शारीरिक अति श्रम व अजीर्ण हीं होत. वेदना होऊं लाग-

त्या ह्मणजे स्त्रीच्या इंद्रियद्वारें पिच्छास्राव न होऊन गर्भाशयाचें मुख उघडत नाहीं. इतकेंच नव्हे तर गर्भोदकाची पिशवी ( पाणमोटली ) पुढें येत नाहीं. अजीर्ण झालें असतां जसें आंतड्यांत कळमळतें तसें त्याच्या-ही योगानें होतें. पण तें सर्व आंगभर पसरत नाहीं.

## प्रसूतीच्या तीन अवस्था.

गर्भधारण होऊन गर्भ पूर्णत्वास आल्यावर त्याचें गर्भाशयांतून ब-हिर्गमन होणें ह्याला प्रसूति ह्मणतात.

**पहिली अवस्था**—गर्भाशयाचें मुख उघडणें. थोडथोड्या वेदना सुरू झाल्या कीं पहिल्या अवस्थेस आरंभ होतो- ह्या वेदनाच गर्भाशयाचें मुख उघडण्यास कारणीभूत होतात. त्या अवस्थेच्या शेवटीं गर्भाचें मुख उघडून त्यांतून गर्भोदक स्राव होऊं लागतो- ह्या अवस्थेंत बाळंतिणीनें किंकाळी फोडल्यास तिची प्रसूति सुरक्षित होईल.

**दुसरी अवस्था**—ह्या अवस्थेंत स्त्री जास्त कुंथूं लागते व त्या योगा-नें गर्भाशयांतून मूल हळूहळू बाहेर येतें.

**तिसरी अवस्था**—गर्भ बाहेर आल्यावर सरासरी एक दोन कुंथण्या-बरोबर वार बाहेर येते- कधीं कधीं तर तास अर्धा तासही ती बाहेर प-डण्यास लागतो.

पहिल्या प्रसूतींत बहुतकरून ४ पासून २४ तासपर्यंत वेळ लागतो. ह्याचें कारण ह्यावेळीं गर्भ बाहेर पडावा ह्मणून सर्व भाग ताणले जातात. व त्यामुळें स्त्रीच्या जिवास फार त्रास पोंहचतो. कष्ट पडले असतां कधीं कधीं तीन तीन दिवसपर्यंत प्रसूति होत नाहीं. कित्येक प्रसंगीं मुलाच्या जन्माबरोबरच पाणमोटली फुटते, किंवा ही फुटल्यावर कांहीं वेळानें मूल जन्मतें. क्वचित् प्रसंगीं पाणमोटलीसहित गर्भ बाहेर पडतो व ती पाणमोटली बाहेर पडल्यानंतर फोडावी लागते.

**सत्यवेदना**—ह्या प्रसूतिकाळ पूर्ण झाल्यावर ह्मणजे नऊ महिन्यानंतर

सुरू होतात. त्यांस सुरुवात झाली ह्मणजे गर्भाशय कठीण लागतो, उदर फार ताठलेलें व फुगलेलें असतें तें प्रसूतीच्यापूर्वी एकदम कमी होऊन स्त्रियांस फार सुख होतें. गर्भाशयाच्या मुखांतून स्त्रींद्रियद्वारें पिच्छास्राव सुरू होतो. प्रथम मांड्यांमध्यें दुखायचें सुरू होऊन तें कमरेच्या मागल्या भागाला जातें व तेथून पुढच्या भागाला येतें. कधीं कधीं मांड्यांपर्यंतही जाऊन पोहोचतें. प्रत्येक कुंथण्यास गर्भाशयाचें मुख उघडतें. हे कुंथणें एकसारखें चालत नाहीं, तर थोडा वेळ राहून सुरू होतें. हें जर एकसारखें चालू राहिलें तर बाळंतिणीस जास्त थकवा वाटेल. हळूहळू जननेंद्रियासही मोठें होण्यास वेळ मिळतो आणि पाणमोटली पुढें येते.

**गर्भाशयाची परीक्षा**—प्रसूति होण्यास किती वेळ आहे याची सुईणीनें प्रथमत परीक्षा करावी. या परीक्षेच्या योगानें बाळंतिणीस होणाऱ्या प्रसव *वेदना सत्य किंवा मिथ्या आहेत; प्रसूत होण्यास किती वेळ लागेल, प्रसूतीस आरंभ झाला आहे किंवा नाहीं, गर्भाची स्थिति स्वाभाविक आहे किंवा कशी आहे, इत्यादि माहिती मिळण्यासारखी असते. सुइणीनें आपलें बोट तेलांत बुडवून योनींत गर्भाशयाचा खालचा भाग त्याला लागे तोपर्यंत हळूच शिरकवावें. अशानें जर गर्भाशय बोटास लागला नाहीं तर बाळंतिणीस उभें राहण्यास सांगावें ह्मणजे तो भाग खालीं येईल. ह्यावेळीं बोटाचें नख वाढलेलें नसावें. नंतर गर्भाशयाचें मुख विस्तृत झालें आहे किंवा नाहीं हें पहावें. जर थोडें विस्तृत झालें असेल तर समजावें कीं, प्रसूतीस नुकताच आरंभ झाला आहे. कारण जर विस्तृत झालें असेल तर आरंभ होऊन बराच वेळ गेला आहे असें समजावें. गर्भाशयाचे तोंडापर्यंत गर्भोदकाची पिशवी जरा लांब असली तर पहिल्या अवस्थेच्या पूर्णतेस बराच वेळ आहे. नुकताच गर्भातून बाहेर पडण्यास सुरवात झालेला चार पांच बोटें रुंदीचा एक वाटोळा

*गर्भाशयाचें आकुंचन होत असतां ज्या वेदना होतात त्या.

पदार्थ हातास लागेल. पहिल्यानें गरोदर राहिलेल्या स्त्रीच्या गर्भाशयाचें मुख एका वाटोळ्या छिद्राप्रमाणें बोटास लागतें; पण, तेंच छिद्र एकापेक्षां जास्त गर्भ राहिलेल्या स्त्रीच्या गर्भाशयास तसें लागत नाहीं. प्रत्येक वेदनेस गर्भाशयाचें मुख भिंच्या एवढ्या छिद्रापासून तों सुपारी, लिंबू, नारिंगापर्यंत प्रफुल्लीत होत जाऊन शेवटीं गर्भ बाहेर पडण्याजोगतें तोंड होईपर्यंत उघडतें.

हुशार सुइणीनें एकदांच वर सांगितल्याप्रमाणें प्रसूतीस वेळ किती राहिला आहे, गर्भाशयाचे तोंडाजवळ गर्भाचा कोणता भाग आला आहे हें पहावें. जर आंतील भाग मोठा लागला तर डोकें किंवा ढुंगण आहे, मस्तकाचीं हाडें लागलीं तर डोकें आहे असें समजावें. वारंवार योनींत बोटें घालून परीक्षा करूं नये, तर प्रत्येक अर्धा तास गेल्यानंतर जरूर वाटल्यास करावी. परीक्षेचे वेळीं गर्भिणी उभी राहण्यापेक्षां तिनें डाव्या बाजूस निजून गुडघे पोटाजवळ घेऊन आपल्या आंगाचा भाग पुढें घ्यावा हें बरें.

शेंकडा ९७ प्रसूतींत पहिल्यानें डोकें बाहेर येतें. डोकें पहिल्यानें आलें असतां प्रसूतीस वेळ लागत नाहीं. कांहीं कांहीं प्रसूतींत ढुंगण अगर पाय येतो व फारच थोड्या प्रसूतीस हात पहिल्यानें येतात. पाय प्रथम येऊन जन्मलेल्या बाळकास पायाळ ह्मणतात. ह्याच्या पायांत कांहीं नैसर्गिक गुण आहे अशी समजूत आहे. त्यानें आजारी मनुष्यास पायाचा स्पर्श केल्यानें दुखणें बरें होतें, पायाळू मनुष्य मोठा भाग्यवान असतो, वगैरे समजुती फार प्राचीन काळापासून आमचे लोकांत आहेत.

**गर्भिणी**—पहिल्या अवस्थेच्या वेळीं गर्भिणीनें खोलींत जरा इकडून तिकडे तिकडून इकडे हिंडावें, मध्येंच थोडासा विसांवा घ्यावा. मध्यें मध्यें कांहीं उपहारही करावा. चालण्यानें किंवा नीट उभें राहिल्यानें गर्भाचें डोकें खालीं येतें. जसजशा वेदना जास्त होऊं लागतात तसतसें

बाळंतिणीच्या जीवास अस्वास्थ्य वाटून तिला बिछान्यावर पडावेंसें वाटतें. पडून राहिल्यावर जर वेदना कमीशा वाटूं लागल्या तर पुनः उठून जरा फिरावें. पडल्यावर उताणें अगर कुशिवर पडून रहावें. वर सांगितल्याप्रमाणें मूत्राशय प्रत्येक तीन तासांनीं साफ करावा. ह्यावेळीं बिछाना मऊ असावा.

पहिल्या अवस्थेच्या वेळीं बाळंतिणीनें श्रम होण्यासारखी मुळींच मेहनत करूं नये, कारण त्यापासून नुकसान होण्याचा फार संभव असतो. सुइणीनें लवकर प्रसूति व्हावी ह्मणून गर्भाशयाचें मुख बोटानें मोठें करूं नये; तें आपोआपच मोठें होऊं द्यावें.

बाळंतिणीचे पाठीच्या खालच्या भागावर बराच वेळ दाब दिला तर तिला थोडा वेळ सुख वाटतें. जर वेदना कांहीं वेळ बंद राहिल्या व बाळंतिणीस झोंप लागली तर तें तिच्या प्रकृतीस फार हितकारक आहे. कारण प्रसूति जेवढी स्वस्थ होईल तेवढी चांगली.

बाळंतिणीस पहिल्या व दुसऱ्या अवस्थेमध्यें वांती होतात त्यांच्यायोगानें प्रसूतीस जोर येतो, इतका त्या वांतीपासून बाळंतिणीस फायदा होतो ह्मणून त्या बंद होण्याच्या खटपटीस पडूं नये. कित्येक लोक तर वांती व्हाव्या ह्मणून मुद्दाम औषध देतात. तशीच त्यांस हुडहुडी भरते तर ती जाण्यास गरम चहा अगर काफी द्यावी ह्मणजे झालें. ही हुडहुडी हीं हितकारक आहे.

पाणमोटली फुटली ह्मणजे आंतील पाणी मोठ्या जोरानें बाहेर पडतें. त्याच्या योगानें प्राथमिक बाळंतिणीस भीति वाटण्याचा फारच संभव असतो. सुइणीनें अशा वेळीं तिची समजूत घालणें फार चांगलें. कित्येक प्रसंगीं असें होतें कीं, ही पाणमोटली फोडावी लागते, पण अतिशय जलद फोडूं नये तर हळूहळु ती फुटूं द्यावी; किंवा टांचणीनें पाणमोटलीस हळून

भोंक पाडावें. गर्भाशयाचें मुख उघडलें ह्मणजे गर्भ बाहेर येण्यास रस्ता मिळतो.

### जन्म.

पाणमोटली फुटून तींतून पाणी बाहेर गेलें ह्मणजे गर्भाशयाचें आकुंचन होत जातें. व आकुंचन जसजसें होत जाईल तसतसा गर्भ बाहेर पडतो. वेदना सुरू झाल्या ह्मणजे गर्भाचें डोकें प्रथम बाहेर येऊं लागतें पण वेदना थांबल्या ह्मणजे तें आंत जाऊं लागतें. असें होऊं लागलें ह्मणजे कित्येक अडाणी लोक असें समजतात कीं, गर्भास भूत आंत ओढतें व त्यानें त्यास सोडावें ह्मणून नानाप्रकारचे नवस करितात. परंतु हें सर्व ढोंग आहे. असें होण्याचें कारण गर्भाशयाचें आकुंचन बंद होऊन त्यास शिथिलता प्राप्त होते हेंच होय.

ह्या अवस्थेमध्यें सुइणीनें पहिल्याप्रमाणें वेदना बंद होतात ह्मणून प्रसूति कोठपर्यंत येऊन पोंहोचली आहे ह्याची फार बारकाईनें परीक्षा करावी. बाळंतिणीनें अशा वेळीं कुंथणें सुरू करावें, श्वास आंत ओढून एकदम सोडावा, किंवा खाटेच्या पावक्याला एक चांगलेंसें मजबूत फडकें बांधून तें एखाद्या वस्तूवर पायाचा जोर देऊन ओढावें ह्मणजे त्यास ओढून कुंथण्यास जोर सांपडेल. कित्येक डाक्तरांच्या मतें वरील प्रकार करणें प्रशस्त नाहीं.

इंग्लंद देशांत प्रसूतीचे वेळीं बायकांस डाव्या कुशीवर निजवितात, पण आपल्या देशांत त्यांस उताणें निजवितात. आपल्याही देशांत प्रसूतीच्यावेळीं डावे बाजूवर निजवणें हें फार चांगलें. मुंबई येथील सरजमशेटजी जिजिभाई यांच्या हास्पिटलांत प्रसूतिच्यावेळीं बाळंतिणीस डावे कुशीस निजवितात तेणेंकरून त्यांस पाय पोटाजवळ आल्यानें कुंथण्यास वगैरे जोर मिळतो व प्रसूतीस विशेष त्रास पडत नाहीं. कित्येक बायका बाळंतिणीस बसविवात पण हें चांगलें नव्हे.

वेदना सुरू झाल्या ह्मणजे कांहीं वेळपर्यंत बाळंतिणीस झोंप लागते. त्यामुळें तीस पुढें होणाऱ्या वेदना सोसण्याचें सामर्थ्य येतें.

प्रसूतीच्यावेळीं बायका बऱ्याच जमतात त्यांपैकीं एखादीनें बाळंतिणीचे पाठीवर वेदना सुरू होतात त्यावेळीं जोर द्यावा ह्मणजे तिला कांहींसा विसांवा वाटेल. पहिल्या अवस्थेच्या वेळीं त्या मोठमोठ्यानें किंकाळ्या फोडतात, ह्या योगानें प्रसूतीच्या कामीं त्यांस मोठी मदत होते.

मनुष्याचे देहामध्यें डोकें हें प्राधान्य धरलें आहे, तेव्हां त्याच्या चमत्कारिक रचनेची आपणांस माहिती असणें अत्यावश्यक आहे ह्मणून त्या संबंधीं थोडीशी माहिती खालीं दिली आहे.

मनुष्याच्या डोक्याची कवची अनेक हाडांची बनविलेली असून तीं एकमेकांत गुंतलेलीं असतात, तेणेंकरून कवचीस फार बळकटी येते. मोठ्या मनुष्याच्या डोक्यांतील हाडें हीं फारच एकमेकांस मिळालेलीं असतात. कांहीं देवभोळे लोक ह्या हाडांच्या गुंतण्यास ब्रह्मदेवाचा लेख ह्मणजे अर्थात् मनुष्याचे आयुष्यांत त्यास जें कांहीं सुखदुःख प्राप्त व्हावयाचें असेल तें लिहून ठेवलेलें असतें असें समजतात! मुलाचा जन्म झाल्याबरोबर त्याच्या डोक्यास पूर्ण आकार येतो.

बाळंत होतांना मुलाचें डोकें जर एकदम ओढून बाहेर काढलें तर बाळंतिणीस फार त्रास पोंहोचतो, गात्रें ओढून जातात, गुडघ्यांस कंप सुटतो. अशा अनेक कष्टानें ती आपल्या मुलास जन्म देते. कित्येक वेळीं असें होतें कीं बाळंतिण बाळंत केव्हां होते, हें दुसऱ्याच्या कानीं सुद्धां जात नाहीं. स्त्री जातीच्या मुलापेक्षां पुरुष जातीच्या मुलाच्यावेळीं बाळंतिणीस फार त्रास पोंहोचतो. आई व बाप हीं जर बुद्धिमान असलीं तर मुलाच्या मस्तकाचा आकार वाढून आईस प्रसववेदना जास्त सोसाव्या लागतात व जीवही धोक्यांत पडतो.

बाळंत होतांना मुलाचें डोकें जननेंद्रियाजवळ जवळ येऊं लागलें ह्मणजे

विटप ( मलद्वार व जननेंद्रिय ह्यांच्या मधील जागा अगर पडदा ) फाटण्याची फारच भीति असते. तर तसें होऊं नये ह्मणून डाव्या हाताच्या बोटास मऊ कपडा गुंडाळून वारंवार ऊन पाण्यांत बुडवून त्यानें शेकलें असतां लेंकराच्या पुढें येणाऱ्या गर्तीस अडथळा न होतां तें सुखानें बाहेर येतें. परंतु, मुलाचें डोकें हळूहळू बाहेर पडण्याची खबरदारी ठेवावी ह्मणजे प्रत्येक भाग ताणून रस्ता मोकळा होण्यास अवकाश मिळेल.

डोकें बाहेर आल्यावर शरीराचा दुसरा भाग एकदम बाहेर ओढून काढूं नये तर तो आपल्या गतीनें येऊं द्यावा. ओढण्याच्या योगानें गर्भाशयाची प्रसरणशक्ति बंद होऊन एकदम रक्त वाहूं लागेल. गर्भ बाहेर पडण्याच्या गतींत असतां सुइणीनें मुलाचें डोकें एका हातांत धरून दुसरा हात बाळंतिणीच्या पोटावर द्यावा. ह्याप्रमाणें सर्व गर्भ बाहेर पडेपर्यंत करावें. कित्येक प्रसंगी असें होतें कीं बाळंतपणास अवश्य लागणाऱ्या वेदना कमी होतात तर त्या होण्याकरितां गांजाचा उपयोग करावा. अगर पांचपासून सात गुंजांपर्यंत क्विनाईन निंबाच्या रसांत खलून त्यांत दोन तोळे पाणी घालून द्यावें ह्मणजे वेदना सुरू होतात.

गर्भाचें मस्तक बाहेर पडतांच मानसभोंवतीं कधीं कधीं नाळाचा वेढा असतो तो डोक्यावरून काढावा, न काढला तर मुलास गळफांस बसून तें मरून जाईल.

मुलाचा जन्म झाल्याबरोबर त्यास मऊ ऊर्णावस्त्रांत घ्यावें व त्याच्या तोंडांत बोटं घालून चिकट पिच्छिल पदार्थ काढून टाकावा. एवढी कृति झाली ह्मणजे श्वासोच्छ्वासनास सुरुवात होते. श्वासोच्छ्वास सुरू झाला ह्मणजे बहुतकरून तें रडूं लागतें. जर तें मुळींच श्वासोच्छ्वास करीत नाहीं असें झालें तर हळूच कुल्यावर चापट मारावी ह्मणजे तें रडल्यासारखें होऊन श्वासोच्छ्वास करूं लागेल. असें करण्यास जर कोणास कदाचित् भीति वाटेल तर आंगावर थंड पाणी शिंपडावें, किंवा दोन निरनिरा-

ळ्या भांड्यांत ऊन व थंड पाणी घेऊन पहिल्यानें ऊन मग थंड पाण्यांत त्यास सहा वेळ डोकें न भिजेल अशा बेतानें बुडवीत जावें, ह्मणजे श्वासोच्छ्वास क्रिया सुरू होईल. मूल श्वासोच्छ्वास करूं लागेपर्यंत नाळ बांधूं नये. एकदां का सुरळीतपणें श्वासोच्छ्वास सुरू झाला ह्मणजे सुमारें तीन चार बोटांच्या अंतरावर दोरीनें तें एक दोन फेरे देऊन घट्ट बांधावें व त्यास मजबूत दुप्पट गांठ मारावी. ही दोरी पांढऱ्या रेशमाची टणक व बारीक असून तिच्या योगानें नाळ कापऊं जाईल अशी नसावी. नंतर गर्भापासून सुमारें एक इंचाच्या अंतरावर पुनः गांठ मारावी आणि नाळ कातरीनें मध्येंच कापावें. नाळाच्या कापलेल्या भागांतून रक्त येतें किंवा नाहीं ह्याची सुमारें दोन तास पर्यंत परीक्षा करावी. रक्त येत असेल तर तें पुनः बांधावें, असें केल्यानें रक्तप्रवाह बंद होऊन मुलाचे प्राण वांचतील. दुसरी गांठ नाळांतील रक्तास त्याच्या एकदम बाहेर पडण्याच्या गतीस प्रतिबंध करिते.

बाळंत झाल्याबरोबर सुइणीनें बाळंतिणीस कोणत्याही प्रकारच्या भीत्युत्पादक गोष्टी सांगूं नयेत, त्यांच्या योगानें तिच्या जिवास धक्का पोंहोचून इजा होते. गर्भ बाहेर पडला ह्मणजे सुइणीनें आपला हात बाळंतिणीच्या पोटावर ठेवावा. त्या योगानें गर्भाशयास जागच्या जागीं बसण्यास आधार मिळतो. व सुइणीस दुसरा गर्भ पोटांत आहे कीं नाहीं हेंही पाहण्यास सांपडतें.

## वार ( जरायु )

गर्भ बाहेर आल्यानंतर वार बाहेर येणें ही प्रसूतीची तिसरी अवस्था. ह्या अवस्थेमध्यें बाळंतीण अगदीं थकून जाते. कित्येक मूर्ख सुइणी गर्भ बाहेर पडल्याबरोबर वार आपल्या हातांनीं बाहेर ओढून काढतात, त्या योगानें रक्ताचा बराच स्राव होतो. तर तसें न होऊं देण्याविषयीं विशेष खबरदारी ठेवावी.

सुइणीनें निदान पावतासपर्यंत तरी वाळंत झाल्यावर वेदना कमी होतपर्यंत थांबावें. वेदना कमी झाल्या ह्मणजे कांहीं प्रयत्न न करितां गर्भाशयांतुन वार बाहेर येते. कधीं कधीं असें होतें कीं ती ज्या बाजूनें बाहेर यावयाची त्या मार्गानें न येतां दुसऱ्या बाजूनें येते. अशा प्रसंगीं ती हळूच हातानें बाहेर काढावी लागते. अशा रीतीनें काढतांना जननेंद्रियाजवळ आली ह्मणजे ती हातानें आंतल्या आंत तिची गुंडाळी होईल अशा रीतीनें फिरवावी ह्मणजे बाहेर काढतेवेळेस ती एकसारखी लागल्याच्या योगानें व तिचा फरफटलेला भाग गुंडाळला जाऊन एकत्र होईल व ती बाहेर काढण्यास ठीक पडेल. पण ती सर्व बाहेर काढण्याविषयीं खबरदारी ठेवावी. अशावेळीं थोडासा रक्ताचा स्राव होईल.

अर्ध्या तासाच्या आंत वार बाहेर न आली तर सुइणीनें गर्भाशयाचा वरचा भाग दोन्हीं हातांनीं दाबावा ह्मणजे ती बाहेर पडेल. जुने लोकांत न हल्लीं सुद्धां वार बाहेर पडावी ह्मणून बाळंतिणीस चिमूटभर तपकीर ओढण्यास देतात त्या योगानें खोकला उत्पन्न होऊन अगर शिंक येऊन वार झटदिशीं बाहेर पडते. त्यायोगानें ती बाहेर न पडली तर मात्र गर्भाशयांत ती कोणत्या जागीं आहे ह्याचा नीट तपास करावा. बहुतकरून ती गर्भाशयाचे मुखाजवळ अगर त्याच्या बाजूला चिकटलेली असते. गर्भाशयाचे मुखाजवळ असून ती एका हातानें दाबून धरली तर दुसऱ्या हातानें पसरावी ह्मणून दाब द्यावा व हळूहळू बाहेर पाडावी. गर्भाशयाच्या बाजूला असली तर सुइणीनें तिचा पूर्ण शोध करून आपला डावा हात हळूच गर्भाशयाच्या आंत घालून गर्भाशयापासून ओढून काढावी, व आपल्या उजव्या हातानें गर्भाशय स्थानभ्रष्ट होऊं नये ह्मणून त्यास आश्रय द्यावा. गर्भाशय जसजसा आकुंचित होत जातो तसतसा तो वारीपासून निराळा होऊन रक्त वाहिन्यांचीं तोंडें बंद करितो व ह्याच्या योगानें रक्तस्राव होत नाहीं. ह्या वेळची गर्भाशयाची स्थि-

ग्रंथ संग्रहालय

ति एखाद्या कठीण चेंडूसारखी असते. सूतिकास्राव जितका स्वच्छ होईल तितका चांगला. ह्याचे रंग निरनिराळे असतात. पहिल्यानें रक्तवर्णाचा असतो, पुढें तो रंग जाऊन हिरवट होतो, नंतर श्वेत. रंगाचा होऊन त्यास चमत्कारिक दुर्गंधी येते.

कित्येक सुइणी वार बाहेर पडल्यावर बाळंतिणीस एखाद्या भिंतीशीं उभी करून गर्भाशयाचें आकुंचन व्हावें ह्मणून तिच्या पोटावर आपलें डोकें घांसतात! हें चांगलें नव्हे.

**पट्टा**–वार पडल्यावर सुमारें एक तासानें एक चांगला स्वच्छ कपडा सुमारें एक हात रुंदीचा व तीनएक हात लांबीचा घेऊन पोटाभोंवतीं गुंडाळावा. हा पट्टा कांहीं दिवसपर्यंत रोज बांधावा. तो बांधण्यापूर्वीं गर्भाशयावर कपड्याची घडी आडवी ठेवावी व एक घडी पोटावर ठेवावी ढुंगणावर सोसवेल तितका घट्ट पट्टा बांधावा.

**निद्रा**–बाळंत झाल्यावर बाळंतिणीस सुमारें एक तासपर्यंत विश्रांति द्यावी. नंतर जननेंद्रिय गरम पाणी घेऊन त्यांत फडका भिजवून त्यानें धुवावें, व आंगाखालचे भिजलेले कपडे काढून घेऊन त्यांबद्दल गरम कपडे घालावे. एका स्वच्छ रुमालाची घडी करून जननेंद्रियावर ठेवावी. एवढें झाल्यावर बाळंतिणीस बसवून न ठेवतां निजूं द्यावें व फारशी हालचाल करूं देऊं नये. हालचालीनें कदाचित् रक्तस्राव व्हावयाचा.

बाळंतिणीस भेटावयास कोणास येऊं देऊं नये व कोणास फारशी गडबडही करूं देऊं नये, तर तिला स्वस्थ निजूं द्यावें. ही आली ती गेली. असें करकरून बाळंतिणीस त्रास मात्र होतो व त्यायोगानें आजार उत्पन्न होऊन जिवावरही पाळी येते, ह्मणून अशापासून त्यांस जेवढें दूर ठेववेल तेवढें चांगलें.

## निरनिराळ्या प्रसूति व जुळीं.

वर एकदां सांगितलेंच आहे कीं, शंभरांत ९७ प्रसूतीमध्यें डोकें पहि-

त्यानें येतें. आतां ह्या नियमाविरुद्ध ज्या प्रसूति होतात त्याविषयीं थोडासा विचार करूं.

**ढुंगणाचें पहिल्यानें येणें.**–दर साठ प्रसूतींत एक प्रसूति ढुंगण पहिल्यानें आल्याची होते. पहिल्यानें ढुंगण आल्याची खूण ढुंगणाच्या मधील खाडे पाहून अगर स्त्री किंवा पुरुष जातीचा भाग जसजसा पुढें येईल त्यावरून समजावें.

ढुंगण बाहेर आल्याबरोबर मुलास शौच्यास होतें. कित्येक अज्ञानी सुइणी ढुंगण बाहेर आल्याबरोबर बाकीचा भाग जलद प्रसूति व्हावी ह्मणून बाहेर ओढून काढण्याविषयीं तत्पर असतात. पण असें केल्यानें लवकर प्रसूति होण्याचें एकीकडेसच राहून जास्त इजा . मात्र होते, कारण मृदु भाग एकदम ओढले जात नाहींत तर जसजसा गर्भ बाहेर पडूं लागतो तसतसे ते ताणले ( रुंद होत ) जातात. एकदम ओढून काढण्याच्या योगानें एखादे वेळेस मुलाचें डोकें तुटून पडण्याचा संभव असतो.

अशा प्रसंगीं एक मुख्य गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे, ती ही कीं, गर्भाच्या बाहेर येण्याच्या गतीमध्यें नाळ हें डोक्याखालीं सांपडून दाबलें न जावें, जर का नाळ मध्येंच दाबलें जाऊन अगर गुंतून रक्ताचें चलन बंद राहिलें तर लागलेंच मूल मरेल. एवढ्या करितांच सुइणीनें नाळ बाहेर आलें ह्मणजे तें सैल रहावें ह्मणून जरा बाजूस करावें. मूल बाहेर पडण्याच्या गतींत असतां सुइणीनें पहिल्यानें त्याचे पाय वस्त्रांत गुंडाळून आपल्या डाव्या हातांत धरावे, व उजव्या हातानें मुलाच्या पाठीवर जोर द्यावा व हळूहळू वेदना सुरू असतांनाच जसजसें बाहेर येईल तसतसें ओढून आपल्या हातावर घ्यावें.

**पायाळू**–दर १०५ प्रसूतींत एक पायाळू मुलाची प्रसूति होते. पायाळू मूल जाणण्याची खूण पाय बाहेर आला ह्मणजे त्याच्या पायांचीं बोटें हाताच्या बोटांपेक्षां फार लहान असतात त्यावरून समजावें. ढुंगणाच्या

प्रसूतीपेक्षां पायाळू प्रसूतींत मुलाचें डोकें लवकर बाहेर येत नाहीं. ह्याही वेळीं वरच्याप्रमाणें बाळंतिणीची व्यवस्था ठेवावी. जर एकच पाय बाहेर आला तर दुसरा सुइणीनें बाहेर ओढून काढूं नये.

हस्तप्रसूति—दर २३० प्रसूतींत एक हस्तप्रसूति होते. अज्ञानी सुइणी अशा तऱ्हेनें पहिल्यानें हात बाहेर आला तर तो ओढून बाहेर काढण्याचा प्रयत्न करितात. पण, हें अगदीं वाईट. ज्या बाजूकडून पहिल्यानें हात बाहेर आला असेल त्या बाजूच्या कुशीवर बाळंतिणीनें वळावें. किंवा ह्याहीपेक्षां एक उत्तम मार्ग आहे तो असा—

ज्या वेळीं वेदना कमी असतात अशा वेळीं सुइणीनें आपल्या हाताला तेल चोळून तो जननेंद्रियांतून हळूच आंत घालून गर्भाशयांतील मुलाच्या एक अथवा दोन्हीं तंगड्या धराव्या. व प्रत्येक वेदनेमध्यें तंगड्या हळूच खालीं ओढाव्या त्या योगानें बाहेर आलेला हात आंत जाईल.

जुळीं—दर ८० प्रसूतींत एक जुळें होतें. प्रत्येक मूल निरनिराळ्या पिशवींत असतें किंवा दोन्ही एकाच पिशवींत असतात. दुसऱ्या मुलाच्या प्रसूतीपेक्षां पहिल्या मुलाच्या प्रसूतीस फार वेळ लागतो. पहिल्या मुलाचा जन्म झाल्याबरोबर सुइणीनें बाळंतिणीच्या पोटास पट्टा बांधून दुसऱ्या मुलाचा जन्म होईपर्यंत थांबावें. दुसऱ्या मुलाचा जन्म होण्यापूर्वींच पहिल्या मुलाची वार तेथून नेऊं नये. दुसऱ्या मुलाचा जन्म झाल्यावर मग त्या दोन्हीं काढाव्या.

## मुलांची जोगवणूक.

आंगधुणें—गर्भांत मूल असतां त्याच्या सभोंवतीं कांद्याच्या पातळ पापुद्र्याप्रमाणें वेष्टन असतें, त्याच्या योगानें त्याच्या त्वचेचें रक्षण होतें. ह्या वेष्टनास थोडेसें तेल लावलें असतां किंवा अंड्याची सफेती आणि हरभऱ्याचें पीठ ह्यांचा उपयोग केला असतां तें आपल्या आपण वाळून खडून पडतें. मूल जन्मल्याबरोबर त्याच्या घशांतील बलक ( चिकट

पिच्छिल ) पदार्थ काढून टाकावा. मुलाचे डोळे पहिल्यानें मोठ्या काळजीनें थंड पाण्यांत कपडा भिजवून त्यानें साफ धुवावे व दुसरा कपडा घेऊन त्यानें ते पुसावे. पहिला कपडा पुनः उपयोगांत आणूं नये. एवढें झालें म्हणजे ऊन पाण्यानें त्याचें आंग साबण लावून मऊ कपडा घेऊन त्यानें साफ धुवावें; पण आंग धुतांना डोळ्यांत पाणी न जाण्याविषयींची खबरदारी ठेवावी. नंतर तें साफ पुसावें. ह्याप्रमाणें त्यास रोज आंघोळ घालावी.

**नाळ**—नाळाचा शेवटचा भाग कपड्यानें गुंडाळावा. त्या कपड्याचा जो भाग नाळाच्या बुडाशीं लागणारा असेल त्यास गोडें तेल लावावें किंवा कपड्यास भोंक पाडून तें बाहेर काढावें व तें पोटावर सैल पडूं द्यावें. नाळ जागच्याजागीं रहावें म्हणून पोटासभोंवतीं दोन तीनदां फडकें गुंडाळावें, पण तें वट्ट असूं नये. नाळांतून रक्त बाहेर येत असल्यास बेंबी जवळच्या बंधनाखालीं दुसरें बंधन करावें. नाळ खडून पडल्यावर तें भरून येई तोंपर्यंत त्याजवर शाण वस्त्राची घडी ठेवावी.

**कपडा**—मुलांच्या आंगावर कपडा अवश्य घालावा. उन्हाळ्या दिवसांत सुद्धां मुलांच्या आंगावर कपडा ठेवावा. कपडा फार घट्ट न करितां नेहमीं सैल ठेवावा कीं जेणेंकरून त्यास हातपाय हालविण्यास ठीक पडेल.

**वेड्याविद्या चाली**—आपल्या लोकांत अशा कांहीं नूतन बालकासंबंधानें वेड्या चाली प्रचारांत आहेत कीं, त्यांविषयीं बोलतां सोय नाहीं. कित्येक लोक लहान मुलाची छाती दाबतात, कोणी शेरताटीचा रस पाजतात, कोणी मीठ आणि तूप ह्यांचें मिश्रण करून त्यांस पाजतात. कोणी मध, तूप आणि सोन्याची बुकणी ह्यांचें मिश्रण करून पाजतात. कोणी मूल दैववान् व्हावें म्हणून त्याच्या मुखांत सुवर्ण घालतात, कोणी भूत झोंबूं नये म्हणून मुलाच्या हातास भारलेल्या ताइता बांधतात, कोणी बांगडीची कांच तापवून मुलाच्या पोटावर, कानशीलावर अगर टाळूवर

फुल्या देतात, असें करण्याचें कारण ते असें सांगतात कीं असें केल्यावर मुलांस कोणत्याच प्रकारची धास्ती नसते. पण ह्या सर्व वस्तूंपासून कांहींच फायदा नसून उलट तोटा मात्र होतो.

अन्न–कित्येक लोक असें समजतात कीं, मूल जन्मल्यावर प्रथमच त्यास आईचें दूध देणें हें चांगलें नव्हे व असें कित्येक डाक्तरांचेंही मत आहे. पण कित्येक डाक्तर लोक असें सांगतात कीं, बाळंतिणीस थोडीशी विश्रांति मिळाल्यावर मूल स्तनास लावावें व हें दूध अपाय करण्यापेक्षां उलट मुलाचें पोषण करून त्याचा कोठा साफ ठेवतें. दुसऱ्या तिसऱ्या औषधापेक्षां हें फार उत्तम औषध आहे.

आईचें दूध लवकर पाजण्यास न मिळालें तर गाईच्या दुधांत तिप्पट पाणी घालून तें उकळून मुलास पाजावें.

पहिल्या महिन्याला दिवसांतून प्रत्येक दोन तासांनीं मुलाकडून स्तनपान करवावें; पण रात्रीचे प्रहरीं हा नियम जरूर पाळलाच पाहिजे असें नाहीं. अशावेळीं आईचें खाणें मात्र पौष्टिक असावें.

कित्येक आया आपलें लेंकरूं रडूं लागलें ह्मणजे त्यास पाजतात. अशा वारंवार पाजण्यानें एखादे वेळेस अशी गम्मत होते कीं, वाजवीपेक्षां फाजील दूध मुलास मिळतें व तेणेंकरून त्याचें पोट भरून जाऊन उसासी लागली ह्मणजे तें रडूं लागतें. रडूं लागलें कीं लागलेंच पुन: त्यास स्तनपान आहेच. पण, असें हे वारंवार पाजणें चांगलें नव्हे, त्यापासून भयंकर परिणाम होतात, ह्मणून या बाबतींत नियमितपणा ठेवावा हें उत्तम.

दूध तोडणें–हें हळूहळू तोडलें पाहिजे. एकदम तोडून उपयोगीं नाहीं. निदान एक वर्षाचें मूल होईपर्यंत हें तोडूं नये. नवव्या महिन्यापासून मुलास कांजी द्यावी. पाणी मिश्रित करून तापवून पाजलेलें दूध फार चांगलें. नंतर हळूहळू गव्हांचें पीठ टाकून उकळून तें द्यावें. भातभाकरी हळूहळू देणें वाईट नाहीं. परंतु निदान एक वर्षपर्यंत देऊं नये परंतु,

दीड वर्षाचे होईपर्यंत मुलास दूध हें अवश्य दिलें पाहिजे. खाऊ देऊं नये. तसेंच पक्क फळें खावयास द्यावीं. कच्चीं फळें खाल्लयानें त्यांस हगवण लागते. त्यांस वारंवार औषध द्यावें.

मुलें लहान असतां तीं निजत नाहींत, ह्मणून त्यांस अफू चारतात. त्यास ' बाळगोळी ' ह्मणतात. पण हें व्यसन त्यांस लहानपणापासून लावणें हें अगदीं वाईट. पुढें वयांत आल्यावर त्यापासून त्यांचे डोळयांस इजा होते.

## प्रसूतीनंतरची बाळंतिणीची व्यवस्था.

**अन्न**–कित्येक लोकांत अशा कांहीं वाईट चाली पडून गेल्या आहेत कीं, बाळंतिणीस देण्यास योग्य तें अन्न मुळींच देत नाहींत. भलतेंच देतात. कांहीं लोक बाळंतिणीचा कोठा साफ व्हावा ह्या निमित्तानें दारू पाजतात. पण ही अपायकारक आहे. कांहीं लोक बाळंतपणाच्या पहिल्या दिवशीं बाळंतिणीस मुळींच अन्न देत नाहींत. दुसऱ्या दिवशीं काढे उकळून ते प्यावयास देतात. जेवणाशिवाय बाळंतिणीस कितीही कां तहान लागेना, पण पाणी ह्मणून मुळींच प्यावयास देत नाहींत. बाळंतिणीचें अन्न साधें असून तें पौष्टिक असावें. खाण्याची इच्छा झाल्यास वेळोवेळीं कांहीं देत जावें, पण तें बेतशीर असावें. एक दोन दिवस बीन दुधाची कांजी द्यावी. चहा, अरारुट, साबूदाणे किंवा तांदूळ ह्यांची कणेरी द्यावी. भातभाकर द्यावी. गरम मसालायुक्त पदार्थ मात्र वर्ज्य करावे. एक आठवड्यानंतर नेहमींचें अन्न देण्यास हरकत नाहीं. थंड पाणी अगर तापवून थंड केलेलें पाणी खुशाल प्यावें, पण तें पिणें बेताबाताचें असावें.

**औषधोपचार**–प्रसूतीनंतर औषध अवश्य द्यावें. पोट स्वच्छ नसलें तर एरंडेल तिसऱ्या दिवशीं द्यावें. कित्येक लोक हें तेल देण्यास हरकत करितात, पण ही त्यांची चूक आहे.

**स्तनावस्था**–कधीं कधीं स्तन कठीण होऊन दुखूं लागतात त्यांस नेहमीं स्वच्छ ठेविलें पाहिजे. ऊन पाण्यांत कपडा भिजवून त्यानें ते शेकावे. खोबरेल तेल लाऊन चोळलें असतां जरा आराम वाटेल. तुरटी पाण्यांत घालून तींत चूचुकें बुडवावीं अगर अफूचीं बोंडें पाण्यांत उकळून त्यानीं शेकावे. प्रत्येक वेळीं मुलास एकाच स्तनाचें दूध पाजूं नये तर फेरबदल करून तें पाजावें.

**पयज्वर**–बाळंत झाल्यावर तीन दिवसपर्यंत लेंकरूं स्तनास न लावलें तर हा ताप येतो. थंडी भरून येणें, कपाळ दुखणें, आंग मोडून येणें, घाम निघणें हीं ह्याचीं लक्षणें होत. स्तन सुजून कठीण, व दुधानें भरून दुखूं लागतात. अशावेळीं एरंडेलाचा एक जुलाब द्यावा व मुलास वारंवार पाजून स्तनांतील दूध काढून टाकावें. असें केल्यानें दोन तीन दिवसांत ताप निघून जातो. स्तनांत दूध जास्त होऊन ते ठणकूं लागल्यास काळ्या धोत्र्याच्या पानांचीं पोल्टीस करून त्याचा स्तनांवर लेप करावा.

**जारवेणा**–प्रसूत झाल्यानंतर थोड्या अवकाशानें गर्भाशय आकुंचन पावत असतां बाळंतिणीच्या पोटांत दुखूं लागलें ह्मणजे त्यांस जारवेणा किंवा वायूगोळा असें ह्मणतात. ह्या होऊं लागल्या ह्मणजे गरम पाण्यांत कपडा भिजवून त्यानें शेकावें. एवढ्यानेंही आराम न वाटला तर अफूच्या अर्काचे १५ किंवा २० थेंब बाळंतिणीस पाण्यांत द्यावे. पहिल्या प्रसूतींत बहुतकरून ह्या वेदना होत नसतात.

**सूतिका**–प्रसूतीपासून तिसऱ्या किंवा पांचव्या दिवशीं ताप येतो, हा फार भयंकर असतो. पयज्वरांत ज्याप्रमाणें पोटदुखी उत्पन्न होते त्याप्रमाणें ह्या तापाच्यावेळीं होत नाहीं. हा ताप बहुतकरून रक्त नासून तें विषारी झालें ह्मणजे येतो. ह्यावेळीं चांगल्या विद्वान व अनुभविक वैद्याचें औषध घ्यावें.

**स्नान**—बाळंतिणीस तिसऱ्या, पांचव्या, सातव्या, किंवा नवव्या दिवशीं स्नान घालतात. तर तसें न करितां जर बाळंतीण सशक्त आहे तर रोज स्नान घालावें. त्यापासून स्वच्छता राहून रोग होण्याचा फारच थोडा संभव असतो. मात्र स्नानानंतर अंग साफ पुसावें व लागलेच कपडे घालावे.

**प्रसूतीनंतर बाळंतिणीस उभें करणें**—बाळंतीण बाळंत झाल्यावर तिची कोणत्या तऱ्हेनें तरतूद ठेवावी, ह्याविषयीं थोडेसें दिग्दर्शन करून हा विषय पुरा करूं.

मूल जन्मून वार बाहेर पडली ह्मणजे बाळंतिणीला उभें करितात, व तिचें पोट दाबतात. असें करण्याचें कारण इतकेंच कीं, तिचा विटाळ जावा हेंच होय. पण ही समजूत वेडेपणाची आहे. बाळंतिणीस मुळीं उठवूं नये तर तीस तसेंच उताणें निजूं द्यावें. निजल्याच्या योगानें गर्भाशयाचें आकुंचन होऊन रक्तस्राव फार होणार नाहीं. बाळंतिणीस उठविल्यानें भांडें ( अंग ) बाहेर येण्याची भीति असते. तिसऱ्या आठवड्यापासून त्यांनीं हळूहळू घरांत फिरावें. ज्या बाया वरील नियमांप्रमाणें वागत नाहींत त्या एखादें दुसरें मूल झालें ह्मणजे ह्मातार्‍या दिसूं लागतात व दुल्या होऊन कमरेंत ठणका मारूं लागतात, ह्मणून आधींच सावध असणें हें बरें.



ग्रंथालय

# अभिप्राय.

सुलभप्रसूति अर्थात् गर्भविमोचन संबंधीं माहिती- हें पुस्तक मीं साद्यंत वाचून पाहिलें. विषय फार महत्वाचा असून एवढ्या लहानशा पुस्तकांत त्याचें थोडक्यांत चांगलें विवरण केलें आहे. भाषा सरळ व साधी असून प्रत्येक मराठी भाषा जाणारांस ती समजण्यासारखी आहे. अशा पुस्तकाची मराठी भाषेत फारच गरज आहे. अशा पुस्तकाला आश्रय देणें हें प्रत्येक महाराष्ट्र देशबांधवाचें कर्तव्य आहे. किंमत फारच थोडी असल्याकारणानें पुस्तक संग्रहीं ठेवण्यास बिलकुल अडचण पडणार नाहीं. यासाठीं प्रत्येक मराठी भाषा जाणणाऱ्या कुटुंबानें हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें अशी मी शिफारस करितों.

ता. १९ माहे एप्रिल १८९१. (सही) अनंत नारायण सांवारे

एल्. एम्. ॲण्ड एस्;

ऑनररी असिस्टंट सर्जन,

जे.जे. हास्पिटल.

रा. रा. मोरो विनायक शिंगणे यांस- आपण केलेलें नवीन पुस्तक "सुलभ प्रसूति" मला दाखविलें. हें पुस्तक शुद्ध, सुलभ आणि सुरस मराठींत लिहिलें आहे. यांतील विषयही बऱ्याच अंशीं शास्त्रीय शब्दांचा उपयोग न करितां सर्वांस समजेल अशा रीतीनें जुळला आहे. एकंदरींत हें पुस्तक चांगलें उपयोगी होईल असें माझें मत आहे.

(सही) भालचंद्र कृष्ण भाटवडेकर. एल्. एम्.

मुंबई, ता. २८ माहे एप्रिल सन १८९१.

**स्तनावस्था**–कधीं कधीं स्तन कठीण होऊन दुखूं लागतात त्यां [illegible] हमीं स्वच्छ ठेविले पाहिजे. ऊन पाण्यांत कपडा भिजवून त्यानें ते [illegible] खोबरेल तेल लाऊन चोळलें असतां जरा आराम वाटेल. तुरटी [illegible] घालून तींत चूचुकें बुडवावीं अगर अफूचीं बोंडें पाण्यांत उकळून [illegible] शेकावे. प्रत्येक वेळीं मुलास एकाच स्तनाचें दूध पाजूं नये तर फे [illegible] करून तें पाजावें.

**पयज्वर**–बाळंत झाल्यावर तीन दिवसपर्यंत लेंकरू स्तनास न लावलें तर हा ताप येतो. थंडी भरून येणें, कपाळ दुखणें, आंग मोडून येणें, घाम निघणें हीं ह्याचीं लक्षणें होत. स्तन सुजून कठीण, व दुधानें भरून दुखूं लागतात. अशावेळीं एरंडेलाचा एक जुलाब द्यावा व मुलास वारंवार पाजून स्तनांतील दूध काढून टाकावें. असें केल्यानें दोन तीन दिवसांत ताप निघून जातो. स्तनांत दूध जास्त होऊन ते ठणकूं लागल्यास काळ्या धोत्र्याच्या पानांची पोल्टीस करून त्याचा स्तनांवर लेप करावा.

**जारवेणा**–प्रसूत झाल्यानंतर थोड्या अवकाशानें गर्भाशय आकुंचन पावत असतां बाळंतिणीच्या पोटांत दुखूं लागलें ह्मणजे त्यांस जारवेणा किंवा वायूगोळा असें ह्मणतात. ह्या होऊं लागल्या ह्मणजे गरम पाण्यांत कपडा भिजवून त्यानें शेकावें. एवढ्यानेंही आराम न वाटला तर अफूच्या अर्काचे १५ किंवा २० थेंब बाळंतिणीस पाण्यांत द्यावे. पहिल्या प्रसूतींत बहुतकरून ह्या वेदना होत नसतात.

**सूतिका**–प्रसूतीपासून तिसऱ्या किंवा पांचव्या दिवशीं ताप येतो, हा फार भयंकर असतो. पयज्वरांत ज्याप्रमाणें पोटदुखी उत्पन्न होते त्याप्रमाणें ह्या तापाच्यावेळीं होत नाहीं. हा ताप बहुतकरून रक्त नासून तें विषारी झालें ह्मणजे येतो. ह्यावेळीं चांगल्या विद्वान व अनुभविक वैद्याचें औषध घ्यावें.

**स्नान**—बाळंतिणीस तिसऱ्या, पांचव्या, सातव्या, किंवा नवव्या दि-वशीं स्नान घालतात. तर तसें न करितां जर बाळंतीण सशक्त आहे तर रोज स्नान घालावें. त्यापासून स्वच्छता राहून रोग होण्याचा फारच थोडा संभव असतो. मात्र स्नानानंतर आंग साफ पुसावें व लागलेच कपडे घालावे.

**प्रसूतीनंतर बाळंतिणीस उभें करणें**—बाळंतीण बाळंत झाल्यावर तिची कोणत्या तऱ्हेनें तरतूद ठेवावी, ह्याविषयीं थोडेसें दिग्दर्शन करून हा विषय पुरा करूं.

मूल जन्मून वार बाहेर पडली ह्मणजे बाळंतिणीला उभें करितात, व तिचें पोट दाबतात. असें करण्याचें कारण इतकेंच कीं, तिचा विटाळ जावा हेंच होय. पण ही समजूत वेडेपणाची आहे. बाळंतिणीस मुळीं उ-ठवूं नये तर तीस तसेंच उताणें निजूं द्यावें. निजल्याच्या योगानें गर्भाश-याचें आकुंचन होऊन रक्तस्राव फार होणार नाहीं. बाळंतिणीस उठ-विल्यानें भांडें ( अंग ) बाहेर येण्याची भीति असते. तिसऱ्या आठवड्या-पासून त्यांनीं हळूहळू घरांत फिरावें. ज्या बाया वरील नियमांप्रमाणें वागत नाहींत त्या एखादें दुसरें मूल झालें ह्मणजे ह्मातार्‍या दिसूं लागतात व ढिल्या होऊन कमरेंत ठणका मारूं लागतात, ह्मणून आधींच सावध असणें हें बरें.



... ग्रंथालय ...

# अभिप्राय.

सुलभप्रसूति अर्थात् गर्भविमोचन संबंधीं माहिती- हें पुस्तक मीं साद्यंत वाचून पाहिलें. विषय फार महत्वाचा असून एवढ्या लहानशा पुस्तकांत त्याचें थोडक्यांत चांगलें विवरण केलें आहे. भाषा सरळ व साधी असून प्रत्येक मराठी भाषा जाणणारांस ती समजण्यासारखी आहे. अशा पुस्तकाची मराठी भाषेंत फारच गरज आहे. अशा पुस्तकाला आश्रय देणें हें प्रत्येक महाराष्ट्र देशबांधवाचें कर्तव्य आहे. किंमत फारच थोडी असल्याकारणानें पुस्तक संग्रहीं ठेवण्यास बिलकुल अडचण पडणार नाहीं. यासाठीं प्रत्येक मराठी भाषा जाणणाऱ्या कुटुंबानें हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें अशी मी शिफारस करितों.

ता. १९ माहे एप्रिल १८९१. (सही) अनंत नारायण सांवारे

एल्. एम्. ॲण्ड एस्;

ऑनररी असिस्टंट सर्जन,

जे.जे. हास्पिटल.

रा. रा. मोरो विनायक शिंगणे यांस- आपण केलेलें नवीन पुस्तक "सुलभ प्रसूति" मला दाखविलें. हें पुस्तक शुद्ध, सुलभ आणि सुरस मराठींत लिहिलें आहे. यांतील विषयही बऱ्याच अंशीं शास्त्रीय शब्दांचा उपयोग न करितां सर्वांस समजेल अशा रीतीनें जुळला आहे. एकंदरींत हें पुस्तक चांगलें उपयोगी होईल असें माझें मत आहे.

(सही) भालचंद्र कृष्ण भाटवडेकर. एल्. एम्.

मुंबई, ता. २८ माहे एप्रिल सन १८९१.

त्वरा करा-फारच उपयुक्त पुस्तकें--संधी दवडूं नका.

## जाहिरात.

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| १ यशवंत विजया नाटिका ................... | ० | ४ | ० |
| २ मुंबईचा वृत्तांत ............................. | २ | ० | ० |
| ३ ऋण विमोचन ........................... | ० | ४ | ० |

तयार होत आहे.

### कन्याविक्रय दुष्परिणाम नाटक.

फारच मनोवेधक झालें आहे. ह्यांत कन्याविक्रयापासून होणारे गैर फायदे व तदंगभूत दुष्परिणाम ह्यांचें हुबेहूब चित्र दाखविलें आहे. सर्व ग्रंथ मुख्यतः हास्यरसानें भरला आहे. ह्याच्या वाचनापासून गृहस्थितींत पुष्कळ फायदे झाल्यावांचून राहणार नाहींत, अशी ग्रंथ कर्त्यांस पूर्ण आशा आहे. पांचशें ग्राहक मिळाल्याबरोबर पुस्तक छापून बाहेर पडेल. आज फक्त सह्या पाहिजे आहेत. किंमत फारच माफक ह्मणजे आठ आण्याचे आंतच ठेविली जाईल. नक्की किंमत मागाहून कळवूं. पुस्तक वाचून बऱ्याच विद्वानांनी ह्याच्या उपयुक्ततेबद्दल व भाषासौरस्याबद्दल आपले अनुकूल असे अभिप्राय प्रगट केले आहेत.

बाळकृष्ण बापू आचार्य.
मोरो विनायक शिंगणे.
पुस्तक कर्ते.

श्री

# सहदेवमतकृत

# प्रश्नावली

हें पुस्तक

नारायण धोंडनाथबावा माहाडकर

यांनीं तयार केलें

तें

## मुंबई येथें

## तात्या राघोजी कदमयांनीं

बॉम्बेसिटी छापखान्यांत

छापिलें.

शके १८१३.

सर्वप्रकारचा हक्क मालकानें आपणाकडे ठे. आ

# विद्याभ्यास करितां केसें पावे १

| | | | |
|---|---|---|---|
| १ वासुदेव | ३ अगस्ती | ५ अंगिरा | ७ बृहस्पति |
| १० वाल्मीक | नकुळ मंडळ लिखितं | | ९ वशिष्ठ |
| ८ भार्गव | ६ पौलस्ती | ४ दुर्वास | २ विश्वामित्र |

## व्यापार करितां केसें पावेल २

| | | | |
|---|---|---|---|
| १ अंगिरा | ३ बृहस्पति | ५ वशिष्ठ | ७ वासुदेव |
| १० दुर्वास | सूत्र मंडळ जाणावें. | | ९ अगस्ती |
| ८ विश्वामित्र | ६ वाल्मिक | ४ भार्गव | २ पौलस्ती |

## ही यात्रा करितां केसें पावेल ३

| | | | |
|---|---|---|---|
| १ वाल्मीक | ३ विश्वामित्र | ५ दुर्वास | ७ पौलस्ती |
| १० वशिष्ठ | सहदेव मंडळ जाणावें. | | ९ भार्गवी |
| ८ बृहस्पति | ६ अंगिरा | ४ अगस्ती | २ वामदेव |

## मन वांछित पुरेल कीं काय ४

| | | | |
|---|---|---|---|
| १ अंगद | ३ नीळ | ५ सुषेण | ७ हनुमंत |
| १० मधुऋषि | श्रीपुरुदासाचें मंडळ. | | ९ कपी |
| ८ तराळऋषि | ६ सुग्रीव | ४ जांबुवंत | २ नळ |

## धान्य संग्रह करितां कैसें पावे ५

| | | | |
|---|---|---|---|
| १ बृहस्पति | ३ वसिष्ठ | ५ वासुदेव | ७ अगस्ती |
| १० पौलस्ती | श्रीराम मंडळ जाणावें. | | ९ अंगिरा. |
| ८ दुर्वास | ६ विश्वामित्र | ४ वाल्मीक | २ भार्गव |

## गर्भिणीस पुत्र होईल कीं काय ६

| | | | |
|---|---|---|---|
| १ नीळ | ३ सुषेण | ५ हनुमंत | ७ कपी |
| १० नळ | हें मंडळ हंसाचें जाणावें | | ९ अंगद. |
| ८ मधुऋषि | ६ तराळ | ४ सुग्रीव | २ जांबुवंत |

## हा उदीम करितां कैसा होय ७

| | | | |
|---|---|---|---|
| १ गंधमादन | ३ गवाक्ष | ५ वामदेव | ७ दधीमुख |
| १० मार्कंडेय | श्रीहंसाचें मंडळ. | | ९ तराळ. |
| ८ गौतम | ६ भगीरथ | ४ गौऋषि | २ ज्ञातबळु |

## वस्तु घेतां कैसें होईल ८

| | | | |
|---|---|---|---|
| १ भार्गव | ३ वाल्मीक | ५ विश्वामित्र | ७ दुर्वास |
| १० बृहस्पती | सोममंडळ जाणावें. | | ९ पौलस्ती |
| ८ अंगिरा | ६ अगस्ती | ४ वासुदेव | २ वसिष्ठ |

## परदळ भय निवारील काय ९

| | | | |
|---|---|---|---|
| १ तराळ | ३ गंधमादन | ५ गवाक्ष | ७ वामदेव |
| १० गौतम | हें सिंहाचें मंडळ जाणावें | | ९ दधीमुख |
| ८ भगीरथ | ६ गौऋषी | ४ ज्ञातबळू | २ मार्कंडेय |

## ही गोष्ट सत्य कीं असत्य १०

| | | | |
|---|---|---|---|
| १ कपी | ३ अंगद | ५ नीळ | ७ सुषेण. |
| १० तारू | हे चंडिकेचें मंडळ जा० | | ९ हनुमंत. |
| ८ सुग्रीव | ६ जांबुवंत | ४ नळ | २ मधु |

## हा विवाह करितां कैसें पावे ११

| | | | |
|---|---|---|---|
| १ शतवल्गु | ३ गौऋषी | ५ भगीरथ | ७ गौतम |
| १० गंधमादन | हें संपत्तीचें मंडळ जाणा० | | ९ मार्कंडेय |
| ८ तराळ | ६ दधीमुख | ४ वामदेव | २ गवाक्ष |

## हें दुखणें कैसें जाणावें १२

| | | | |
|---|---|---|---|
| १ हनुमंत | ३ कपी | ५ अंगद | ७ नीळ. |
| १० सुग्रीव | हें कपोताचें मंडळ जा० | | ९ सुषेण. |
| ८ जांबुवंत | ६ नळ | ४ मधुऋषि | २ तारू |

## गांवास गेला तो कैसा येईल १३

| | | | |
|---|---|---|---|
| ११ वसिष्ठ | ३ वासुदेव | ५ अगस्ती | ७ अंगिरा |
| १० भार्गव | हें भारद्वाजाचें मंडळ | | ९ बृहस्पती |
| ८ पोलस्ती | ६ दुर्वास | ४ विश्वामित्र | २ वाल्मीक |

## धुरेपाशीं जातां केसें होईल १४

| | | | |
|---|---|---|---|
| १ दधीमुख | ३ तराळ | ५ गंधमादन | ७ गवाक्ष |
| १० भगीरथ | हें जगमंडळ जाणावें. | | ९ वासुदेव |
| ८ गोऋषि | ६ शातबळू | ४ मार्कंडेय | २ गौतम. |

## येथून गमन करितां केसें होईल १५

| | | | |
|---|---|---|---|
| १ गवाक्ष | ३ वामदेव | ५ दधीमुख | ७ तराळ |
| १० शातबळु | जटायुपक्षी याचें मंडळ. | | ९ गंधमादन |
| ८ मार्कंडेय | ६ गौतम | ४ भगीरथ | २ गोऋषी |

## हीस्त्री करितां कैसी पावे १६

| | | | |
|---|---|---|---|
| १ मार्कंडेय | ३ शातवळु | ५ गोऋषी | ७ भगीरथ |
| १० तराळ | हें हासलाचें मंडळ | | ९ गोतम. |
| ८ दधीमुख | ६ वामदेव | ४ गवाक्ष | २ गंधमादन |

## हें घर करितां कैसें पावे १७

| | | | |
|---|---|---|---|
| १ गोतम | ३ मार्कंडेय | ५ शातवळू | ७ गोऋषि |
| १० दधीमुख | हें मयूराचें मंडळ जा० | | ९ भगीरथ |
| ८ वामदेव | ६ गवाक्ष | ४ गंधमादन | २ तराळ |

## ऋण देतां कैसें पावे १८

| | | | |
|---|---|---|---|
| १ पौलस्ती | ३ भार्गव | ५ वाल्मीक | ७ विश्वामित्र |
| १० अंगिरा | ध्रुव मंडळ जाणावें. | | ९ दुर्वास. |
| ८ अगस्ती | ६ वासुदेव | ४ वसिष्ठ | २ बृहस्पती |

## ही मैत्री करितां केसें पावे १९

| | | | |
|---|---|---|---|
| १ सुषेण | ३ हनुमंत | ५ कपी | ७ अंगद. |
| १० जांबुवंत | हें भारद्वाजाचें मंडळ | | ९ नीळ |
| ८ नळ | ६ मधु | ४ तारू | २ सुग्रीव |

## हें शेत करितां केसे पावे २०

| | | | |
|---|---|---|---|
| १ मधु | ३ नळ | ५ जांबुवंत | ७ सुग्रीव |
| १० कपी | हें कूर्माचें मंडळ. | | ९ तारू |
| ८ हनुमंत | ६ सुषेण | ४ नीळ | २ अंगद. |

## हें लेंकरूं भाग्यवंत होईल काय २१

| | | | |
|---|---|---|---|
| १ वामदेव | ३ दधीमुख | ५ तराळ | ७ गंधमादन |
| १० गौऋषी | हें नकुळाचें मंडळ. | | ९ गवाक्ष |
| ८ शतबळु | ६ मार्कंडेय | ४ गौतम | २ भगीरथ |

## येथें मान केसा होईल २२

| | | | |
|---|---|---|---|
| १ जांबुवंत | ३ सुग्रीव | ५ तारू | ७ मधु |
| १० नीळ | हें पिलाचें मंडळ. | | ९ नळ |
| ८ अंगद | ६ कपी | ४ हनुमंत | २ सुषेण. |

## हा व्यवहार करितां केसें पावे २३

| | | | |
|---|---|---|---|
| १ गौऋषि | ३ भगीरथ | ५ गौतम | ७ मार्कंडेय |
| १० गवाक्ष | चववीचें मंडळ. | | ९ शतबळु |
| ८ गंधमादन | ६ तराळ | ४ दधीमुख | २ वासुदेव. |

## वैर करितां कैसें पावे २४

| | | | |
|---|---|---|---|
| १ सुग्रीव | ३ तारू | ५ मदु | ७ नळ |
| १० सुषेण | हे डोळ्याचें मंडळ. | | ९ जांबुवंत |
| ८ नीळ | ६ अंगद | ४ कपी | २ हनुमंत |

## ही पारध करितां केसें पावे २५

| | | | |
|---|---|---|---|
| १ दुर्वास | ३ पौलस्ती | ५ भार्गव | ७ वाल्मिक |
| १० अगस्ती | वायु मंडळ जाणावें. | | ९ विश्वामित्र |
| ८ वासुदेव | ६ वसिष्ठ | ४ बृहस्पती | २ अंगिरा. |

## हें धन घेतां केसें असे २६

| | | | |
|---|---|---|---|
| १ नळ | ३ जांबुवंत | ५ सुग्रीव | ७ तारू |
| १० अंगद | हें नकुळ मंडळ जाणावें | | ९ मदु |
| ८ कपी | ६ हनुमंत | ४ सुषेण. | २ नीळ |

## स्थानचलन करितां केसें २७

| | | | |
|---|---|---|---|
| १ विश्वामित्र | ३ दुर्वास | ५ पौलस्ती | ७ भार्गव. |
| १० वामदेव | गरुडाचें मंडळ जाणावें. | | ९ वाल्मीक |
| ८ वसिष्ठ | ६ बृहस्पती | ४ अंगिरा | २ अगस्ती |

## विवाद करितां कैसें पावे २८

| | | | |
|---|---|---|---|
| १ नारू | ३ मधु | ५ नळ | ७ जांबुवंत |
| १० हनुमंत | जंबुक मंडळ जाणावें. | | ९ सुग्रीव |
| ८ सुषेण | ६ नीळ | ४ अंगद | २ कपी |

## हरपलें तें सांपडेल काय २९

| | | | |
|---|---|---|---|
| १ भगीरथ | ३ गौतम | ५ मार्कंडेय | ७ शतवळु |
| १० वासुदेव | हें साळ्याचें मंडळ जाणा० | | ९ गौत्रऋषि |
| ८ गवाक्ष | ६ गंधमादन | ४ तराळ | २ दधीमुख |

## येथें वास्तव्य कैसें पावे ३०

| | | | |
|---|---|---|---|
| १ अगस्ती | ३ अंगिरा | ५ बृहस्पती | ७ वसिष्ठ |
| १० विश्वामित्र | अगस्तिमंडळ जाणावें. | | ९ वामदेव. |
| ८ वाल्मीक | ६ भार्गव | ४ पौलस्ती | २ दुर्वास |

## पोलस्तिऋषि

१ ऋण देसी परी कष्टी हो तां येईल.
२ व्यापार करितांलाभ होईल
३ हे पारधी कौतुक असे.
४ वास्तव्य करितां सुख नाहीं.
५ स्थान चलन करितां सुख नसे.
६ विद्याभ्यास कीजे प्राप्त होईल.
७ यात्रा न कीजे राजभय असे.
८ गांवास गेला तो सुखें येईल चिंता नाहीं.
९ वस्तु घेसी परी सिद्धि न पावे.
१० धान्यसंग्रह कीजे लाभ होईल.

## विश्वामित्र

१ स्थान चलन करावें वैर पडे.
२ विद्याभ्यास नवीन कीजे.
३ यात्रा करितां हानि असे.
४ गांवास गेला तो सलाम-त येईल.
५ वस्तु धारजिणी नाहीं न घेणें.
६ धान्यसंग्रह कीजे लाभ आ०
७ रीण देतां बहुतां दिवशीं उगवेल.
८ व्यापार करतां लाभ असे.
९ पारधीस जासी परी न मिळे.
१० येथें वास्तव्य करितां लाभ.

## ३ बृहस्पति.

१ धान्यसंग्रह करितां मुद्दल होईल.

२ रीण देतां शीण होईलअ
पयश होईल.
३ व्यापार निर्जळ असे.
४ पारधीस न जावें.
६ स्थान चलन करितां बरवें
असे.
७ विद्याभ्यास करीत असावें
८ यात्रा करितां कळी होईल.
९ गांवास गेला तो येत आहे.
१० वस्तु घेतां सिद्धि होईल.
५ वास्तव्य करितां सुख पावे.

## ८ सुग्रीवऋषि.

१ वैर करितां हानी असे.
२ ही मैत्री करितां बरी असे.
३ थोरापाशीं मान बरवा पा-
वशील.
४ ही गर्भिणी असतां पुत्र
होईल.
५ हें घेणें न पावे घेऊं नये.
६ ही इच्छा न पावे आणि
सिद्धि न पावे.
७ हें शेत करितां भूतबाधा
असे.
८ ही वार्ता सत्य असे. लटकी
नसे.
९ हा वाद करितां नाश असे.
१० हें दुरवणें नष्ट असे. धर्म
केलिया वांचेल.

## ५ वाल्मीकऋषि.

१ यात्रा करितां बरें होईल.
२ गांवास गेला तो सुखी
आहे. येईल.
३ वस्तु घेतां सिद्धीस जाईल.
४ धान्यसंग्रह कीजे लाभ हो
ईल.
५ ऋण देसी परी हळू येईल.

६ व्यापार करितां खोळं-
बा असे.
७ पारधीस गेलिया निर्फळ
असे.
८ वास्तव्य कीजे पोटभरेल.
९ स्थान चलन करितां बरवें
असे.
१० विद्याभ्यास करितां सि-
द्धि न पावेल.

## ६ जांबुवंतऋषि.

१ येथें मान बरवा होईल.
२ गर्भिणीस पुत्र होईल.
३ घेणें घेतां बरवें असे.
४ ही इच्छा पावशील कार्य
होईल.
५ हें शेत पिकेल परी म-
ध्यम असे सुख आहे.
६ ही वार्ता सत्य असे. ल-
टकी नव्हे.
७ हा वाद करितां धारजि-
णें असे.
८ हें दुखणें असाध्य असे.
९ हें वैर करितां सिद्धि पावे-
ल. संशय नको.
१० ही मैत्री करितां सिद्धी
असे.

## ७ तराळऋषि.

१ परदळाचें भय नाहीं नि-
वारेल.
२ हें घर उभविजे सिद्धीस
जाईल.
३ हे धुरे चोरवटें करील न-
भेटे.
४ हें हारपलेलें सांपडेल.
५ हें लेंकरूं सुदैवी होईल.
६ हा व्यवहार करितां त्रास

होईल.

७ हे गमनीं नाश असे गमन न कीजे.

८ हा वाद करितां प्रतिष्ठा वाढेल.

९ हा उदीम करितां नाश असे.

१० ही स्त्री न कीजे यापासून घात असे.

## ८ वसिष्ठऋषि.

१ गांवास गेला तो स्वस्थ आहे.

२ वस्तु घेतां धारणेनें जाईल.

३ धान्य संग्रह करितां लाभ होईल.

४ रीण देतां सुख होईल.

५ हा व्यापार करितां लाभ असे.

६ पारध न करावी सिद्धी न होईल.

७ वास्तव्य करितां बरें असे.

८ स्थानचलन न करावें. अपाय असे.

९ विद्याभ्यास करितां अपाय असे.

१० यात्रा करितां सुखहोईल.

## ९ हनुमंत.

१ दुखणें बरें होईल.

२ वैर करितां वैरी क्षीणतील.

३ मैत्री उभय आंगीं असे.

४ मान्यता होईल.

५ गर्भिणीस पुत्र होईल.

६ हें घेणें घ्यावें इच्छा पावशील कार्य होईल.

७ इच्छा पावशील कार्य होईल.
८ शेत करितां मध्यम होईल
९ हीवार्ता सत्य असे लट-की नव्हे.
१० व्यवहार करितां बरानाहीं

## १० भार्गवऋषि.

१ हीवस्तु घेतांउपयोगी पडेल.
२ धान्य संग्रह कीजे लाभ असे.
३ रीण दिजे लाभ असे.
४ व्यापार करितां लाभ असे.
५ पारधीस जावें पारध मिळेल.
६ ह्या वस्तूस दुःख आहे.
७ स्थान चलन न करावें.
८ वीजयास कीजे
९ यात्रेस जाणें बरवें असे.
१० गावास गेला तो येत असे.

## ११ वामदेव.

१ लेंकरूं दैववानअसतांही सुने.
२ यात्रा होऊन येईल.
३ गमन करितां सुख पावशील
४ विवाह करितां नाश होईल.
५ व्यापार करितां लाभ होईल.
६ ही स्त्री करितां सुख मिळेल.
७ परदळ हैराण होईल.
८ घर बांधतां लाभ असे.
९ येथें वास्तव्य करितां उणें नाहीं.
१० स्थान चलन न कीजे.

## १२ मधुऋषि.

१ शेत करितां सिद्धि न पावे.

२ ही वार्ता सत्य नाहीं.

३ वाद करितां यश नाहीं.

४ दुखणें कष्ट देईल.

५ वैर करूं नये.

६ मैत्री न कीजे.

७ येथेंमान मध्यम होईल.

८ गर्भिणीस पुत्र होईल.

९ देणें आल्यांस मध्यम मिळेल.

१० इच्छिलें पावशील.

## १३ गंधमादन.

१ उदीम करितां लाभ होईल.

२ ही स्त्रीकरितां सुख होईल.

३ परदळ भय होईल.

४ हें घरबांधितां खोळंबा होय.

५ धुरेपाशीं कांहीं न मिळे.

६ हरपलेलें घरच्या हातीं मिळेल.

७ लेंकरूं भाग्यवान होईल.

८ व्यवहार करतां हरशील.

९ वाटेंत नाश असे.

१० गोष्टीस लाभ असे.

## १४ मार्कंडेयऋषी.

१ ही स्त्री करितां सुख पावशील.

२ परदळ भय नाहीं.

३ घर बांधिजे.

४ धुरेपाशीं बरवें असे.

५ हरपलेलें न मिळे.

६ लेंकरूं नशीबवान होईल.

७ व्यवहार कीजे.
८ गमन कीजे.
९ विद्यासिद्धीस न पावे.
१० उदीम करतां विलंब असे

## १५ गोऋषि.

१ व्यवहार करितां लाभ नाहीं.
२ गमन करितां संगत मिळेल.
३ हा विवाह बरा नसे.
४ व्यवहार बरा नाहीं.
५ ही स्त्री न कीजे वांकडें होईल.
६ परदळ भय असे जाऊं नये.
७ घर बांधूं नये घडा नाहीं.
८ धुरेपाशीं जाऊं नये यश नाहीं.
९ हरपलें न मिळे.
१० लेंकरूं दरिद्री असे.

## १६ भगीरथऋषि.

१ हरपलेलें मिळेल चिंता नाहीं.
२ हें मूल भाग्यवंत होईल.
३ हा व्यवहार चांगला असे.
४ गमन करूं नये विघ्न असे.
५ विवाह करूं नये.
६ उदीम करितां मुद्दल मिळेल.
७ ही स्त्री करूं नये.
८ परदळास भय आहे.
९ घर बांधतां नड होईल.
१० धुरेपाशीं बरवें असे.

## १७ दधीमुखऋषी.

१ धुरेपाशीं जाऊं नये.
२ हरपलेलें न मिळे.

३ लेंकरूं अभागी होईल.
४ व्यवहार कीजे.
५ गमन न कीजे.
६ विवाह कीजे.
७ उदीम कीजे.
८ ही स्त्री न कीजे.
९ परद्रव्यीं भय आहे.
१० हें घर बांधित असे. सिद्धी पावे.

## १८ वासुदेव.

१ वियाभ्यास कीजे.
२ हा व्यवहार करितां सुरव असे.
३ गांवीं गेला तो येत असे.
४ वस्तु घेइजे धारणीनें. जाईल.
५ धान्यसंग्रह कीजे लाभ होईल.
६ रीण देसी हातासी नये.
७ व्यवहारीं लाभ असे.
८ पारधीस सुरव असे.
९ धुरेवरी बरें असे.
१० हरपलेलें बहुतां दिवशीं सांपडेल.

## १९ नळऋषी.

१ देणेंनघेइजे इच्छा पावशील.
२ इच्छा न पावशील.
३ शेत करितां चांगलें नाहीं.
४ वार्ता लटकी नव्हे.
५ वाद करूं नये.
६ दुरवणें नड असे. धर्म कीजे.
७ वैर करितां सीतळ असे.
८ मैत्री करूं नये.

९ मान बरा होईल.

१० गर्भिणीस पुत्र होईल.

## २० कपी.

१ वार्ता लटकी नव्हे.

२ व्यवहार नष्ट असे. लोभ धरूं नये.

३ दुखणें स्वल्प असे.

४ व्यवहार करितां वैरी नासे.

५ मैत्री करितां सम असे.

६ मान नीका होईल.

७ गर्भिणीस कन्या होईल.

८ देणें येईल चिंता नाहीं.

९ इच्छिलें पावशील.

१० शेत करितां चांगलें होईल.

## २१ गवाक्ष.

१ गमन केल्यास लाभ असे

२ हा विवाह करितां संतोष नाहीं.

३ उदीम करितां लाभ असे.

४ ही स्त्री करितां चांगलें होईल.

५ परदळ भय नाहीं.

६ घर बांधणें चांगलें होईल.

८ हरपलेलें सायासीं सांपडेल.

७ धुरेपाशीं अभय असे.

९ लेंकरूं भाग्यवंत होईल.

१० व्यवहार करतां चांगला होईल.

## २२ नीळ.

१ गर्भिणीस कन्या होईल.

२ हें देणें न मिळे.

३ इच्छा न मिळे.

४ शेत अपार पिकेल.

५ वार्ता लटकी चिंता न कीजे.

६ व्यवहार करितां यशमिळे.
७ हें दुरवणें स्वल्पअसे चिं-
ता न कीजे.
८ वैर करितां वैरी नाशतील
९ मैत्री करितां सिद्धि होईल
१० येथें मान बरवा होईल.

## २३ गौतमऋषि.

१ हें घर बांधणें.
२ धुरेपाशीं जाइजे बरवें असे
३ हरपलेलें सांपडेल.
४ लेंकरूं भाग्यवान होईल.
५ व्यवहार कीजे.
६ गमन करितां सुरव वाटे.
७ हा विवाह करितां लाभ
होईल.
८ उदीम करितां लाभ असे.
९ हीस्त्री करितां लाभ असे
१० परदळ भय नाहीं.

## २४ अंगद.

१ इच्छा पावशील कार्य
होईल.
२ शेत करितां बरवें असे.
३ ही वार्ता सत्य असे.
४ विवाद करितां नष्ट असे.
५ हें दुरवणें नड असे. पुण्य
केल्यास वांचेल.
६ वैरकरितां जय असे नाश०
७ मैत्रीकरितां सिद्धीस जा०
८ येथें मान बरवा असे.
९ गर्भिणीस कन्या होईल.
१० हें देणें पावे. विचार नाहीं.

## २५ अगस्ती.

१ वास्तव्य करितां मिळून
असावें.
२ स्थान चलन करावें सुरव.
३ विद्याभ्यास कीजे.

४ यात्रा करितां पुढें तंटा हो०
५ गांवास गेला त्यास नड येईल.
६ वस्तु घेइजे.
७ धान्य संग्रह कीजे.
८ रीण देइजे सुरवें येईल.
९ व्यवहार करितां लाभ असे.
१० पार्धीस जाणें सिद्धी असे

## २६ सुषेण.

१ मैत्री करितां आपपातरेल.
२ येथें मान निका होईल.
३ गर्भिणीस कन्या होईल.
४ हें देणें देण्यास विघ्न येईल.
५ इच्छित पावसी. सिद्धीस जाईल.
६ शेत बरवें पिकेल.
७ ही वार्ता लटकी सत्यनव्हे
८ हा विवाद कीजे.
९ हें दुरवणें ऋणी असे.
१० वैर करितां सिद्धीस जाई

## २७ शातबळु ऋषी.

१ विवाह न कीजे.
२ हा उदीम करितां हार असे
३ ही स्त्री करितां धन असे
४ परदळ भय असे.
५ हें घर उभारणें सिद्ध असे
६ धुरेपाशीं बरवें असे.
७ हरपलेलें सांपडेल.
८ हें लेंकरूं आईपरायण हो०
९ व्यवहार सुरवें कीजे.
१० गमनीं लाभ असे.

## २८ अंगिरा ऋषी.

१ व्यापार करितां लाभ असे.
२ यात्रा केलिया परधन मिळे.
३ वास्तव्य केलिया नड असे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ...
अनुक्रमांक.................. दि ..................
वर्ग.................. नोंद दि ..................


४ स्थान चलन न कीजे.
५ विद्याभ्यास कीजे बरें असे.
६ यात्रा करितां जतन कीजे.
७ गांवास गेला असे.
८ वस्तु घेतली जाईल.
९ धान्यासी लाभ असे.
१० रीण देतां लाभ होईल.

## २९ तारकऋषि.

१ व्यवहार करतां लाभ असे
२ हें दुखणें जड असे.
३ वैर न कीजे.
४ मैत्री कीजे.
५ मान बरवा होईल.
६ पुत्र देईल. सुख पावशील.
७ देणें न पावेल.
८ इच्छा पावशील.
९ शेत न कीजे
१० ही वार्ता सत्य असे.

## ३० दुर्वासऋषी.

१ पारधीस जाई परी लाभ होय.
२ वास्तव्य करितां सुख होईल.
३ स्थानचलन करितां सुख हो॰
४ विद्याभ्यास करितां येईल.
५ यात्रेस न जाणें.
६ गांवास गेला तो सुखी आ॰
७ वस्तु वेतां सुख पावशील.
८ धान्यसंग्रह कीजे लाभ हो॰
१० व्यापार करितां लाभ होय.
९ ऋण देतां मुद्दल होईल.



ही प्रश्नावली प्रत्येक अंकावर सुपारी अथवा पानाचा विडा ठेवून जो अंक येईल, त्या ऋषीच्या त्या अंकांत प्रश्न पाहण्याची आहे. उदाहरण आपणांस कांहीं वस्तु घेणें असेल तर ( वस्तु घेतां कैसें होईल. ) ह्या प्रश्नाच्या कोष्टकांतील कोणत्याही अंकावर सुपारी ठेवावी. व त्या अंकाजवळच ऋषीचें नांव आहे तो ऋषि पुढील अनुक्रमांत पाहून त्यांच्या अंकापुढील उत्तर समजावें.



श्रीराष्ट्रप्रेममाला, वर्ष २ रें, पुष्प ५ वें.

# तेजस्वी तरुण



येत्या वर्षप्रतिपदेस नक्की प्रसिद्ध होणार !

# मौजेचें संगीत नाटक.

रंगभूमीवर येण्याइतकें मोठें.

# स्व रा ज्य सुं द री ! !

स्वतंत्र पुस्तक किं. ८१२ व्ही. पी. ट. पॅ. ख. ८३ निराळा.

चित्रें—आमचे खास चित्रकार रा. खरे यांच्या सफाईदार कुंचल्यांतून उतरलीं आहेत.

पद्यें—स्वयंवर, मानापमान, विद्याहरण, राक्षसी महत्त्वाकांक्षा, मूकनायक, पुण्यप्रभाव, धनुर्भंग, सौभद्र वगैरे लोकप्रिय नाटकांतील, रागदारीच्या मोहक चालींवर सुबोध व गोड पद्यांची मुद्दाम रचना केली आहे.

प्रसंग—थरारून सोडणारे व तरुणांच्या हृदयास पीळ पाडणारे आहेत.

विनोद—मार्मिक व संविधानकाला अत्यंत पोषक आहे.

विषय—स्वराज्यस्फूर्ति उत्पन्न करून साम्राज्याचा स्वातंत्र्याभिमान जागृत करणारा आहे.

पात्रें—हिंदवीर, स्वराज्यसुंदरी, वाग्देव, सुंदरकांत, ऑगल्, मंगल, बिजली, रिझली, सोमकांत इ. इ. इ.

मालेंतूनच प्रसिद्ध होईल.

बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई नं. ४

॥ ॐ ॥

श्रीराष्ट्रप्रेममाला वर्ष २ रें अंक ५.वा.

# तेजस्वी तरुण.

( एक राष्ट्रीय सुरस कथा. )

## स्वराज्यदेवतेचे व्यासदेव
## व
## फाजील दीड शहाणे !

( एक राष्ट्रैक्यसुंदर छोटा लेख. )

फेब्रुआरी सन १९१९.

# कवीची प्रार्थना.

कविः — देवला, चारुदत्ताला राजमार्ग दिसण्याकरितां तूं चंद्राची मोठ्या कौशल्यानें काव्यांत योजना केलीस, परंतु आह्मां हिंदवासियांनां स्वराज्य—मार्ग दाखविण्याकरितां जो 'भानु' आपले किरण दशदिशांनां पसरीत आहे त्याला कसा अगदींच विसरलास?—

पद—' रजनिनाथ हा ' ही चाल—त्रिताल.

' तिलक '-भानु हा नभीं उदेला ।
राज्य-पथीं जणुं वीरचि गमला ।। ध्रु० ।।
प्रखर तेज हें चमके व्योमीं ।
विघ्न-शकट हा टाकी होमीं ।
भीतीचा कीं लेशचि न मनीं ।
देह-भाव हा सोडुनि दिधला ।। १ ।।

---

कविः — हे आर्यमातेच्या सुपुत्रांनों, आपल्या मातेची होत असलेली दुर्दशा नीट डोळे उघडून पहा—

पद—' तुम हम संग ' ही चाल—त्रिताल.

झडकरि उठुनचि पाहि पाहि ही ।। ध्रु० ।।
हिंद-धेनु जडपंकीं रुतली ।
खाती सकलचि हा बली ।
पर-वच नच साही ।। १ ।।
निःशस्त्रचि प्रतिकार करोनि ।
गांधी-टिळक-महामुनी ।
सकल-जिवित वाही ।। २ ।।

" एक विद्यार्थी. "

२
२००

॥ ॐ ॥

# तेजस्वी-तरुण.

( लेखक—इंदिराकांतराय मु० शिरपूर. )

[ शिवाजी महाराज निजले आहेत असा पडदा उघडतो. ]

[ महाराजांना ठार मारण्याकरितां एक तरुण प्रवेश करतो ]

**तरुणः**—या ठिकाणीं येऊन पोहोंचायला, इतका वेळपर्यंत मला किती तरी धड-पड करावी लागली, किती तरी चौकी पहाऱ्यांना चकवावं लागलं, तेव्हां कोठें इच्छित स्थळीं येऊन पोहोंचलों ! हातीं घेतलेलं काम अत्यंत विकट आणि महत्त्वाचं तर खरंच. पण आतां काय त्याचं ! एक तर हातीं घेतलेलं कार्य तरी पुरं होईल, नाहीं तर स्वतःचा जीव तरी जाईल. अंः स्वतःच्या जिवाची आशा मी केव्हांच सोडून दिलेली आहे !! [ आठवल्यासारखें करून ] अरे, पण मी असा मनाशीं किती वेळ बोलत राहणार ? आसपास कोणी नाहीं तोंच त्याचं कार्य उरकून नि काय ? [ खंजीर उगारून महाराजांच्या अंगावर जातो ] अहाहा ! किती हा तेजस्वी पुरुष ! छाती तरी किती रुंद ! ! देवा ! अशा श्रेष्ठ पुरुषावर शस्त्र उचलण्याचा आणि त्यांतून अशा या निद्रितावस्थेत त्याला ठार करण्याचा प्रसंग प्राप्त झालेला पाहून मला फार वाईट वाटतें ! पण त्याला मी तरी काय करणार ? जाणून बुजून अशा पुरुषाचा सूड उगवावा अशा नीच हेतूनें—खचित हें शस्त्र मी हातीं घेतलेलं नाहीं ! ! आज दोन वर्षं झालीं, माझ्या प्रिय मातेला पोटभर अन्न मिळत नस

' स्वराज्यसुंदरी ' हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर नक्की प्रसिद्ध होईल.

त्यामुळें तिला भोगाव्या लागत असलेल्या भयंकर यातना मला पहावेनात म्हणून जिवावर उदार होऊन केवळ या पोटाकरितां सुभानरावाच्या सांगण्यावरून त्याच्या शत्रूला–या निद्रित व्यक्तिला–शंभर मोहोरा घेऊन ठार करण्याचें वचन दिल्यामुळें निरुपायास्तव मी तयार झालों आहें. [ खंजीराकडे पाहून ] वा शस्त्रा, तुला या हस्ताच्या मदतीनं ह्या विशाल हृदयसिंहासनावर विराजमान होणं आवडतं का ? ठीक आहे तर मग. आतां आटोपलंच माझं कार्य म्हणून समज. [ खंजीर उगारून तो महाराजांस मारणार तों महाराज एकदम जागे होऊन त्याचं मनगट धरतात ]

**तरुण**:—[ क्रोधानें–त्वेषानें– ] काय ? आपण अजून जागेच आहांत ? ठीक. मला वाटलं होतं कीं, आपणाला लागलेल्या क्षणैक निद्रेच्या भरांतच कायमची महानिद्रा घेण्यांत आपण निमग्न व्हाल पण तें सुख आपल्या नशीवीं नाहीं; त्याला माझा उपाय नाहीं ! माझं मनगट धरून आपला जीव वांचविण्यासाठीं आपण धडपड करीत आहां काय ? पण मी हें असें ... काय ? नाहीं–सोडित ? महाराज, अजूनहि विचार करा ! नाहीं ? नाहीं ऐकत ? ठीक आहे. [ डाव्या हातांत खंजीर घेऊन उजवा हात सोडविण्याकरितां तो उगारून ] तर मग— [ इतक्यांत तानाजी मालुसरे एकदम मध्यें येऊन सुऱ्याचा हात वरचेवर धरून मारेकऱ्याला चटकन् खालीं पाडतो व खंजीर उपसून– ]

**तनाजी०**—मूर्खा, भोग आपल्या कर्माचीं फळें !

**शिवाजी०**—[ पलंगावर उठून बसून ] हां, तानाजी; थांबा.

**तानाजी०**—[ त्वेषानें ] काय ? प्रत्यक्ष सरकारच्या जिवावर उठलेल्या ह्या काळसर्पाला मारण्याकरितां उचललेला खंजीर परत घेऊं ! ठीक आहे ! [ दोघेही नीट उभे राहतात. ]

**शिवाजी०**—[ तरुणाकडे वळून गंभीर स्वरानें ] तुझा अपराध किती भयंकर आहे ह्याची तुला थोडी तरी कल्पना आहे काय ?

**तरुण०**—महाराज, माझ्या जिवाची आशा मी केव्हांच सोडिली आहे.

**शिवाजी०**—[ गंभीरतेनें ] अरे, पण यामुळें ज्याकरितां रात्रंदिवस मी

' **स्वराज्यसुंदरी** ' हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या

इतका झटत आहे, ज्याकरितां कित्येकांचें शिव्या शाप मला नित्य घ्यावे लागत आहेत आपल्या प्रिय महाराष्ट्राचा उद्धार करण्याची माझी इच्छा मनांतल्या मनांतच अपूर्ण राहिली असती ना ?

**तरुण०**—महाराज, मला माझ्या अपराधाची पूर्ण कल्पना आहे आणि त्याप्रमाणें काळाच्या दाढेंत उडी घ्यावयाला मी एका पायावर तयार आहें ! मला आपण खुशाल तोफेच्या तोंडीं द्या.

**शिवाजी०**—[ कोमल स्वरानें ] मुला, तुझ्या या बालेश चेहऱ्याकडे पाहिलं म्हणजे अशा प्रकारचं दुष्ट कृत्य तुझ्या हातून कसं झालं ह्याचंच मला फार आश्चर्य वाटतं ! आपल्या या महाराष्ट्रांत हिंदूचं राज्य असूं नये असं का तुला वाटतं ? किंवा माझ्या हातून तुझं स्वतःचं कांहीं नुकसान झालं आहे ? मुला बोल ! बोल ! ! तूं बोलत नाहींस यावरून हें नीच कृत्य तुला कोणी तरी करायला सांगितलं असलं पाहिजे खास. मुला, जर तूं खरं सांगशील तर मी तुझा गुन्हा तुला माफ करीन.

**तरुण०**—महाराज, मी बोलतों याची माफी असावी. यःकश्चित मृत्यूच्या भीतीनें घाबरून जाऊन कोणाचा रहस्य-स्फोट करायला मी कधींहि तयार होणार नाहीं ! मी इतका नीच असेन अशी आपली कल्पना तरी कशी झाली ? जर आपणाला माझी सर्व हकीगत ऐकायची इच्छाच असेल तर माझ्याशिवाय ह्या कृत्यांत आणखी जे सामील असतील त्यांना माफी केल्याबद्दलचं वचन, मला या क्षणींच आपण दिलं पाहिजे. माझ्याबद्दलचा प्रश्नच नाहीं ! आपणाला वाटेल त्या रीतीनें मला मृत्यूची शिक्षा फर्मावा. ती मी भोगण्यास तयार आहे !

**शिवाजी०**—ठीक आहे. तुझ्या इच्छेप्रमाणें इतरांचे अपराध त्यांना माफ आहेत. आतां सांग तूं आपली सारी हकीगत.

**तरुण०**—[ कळवळून ] महाराज ! आपण गैरसावध असतानांच आपणाला ठार करण्याचं कृत्य मला माझ्या या पोटानं करायला लावलं ! आपल्या चाललेल्या या लढायांत आज दोन वर्षं झालीं, माझ्या प्रिय पित्याचा अंत झाला !

' स्वराज्यसुंदरी ' हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर नक्की प्रसिद्ध होईल.

घरांत मी आणि मला माझ्या प्राणापेक्षांही प्रिय अशी माझी मातुश्री अशीं फक्त दोन माणसें. महाराज, गरीबी म्हणजे काय ह्याचा आपणाला अनुभव नाहीं ! आज चार महीने झाले आम्हां अर्धपोटीं आहोंत ! पैशाच्या लालचीनें मी हें काम पत्करिलें. माझ्यापेक्षां माझ्या मातेला होत असलेलं असह्य दुःख मला पाहवेना. आपल्याला या जगांतून नाहींसं केलं तर " शंभर मोहरा देईन" असं सुभानपाटलानं मला सांगितलं. पोटाकरितां मीहि पण त्याचं म्हणणं कबूल केलं. झाली, संपली माझी हकीकत. आतां माझा प्रयत्न फसला, तेव्हां आपण कराल ती शिक्षा भोगणं भाग आहे !

**शिवाजी०**—[ गंभीरतेनें परंतु किंचित् रोषानें ] तानाजी, आत्तांच्या आत्तां द्या या पोराला तोफेच्या तोंडीं.

**तरुण०**—[ डोळ्यांत आसवें आणून ] थांबा ! महाराज, थांबा ! ! जो प्राणी जन्माला आला त्याच्या मागं मरण हें लागलेलंच आहे. त्याप्रमाणें मरायला मी तयार आहें ! पण मरतांना माझी एक इच्छा आहे; आणि ती पूर्ण व्हावी अशी आपणापाशीं माझी नम्र विनंती आहे !

**शिवाजी०** —काय तुझी इच्छा असेल ती सांग लवकर.

**तरुण०** —महाराज ! जिला होत असलेल्या दुःखाच्या वेदना अंशतः तरी कमी करतां याव्या म्हणून जिच्या जवळून मी एकाएकीं नाहींसा झालों, त्या माझ्या मातृदैवताचं तोफेच्या तोंडीं जातांना एकवार तरी मला दर्शन घडावं म्हणून निदान दोन घटिकांची तरी फुरसत मला मिळावी.

**शिवाजी०**—[ थट्टेनें ] वाहवा ! खाशी सोय. तुझी इच्छा पूर्ण व्हावी म्हणून तुला एकदां जा म्हणण्याचाच काय तो अवकाश, म्हणजे तूं परत येशील ही आशा बाळगायलाच नको ! उघडच आहे, जाणून बुजून काळाच्या जबड्यांत उडी घ्यायला कोण तयार होणार ? तुझी इथून सुटका होतांच तूं पळून जाणार नाहींस कशावरून ?

**तरुण०**—[ दुःखानें व निश्चयानें ] अरेरे ! महाराज ! नका, हृदयाला

' **स्वराज्यसुंदरी** ' हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर नक्की प्रसिद्ध होईल

विदारण करणाऱ्या त्या तीक्ष्ण वाग्बाणांनीं मला असं ताडण करूं नका !! आपण हें पक्कं लक्षांत ठेवा कीं, अस्सल मराठ्याचा बच्चा यःकश्चित मृत्यूला भिऊन भागू-बाईप्रमाणें कधींही पाठ दाखवीत नसतो ! महाराज, आपणाला मातृदैवताच्या योग्यतेची कल्पना असेल—त्या परमपूज्य देवताच्या प्रेमाची थोडी तरी जाणीव आपणाला असेल; तर त्या दैवताची, त्या माझ्या गुरूची नव्हे, त्या माझ्या सर्व-स्वाची शेवटची अगदीं शेवटची भेट मला घेतां यावी म्हणून केवळ दोन घटि-कांची फुरसत आपणाकडून मला मिळेलच मिळेल.

**शिवाजी०**—[ स्वगत ] अहाहा ! केवढं हें मातृप्रेम ! केवढी ही मातृ-भक्तिपरायणता !! शाबास ! मुला, शाबास !! धन्य आहेस तूं ! [ उघड ] मुला, जा. तुझी ही शेवटची इच्छा मी पूर्ण करितों.

**तरुण०**—हे परमेश्वरा, महाराजांना उदंड आयुष्य दे ! [ पूर्ण पश्चात्तापानें ] अरेरे ! असल्या उदार अंतःकरणाच्या थोर पुरुषाला—स्वतःच्या दैवी तेजानें प्रकाशणाऱ्या या दिव्यविभूतीला—ठार करण्याची अत्यंत नीच बुद्धि, देवा ! मला कां वरं झाली ? काय ! असल्या या दिव्य तेजाच्या दिवाकराला, माझ्या सारखा यःकश्चित खद्योत अगदीं नष्ट करूं पाहतो ! पण चांडाळा, असलं हें अमंगल शरीर राखून शेवटीं कोल्ह्या कुत्र्यांनीं फाडफाडून खाण्यापेक्षां तें यांच्या पायीं पडून पूनीत झालेलं काय वाईट ? आणा महाराज तो खंजीर इकडे ! म्हणजे आपल्याच हातांनी देतों एक घाव कीं दोन तुकडे उडवून !! माझा हा प्राण माझ्या मातेकरितां यावेळीं कितीही जरी घुटमळत असला तरी तो आतां ठेवणंच इष्ट नाहीं ! अहाहा ! महाराज, मला एकवार आपणाला शेवटची कडकडून मिठी मारूंद्या. [ पुढें सरसावतो ]

**शिवाजी०**—छत्. इतक्यांत नाहीं. तूं आपल्या आईला भेटून परत आल्या-वर शिक्षा भोगण्यापूर्वीं पाहिजे तर मला भेट. मरणाचं ज्याला भय वाटत असतं असल्या पुरुषांचा स्पर्श मला पापमय वाटतो.

**तरुण०**— [ अत्यंत दुःखानें ] इच्छा महाराजांची ! [ जातो. ]

---

**' स्वराज्यसुंदरी '** हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर नक्की प्रसिद्ध होईल.

**शिवाजी०**— तानाजी, तुमचें माझ्यावरलें प्रेम, माझ्या ठिकाणीं असलेली तुमची सत्यनिष्ठा, मझ्याकरितां वाटेल त्या वेळीं संकटांत उडीं घेऊन त्यांतून मला सोडविण्याची केव्हांही असलेली तुमची तयारी इत्यादि गोष्टींसंबंधानें विचार केला तर तुमचा मी यावज्जन्म ऋणीच राहणार, आणि खरेंच सांगतों, माझ्याकडून तें ऋण निदान या जन्मीं तरी फिटणें शक्य नाहीं ! खरें पाहिलें असतां तुमच्या सारख्या जिवलग दोस्तांच्या, नव्हे प्रेमळ बंधूंच्या पाठबळावरच आपल्या या महाराष्ट्राचा उद्धार करण्याचें पवित्र कार्य मीं हातीं घेतलं आहे. तानाजी ! मला जपण्याच्या चिंतेमुळें तुह्मांला रात्रों झोंप तरी येते का ?

**तानाजी०**— सरकार, काय हें बोलणं ! आह्मां यःकश्चित लोकांचा आपण नेहमीं असाच गौरव करितां त्यामुळं आमची आह्मांलाच लाज वाटूं लागते महाराज ! आपणाला जपायचंच काय पण आपल्या करितां स्वतःच्या प्राणाचीहि पर्वा न बाळगणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयाचं आद्य कर्तव्य आहे!!! महाराजांच्या जिवावर उड्या मारणारे आह्मी! [ त्वेषानें ] पण ! सुभान पाटलाच्या आत्तांच्या ह्या नीच कृतीची आठवण झाली ह्मणजे या हरामखोराला आत्तांच्या आत्तां जाऊन परलोकची वाट खुली करून द्यावी असें वाटूं लागतं ! कोण हा नीचपणा ? महाराजांनीं याचं असं कोणतं नुकसान केलं होतं कीं, त्यामुळं त्यानं प्रत्यक्ष महाराजांच्या जिवावर उठायला तयार व्हावं ? खरोखर, यावरून असं खास वाटतं कीं, हे महाराष्ट्रा ! तुझं दुर्दैव खचित संपलं नसावं !

**शिवाजी०**—[ शांतपणानें ] तानाजी, थोडा विचार केला तर असं दिसून येईल कीं, राष्ट्रोद्धाराच्या कामीं स्वतःची इच्छा नसतांही मला अनेकांचं नुकसान करण्याचा प्रसंग येतो, त्याला उपाय नाहीं! आतां आपण घेतलेल्या या किल्यासंबंधाचीच का गोष्ट ध्याना ? हा घेतांना आपल्या-बरोबर असलेल्या लोकांपैकीं, कामीं आलेला भवान्या हा त्या पाटलाचा अगदीं एकुलता एक मुलगा. आतां हा आपल्याला मिळाल्यामुळें सुभानपाटलावर मुसल्मानांचा इतका रोष झाला आहे कीं, त्याचीं पाळंमुळं खणून काढलीं जाण्याला क्षणाचाहि विलंब लागणार नाहीं !

---

‘ स्वराज्यसुंदरी ’ हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या मुमुहूर्तावर नक्कीं प्रसिद्ध होईल.

तेव्हां अशा स्थितींत त्यानें माझा द्वेष करायला तयार होणं अगदीं साहाजिक आहे. आणि ह्याबद्दल त्याला मी मुळींच दोष देत नाहीं. उलट त्याचा गुन्हा सुद्धां त्याला मी माफ केलेला आहे.

**तानाजी०**—महाराज, आपलं औदार्य आणि मनाचा थोरपणा हीं खरोखरच अलौकिक आहेत, ह्यांत विलकुल शंका नाहीं! पण सरकार, आमच्या विरुद्ध राहून आमच्यावर चालून आलेल्या आतांच्या ह्या पोराचं शौर्य पाहून मला फार आश्चर्य वाटतं! असला शूर कुमार जर आमच्या बाजूनें लढता, तर मोठेपणीं मराठी राज्याचा तो मोठाच आधारस्तंभ होऊन बसला असता.

**शिवाजी०**—तुमच ह्मणणं अगदीं बरोबर आहे. आणि त्याप्रमाणें तो तसाच होणार! तानाजी, असल्या निधड्या छातीच्या बालवीरांना जर मी तोफेच्या तोंडीं देऊं लागलों तर मला माणसाची परीक्षाच नाहीं असं ह्मणायला कोणती हरकत आहे? अहो, माझी त्याच्यासंबंधानं जी कल्पना झालेली आहे, ती जर खरी असेल तर आपलं वचन खरं करण्याकरितां आत्तांच तो येथे येईल. तानाजी, तो पोरगा आपल्या पदरीं राहणारचसा काय, पण मराठ्याचा यशोदुंदुभी एकसारखा गाजविणार ! ! !

**तानाजी०**—[ स्वगत ] परमेश्वरा ! खरोखरच, मी अत्यंत अभागी, ह्मणूनच आजपर्यंत महाराजांच्या धीरोदात्त गुणांची मला ओळख झालेली नव्हती ! [उघड] अहाहा ! माहाराज ! आपण शरणागताचे रक्षणकर्ते आहांत. फार काय सांगूं, प्रत्यक्ष देव आहांत. [ तानाजी नमस्कार करितो. ]

**शिवाजी०**—[ तानाजीस वर उचलून ] तानाजी, हें काय करितां तुह्मी ? तुम्ही समजतां इतकी माझी योग्यता खचित नाहीं ! [इतक्यांत तरूण मुलगा येतो]

**तरुण०**—महाराजांचा विजय असो. [ नमस्कार करितो ]

**शिवाजी०**—[ प्रेमानें व आश्चर्यानें ]—अरे, किती लवकर आलास तूं ? आपल्या आईजवळ आणखी थोडावेळ बसला असतास तर कांहीं हरकत का होती?

**तरुण०**—सरकार! असें कसें म्हणतां आपण बोलल्याप्रमाणें जर मी वेळे-

---

‘ **स्वराज्यसुंदरी** ’ हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या
[redacted]

वर आलों नसतों तर माझ्याबद्दल आपणाला काय बरं वाटलं असतं ? आतांपर्यंत झालेली एकंदर हकीगत आईला सांगावी असा निश्चय करून मी तिला भेटायला गेलों खरा, पण तिच्या समोर जातांच माझे सारे बेत लटपटले, मी अगदीं हतबुद्ध झालों ! काय सांगूं महाराज ? मी आलेला पाहतांच तिला जो कांहीं आनंद झाला त्याच्या भरांत तिनें मला मोठ्या प्रेमानें किं हो कुरवाळलंन् ! तेव्हां अशा वेळीं माझ्या मरणाची भयंकर बातमी तिच्याकडून नुसती ऐकवली सुद्धां जाणार नाहीं हें लक्षांत येतांच मी तसाच निघून आलों. आतां तिला ही हकिगत समजेल तेव्हां समजेल! पण सरकार! मी एकाद्या वीराप्रमाणं मरायला तयार झालों एवढं वरीक तिला कळवायला मात्र चुकूं नका !

**शिवाजी०**—[ स्वगत ] हे बालवीरा, एव्हांपासून केवढे हे तुझे उदात्त विचार ! हे बाळा ! तुझ्या ह्या विचारांनीं माझ्या पोटांत कशी अगदीं कालवा-कालव करून सोडिली आहे ! ! नाहीं ! मला आतां मुळींच धीर धरवत नाहीं ! ! [ उघड ] बाळा ! तुझ्यासारख्या वीराला मी अशी शिक्षा तरी कशी करूं ? ये ! माझ्या बाळा, मला एकदां कडकडून भेट ! ! मुला, तुझा गुन्हा तुला मी केव्हांच माफ केला आहे. [ त्याला हृदयाशीं धरितात. ]

**तरुण०**—[ स्वगत ] अहाहा ! ज्या गुन्ह्यापासून मला मरणच यावयाचं त्या ऐवजीं जर माझा भाग्योदयच होत आहे तर अशा प्रसंगाला मी नांव तरी काय देऊं हेंच मला सुचत नाहीं ! [ उघड, हुंदका भरून येऊन ] महाराज ! आपण मला पितृतुल्य आहांत ! आज, माझ्या आईला आणि मला आपण जीवदान दिलंन ! ! बोला. श्रीशिवाजीमहाराजकी जय ! ! !

**शिवाजी०**—मुला ! आपल्या मातृदेवतेवर जसं तुझं अत्यंत प्रेम आहे तसंच आपल्या राष्ट्रदेवतेवर ही तूं करशील ना ? आणि तसंच या देशोद्धाराच्या कामीं सुद्धां मला मदत करशील ना ?

**तरुण०**—महाराज ! ज्या महात्म्याच्या कृपाकटाक्षपातांनीं माझ्या या जड देहांत नवजीवन उत्पन्न होऊन हा देह कृतार्थ झाला; ज्या आत्मदेवाच्या दिव्य

---

‘ **स्वराज्य सुंदरी** ’ हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या

तेजानं माझी मलीन दृष्टि साफ झाली; ज्याच्या तोंडून निघणाऱ्या गंभीर निनादानें माझ्या कर्णपथांत त्या राष्ट्रमातेचा जयजयकार एकसारखा घुमूं लागला; ज्याच्या कृपेनं माझ्यांत खरं चैतन्य उत्पन्न होऊन माझ्या त्या दैवी मातेच्या भक्तीची दिव्य ज्वाला माझ्यांत प्रज्वलित झाली; आणि ज्याला कडाडून मिठी मारतांच हस्त-पादादिकच नव्हे तर शरीरांतील प्रत्येक रोमन्‌रोम त्या मातेच्या जयजयकाराचा एकसारखा टाहो फोडूं लागला; त्या आत्मदेवाला आणि त्या थोर महात्म्याला साक्ष ठेवून मी अशी शपथ घेतों कीं, " हे माझ्या दैवी माते, तुझ्या भक्तिज्वा-लेनें पेटलेला हा देह, अखेर तुझ्याच भक्तिज्वालेंत विलीन होईल. आणि ज्या महात्म्याच्या—ज्या कर्मवीराच्या—कृपाप्रसादानें तुझी ती दिव्य मूर्ती या हृदय–फलकावर कायमची कोरली गेली त्या महात्म्याचं—त्या कर्मवीराचं वचन माझ्या-कडून कधींही मोडलं जाणार नाहीं !!! "

**शिवाजी व तानाजी०**--मुला, तुला तो जगदीश्वर दीर्घायु करो !

[ पडदा पडतो. ]

' स्वराज्य सुंदरी ' हे अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच

ॐ

# स्वराज्य–वेदाचे व्यासदेव

आणि

## फाजील दीडशहाणे !

आमच्या परमप्रिय हिंदी राष्ट्राच्या स्वराज्यवेदव्यासांना वंदन असो ! त्याचबरोबरच स्वतःच्या मतांच्या धुंदीनं बेफाम माजलेल्या फाजील दीडशहाण्यांनाहि धिःकार असो ! !

हे हिंदीराष्ट्रा, तुझे दुर्दैवाचे दिवस अजून संपले नाहीत का ? या प्रश्नाचें काय उत्तर द्यावें तेंच आम्हांस समजत नाहीं. लोकमान्य टिळकांसारखे स्वराज्यवेदाचे व्यासमहर्षी पाहिले म्हणजे असें वाटतें कीं, हिंदी राष्ट्राचे दैन्याचे दिवस संपले–दैन्याच्या नरकवासाचा दुष्ट काळ खलास झाला ! पण त्याचबरोबर दुसरेहि कांहीं फाजील दीडशहाणे पाहिले म्हणजे असें वाटतें कीं, हिंदी राष्ट्र हें दुर्गतीच्या नरकांतच लोळण्याकरितां परमेश्वरानें निर्माण केलें आहे ! राष्ट्राच्या तेहतीस कोटी देवांप्रमाणें आम्हांस पूज्य असलेल्या जनते, तुला आतां नरकवास संपवावयाचा आहे, कीं स्वर्गाला लाथाडून स्वतःचें शरीर दुर्गतीच्या घाणीमध्यें कुजवून घ्यावयाचें आहे ? जनते ,तुझा स्वर्ग म्हणजे स्वराज्योपभोग आणि तुझा नरक म्हणजे दुर्गति ! जनते ऊठ , आणि स्वोन्नतीच्या मार्गाला लाग . जनते , जागी हो, आणि स्वराज्य सूर्याच्या सुखकर उदयकालचीं मंगल भूपालीगीतें गा. ऊठ, तुझ्याच जागृतीवर आमचा भरंवसा आहे.

---

‘ **स्वराज्यसुंदरी** ’ हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या

# भूपाळी.

घनःश्यामसुंदरा श्रीधरा—या चालीवर.

राष्ट्रदेवमंगला, सुंदरा, अरुणोदय आला ।
स्वराज्यतेजें निशा संपली, तमोनाश झाला ।।
दैन्यनिशा येतां देशाला, अंधकार झाला ।
कलहाचें वाघूळ मातलें, त्या भेसुर काला ।।
त्यांहिं फांसलें मातृभूमिच्या काजळ वदनाला ।
तेहतीस कोटी देव पावले कीटक रूपाला ।।
नरकवास तो वर्णायातें मति कुंटित होते ।
कविचें कोमल काळिज किति हें तडातडा तुटतें ।।
स्वराज्यदेवा तिलकराजया परि पाहुनि आतां ।
उचंबळोनी स्फूर्ति येतसे बघ कविच्या चित्ता ।।
जयजयकारा सारे करुंया राष्ट्रदेवतेच्या ।
मंगल ताना घेउं चलारे त्या राष्ट्रैक्याच्या ।।

चाल—गाडुनियां टाकूं । याहो भेदपिशाच्चाला ।।
स्वज्यमंत्रा जपुनी । करुंया मंगल गानाला ।।
स्वराज्यदेवा शिवराया, हें देई सुमतीला ।।
स्वराज्यतेजें निशा संपली, तमोनाश झाला ।।

ऐका, ऐका ! हीं भूपाळी गीतें ऐका. नाचा, आनंदानें नाचा ! या मंगल

‘स्वराज्यसुंदरी’ हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर नक्की प्रसिद्ध होईल.

भूपालीगीतांच्या तालावर आनंदानें नाचा ! निर्मल राष्ट्रभक्तीच्या भरारीनें नटलेल्या चंडोलानों, स्वराज्यसूर्याकडे धांव घ्या. हीं मंगल भूपालीगीतें कोण गात आहे बरें ? हा मधुर आवाज आपल्या ओळखीचाच आहे–हा गोड–गोड–गुंगविणारा गोड ध्वनि आपल्या ओळखीचा आहे. स्वराज्यवेदांचें पवित्र पठन करणारा हा वेदव्यास कोण बरें ? अरे, हा आमचा प्राण–हा आमचा कलिजा–हा आमचा आत्मा–हा आमचा देव–हा आह्मां जनतेचा परमेश्वर तिलकराज ! स्वराज्यवेदव्यासा तिलकमहर्षे, चालूं दे, तुझें हें वेदपठन चालूं दे तिलकमुने, तुझ्या स्वराज्यवेदाच्या पवित्र मंत्रांनीं आमच्या हृदयांतील पापमल नष्ट होऊं दे तिलकव्यासा, तुझ्या स्वराज्यगायत्रींच्या जपानें तेहतीस कोटी नरांना नारायणाचें दिव्य स्वरूप प्राप्त होऊं दे. गा, तिलकविहंगा, भूपालीगीतें गा, आणि आमची निद्रा मोड. हा पहा, आम्हांला स्वराज्यसूर्य दिसूं लागला ! स्वराज्यसूर्याचें अपूर्व व दिव्य तेज आमच्या पापमलतमाला विदारूं लागलें. अहाहा ! हा सोन्याचा दिवस, देवा इतक्या घोर नरकवासानंतर आम्हांला दाखविलास, आम्ही तुझे कोणत्या पवित्र शब्दांनीं आभार मानूं ? देवा, क्षमा कर, क्षमा कर, आमच्या गुलामगिरींत कुजलेल्या दुर्बल अंतःकरणांत पवित्र शब्दच उमटूं शकत नाहींत–याची क्षमा....

थांब, पण हे भीषण व भेसूर ध्वनि कोण काढीत आहेत ? हे आमचे चंडोल इकडे गातात, पण हीं वटवाघुळें येथें कां ? वटवाघुळांनों, दूर सरा, मागें व्हा, परत अंधारांत जाऊन तोंडें खुपसा, सूर्योदयकालीं तुमच्या भरारीचें काम काय ? चला, जाता कीं नाहीं ? अपशकुन्यांनों, स्वराज्यसूर्य उगवत असतांना असला अमंगल अपशकून आह्मांला कां करतां ? काय ह्मणतां ? आह्मी अपशकून करणार ! नका हो, वटवाघुळांनों, असा अपशकून करूं नका ! हात जोडतों. दैन्याची निशा पुरे झाली आतां आम्हांला हा नरकवास नकोसा झाला आहे. हाय, हाय ! हीं वटवाघुळें आपले घूत्कार थांबविण्याचीं चिन्हें कांहीं दिसत नाहींत. खास, हीं वाघुळें राष्ट्रैक्याचा विध्वंस करून पुन्हा देशभर कलहाचें साम्राज्य माजविणार !

'**स्वराज्यसुंदरी**' हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या समहूर्तावर नक्की प्रसिद्ध होईल.

आज आम्हांला राष्ट्रैक्याच्या भूपाळ्या पाहिजे आहेत–भेदभावाचीं भेसूर गीतें नकोत ! ऐका–हें मंगलगीत—

( लावणीवृत्त )

बघ ! बघ ! स्वराज्य प्रभात आली ।।
वाघुळराजांनीं गरदी केली हो । बघ
स्वराज्य प्रभात आली ।। १ ।।
आतां चला घालुं गोंधळ ।
करुं सारा बस्त्याबोळ हो ।
आतां चला घालुं गोंधळ ।। २ ।।
लावुं महारणीशीं लग्न ।
नासुं ब्राह्मण क्षत्रीय कुळ हो ।। ३ ।।

बावांनों, हीं अमंगल गीतें थांबवाल तर फार उपकार होतील. अमंगल गीतें गाण्याचीं ही वेळ नव्हे. आम्ही तुमच्या या गीतांस अमंगल गीतें म्हणतों म्हणून कदाचित तुम्हांस राग येईल; पण जरा विचार करा—वेळ ओळखा व पूर्ण विचारांतीं जर तींच भेसूर गीतें गात रहावें असें तुम्हांस वाटत असेल तर मग खुशाल गा. अमंगल सूर काढणाऱ्याच्या तोंडाला कोण हात लावूं शकणार ? ही वेळ स्वराज्यकालींची सुप्रभात आहे. या वेळीं देशांत राष्ट्रैक्य पाहिजे आहे. या वेळीं सर्व देशानें एकमुखानें स्वराज्याची मागणी निर्धारानें केली तर ती सफल होण्याचा रंग आहे. आज सर्व जगावर स्वातंत्र्यदेवतेचा जयजयकार होत आहे म्हणून तुम्हीहि हीच वेळ साधा व स्वराज्यदेवतेच्या भजनीं लागा. 'एकदां स्वराज्य देवता प्रसन्न होऊं द्या—मग कोणास काय कमी आहे ? स्वराज्याचे कोमल किरण या हिंदभूमीवरील दैन्याची थंडी नाहींशी करूं लागले म्हणजे जनतेच्या अंगीं समतेच्या उच्च तत्त्वांची ऊब येईल. अशी समतेऱ्य।

---

' स्वराज्यसुंदरी ' हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर नक्की प्रसिद्ध होईल

तत्त्वांची ऊब उत्पन्न करणें हें देशांत धार्मिक–सामाजिक सुधारणा करूं पाहणारांचें आद्य कर्तव्य आहे. जोंपर्यंत देशांत स्वराज्य देवतेची प्रतिष्ठापना होऊन समतेच्या उच्च तत्त्वांची पूजा-अर्चा सुरू झाली नाहीं तोंपर्यंत धार्मिक–सामाजिक सुधारणेस हात घालणें म्हणजे वसंतऋतु प्राप्त झाला नसतांच आम्रवृक्षाला मोहोर येईल का म्हणून वाट बघत बसण्यासारखें मूर्खपणाचें आहे म्हणून धार्मिक–सामाजिक सुधारणा घडवून आणणाऱ्या सर्व फाजील दीड शहाण्यांस आमची अशी हात जोडून विनंति आहे कीं, या सुप्रभातकालीं स्वराज्य वेदव्यासांनीं उपदेशिलेल्या स्वराज्य मंत्राचेंच पठन करा, व हीं भेदभावाचीं अमंगल गीतें गाडून टाका. धार्मिक–सामाजिक सुधारणेचें ढोंग करून जर या सुप्रभातकालीं ही भेसूरता उत्पन्न कराल तर राष्ट्रैक्याचा विध्वंस करून देशमातेच्या मानेवर भेद भावाचें भूत बसविल्याचें घोर पातक तुम्हांस लागेल !

‘ स्वराज्यसुंदरी ’ हें अमोलिक संगीत नाटक येत्या वर्षप्रतिपदेच्या

# श्रीराष्ट्रप्रेममाला.

## पहिल्या वर्षाचीं १२ पुष्पें निघालीं !

( १ ) लोकमान्यांचा सवाल ! (२) स्वराज्यभारत--राजपर्व, (३) विजयादशमीचा खास अंक, (४) राष्ट्राची दिवाळी, (५) ? ? ? थोतांड ! (६) लोकमान्यांना निरोप ! (७–८) होमरूल निघालें ! (९) हे साहेबांच्या खिस्तदेवा ! (१०) महात्मा गांधींचा सत्याग्रह, (११–१२,) श्रीशिवाजी महाराजकी जय ! शिवाय बक्षीस चित्रें, अनेक रंगीत फोटो, कर्मयोग कॅलेंडर इ. पृष्ठसंख्या दोनशेंवर ! १८५ रु. ची व्ही. पी. मागवून या राष्ट्रीय पुस्तकांचा संग्रह करा.

---

# स्वराज्याची मोहीम.

भाग १।२।३।४, पृष्ठें ४५०; व्याख्यानें १५०; लोकमान्यांच्या स्वराज्यविषयक व्याख्यानांचा एवढा मोठा संग्रह आजपर्यंत प्रसिद्ध झालेला नाहीं. कि० १॥ रु० ट० ख० ८४ नि०

अनंत हरि गद्रे. जोगेश्वरी नाका,

ॐ नमः श्रीरामचंद्राय.

# आर्यमहौषधालय

## मु. पो. आंजर्ले.

### कोंकण प्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध, निर्दोष व रामबाण औषधें.

## मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहबुद्धिकांति-वर्धक व पूर्ण धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक—मौक्तिक—कस्तुरी—प्रवालादिमिश्र अपूर्व गुटिका.

या गोळ्यांनी क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग, संततीस अपाय करणारे गर्भाशयस्थ विकार, संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविधरोग ताबडतोब दुरुस्त होऊन चित्तोत्साह, बुद्धि आणि कांति वाढते व अंगांत परिपूर्ण शक्ति येते. शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्यमान् होण्यास ह्या गुटिका हेंच अगदीं प्रतिज्ञेचें औषध होय. यामुळें यांचें लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून जास्त घेणारास टपाल खर्च माफ. त्याच्या आंत घेणारांस ट० ख० वेगळा ०४ पडेल. ३२ गो. १ रु.; ७० गो. २ रु.; १६० गो. ४ रु.; २६० गो. ६ रु. आणि ५२० गो. १० रुपये.

# अत्यंत दुर्मिळ पुस्तकें !

लोकमान्य टिळकांची

# स्वराज्याची मोहीम

भाग १।२।३।४

पृष्ठसंख्या ४५० ! १५० व्याख्यानें !!

## केवळ अपूर्व संग्रह !!!

किं. फक्त १॥ रु. ट. ख. ८४ निराळा.

राष्ट्रप्रेममालेच्या पहिल्या वर्षाचे

## १२ अंक.

फोटो, कॅलेंडर वगैरेसह किं. व्ही. पी. सह फक्त १८५ रु.

फारच थोडे सेट शिल्लक आहेत.

अनंत हरि गद्रे. जोगेश्वरी नाका, पुणें.

छापत आहे !        छापत आहे ! !

पहिलें गद्य नाटक

# वीरकुमारी

या नाटकांत पुणें येथें नवीन निघत असलेल्या नाट्यकुशल 'श्रीगणेश नाटक मंडळीं' तील नटांचे फोटो देणार आहों. किं. ०१२, ट. व्ही. पी. खर्च ०३ निराळा.

---

तयार होत आहे !        तयार होत आहे ! !

संगीतमालेंतील दुसरें नाटक

# राधा-रमण

अनंत हरि गद्रे, जोगेश्वरीनाका, पुणें.

---

प्रकाशक—अनंत हरि गद्रे, जोगेश्वरीनाका, पुणें शहर.

मुद्रक—शंकर नरहर जोशी चित्रशाळा ८१८ सदाशिव पेठ, पुणें शहर.

## थंडगार नेत्रांजन.

यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, कांच इ० डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार रहाते. ड० १॥ रुपया.

## सूचना.

वरील औषधें पूर्ण खात्रीची असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीच्या खड्यां-सह रोखीनें अगर व्ही०पी०नें पाठवूं. प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक ( क्याटलॉग ) फुकट देऊं. आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री बिवलकर वैद्य.
मु० पो० आंजर्ले, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

---


## तापांतून उठलेल्यांस शक्तिवर्धक अमृत.

# कोहिनूर गुलकंद.

३२ तोळे:—१ डबा ८१२ ट. ख. ८५; ३ डबे २ रु. ट. ख. ८१३; ६ डबे ३॥ रु. ट. ख. रु. १८१०

जगन्मोहिनी उदबत्ती पेटी ४ रु. ट. ख. नि.

सौगंधिक स्टोअर्स, जोगेश्वरी–नाका, पुणें.

“ **पामाध्वंसन** ”—वनस्पतीचा अपूर्व शोध! थोड्या खर्चांत “ **पामाध्वंसन** ” खरूज, गजकर्ण, इसब, नायटे इ. त्वचाविकारांवर तात्काळ गुण दाखवितें. प्रथम आपल्या गांवातल्या दुकानदाराकडे विचारा. नच मिळाल्यास. “ **दि डेक्कन ट्रेडींग कं. बेळगांव** ” या पत्त्यावर लिहून मागवा. पुडीची किं. १ आणा. २५ पु. ११- रु. १०० पुड्यांस ४॥ रु. ट. ख. माफ.

---

# वाचकांस-संदेश.

कोणतेही अपायांवर ताईत व दोरे देऊं! ताईत किं० १ रु० दोरा ८५. वि० मा० पत्रद्वारें.

**सिद्धमांत्रिक के. एस्. जोशी मु० पो०**
**कोळथरें, जि० रत्नागिरी.**

---

## थी टूथ इन्शुरर कंपनी.

**किकास्ट्रीट मुंबई नं, ४ आपले दांत स्वच्छ व मजबूत राहण्याकरितां वरील कंपनीची टूथ पावडर वापरा व आपले दातांचें आरोग्य कायम राखा. किं. १ बा.**

## श्रीराष्ट्रप्रेममाला.

### …हिल्या वर्षाचीं १२ पुष्पें निघालीं !

…कमान्यांचा सवाल ! (२) स्वराज्यभारत—राजपर्व, (३) … खास अंक, (४) राष्ट्राची दिवाळी, (५) ? ? ? थोतांड ! (६) लोकमान्यांना निरोप ! (७–८) होमरूल निघालें ! (९) हे साहेबांच्या ख्रिस्तदेवा ! (१०) महात्मा गांधींचा सत्याग्रह, (११–१२,) श्रीशिवाजी महाराजकी जय ! शिवाय बक्षीस चित्रें, अनेक रंगीत फोटो, कर्मयोग कॅलेंडर इ. पृष्ठसंख्या दोनशेंवर ! १८५ रु. ची व्ही. पी. मागवून या राष्ट्रीय पुस्तकांचा संग्रह करा.

# स्वराज्याची मोहीम.

भाग १।२।३।४, पृष्ठें ४५०; व्याख्यानें १५०; लोकमान्यांच्या स्वराज्यविषयक व्याख्यानांचा एवढा मोठा संग्रह आजपर्यंत प्रसिद्ध झालेला नाहीं. कि० १॥ रु० ट० ख० ८४ नि०

अनंत हरि गद्रे. जोगे… नाका,

ॐ नमः श्रीरामचंद्राय.

# आर्यमहौषधालय

## मु. पो. आंजर्लें.

### कोंकण प्रांतांतील अगदीं ताज्या व शुद्ध वनस्पतींचीं जगत्प्रसिद्ध, निर्दोष व रामबाण औषधें.

## मदनविलासामृतसंजीविनी.

वीर्यस्तंभक, रक्तशोधक, अत्यंत कामोत्तेजक, चित्तोत्साहबुद्धिकांति-वर्धक व पूर्ण धातुपौष्टिक, सुवर्णमाक्षिक—मौक्तिक—कस्तुरी—प्रवालादिमिश्र **अपूर्व गुटिका.**

या गोळ्यांनीं क्षयरोग, पांडुरोग, जीर्णज्वर, मस्तकशूल, मेंदूचे विकार, बाळंतरोग, संततीस अपाय करणारे गर्भाशयस्थ विकार, संधिवातादि अनेक वातरोग, कडकी, नेत्रविकार, कटिशूल इत्यादि नवीन अगर जुनाट असलेले नानाविधरोग तावडतोब दुरुस्त होऊन चित्तोत्साह, बुद्धि आणि कांति वाढते व अंगांत परिपूर्ण शक्ति येते. शरीरस्थ रस, रक्त, अस्थि, मज्जा, शुक्र वगैरे सप्तधातूंची वृद्धि होऊन मनुष्यास सर्व प्रकारें संसारसुखाचा उत्तम लाभ होतो. वरील एकंदर रोग त्वरित व निखालस जाऊन सर्व प्रकारें देह अगदीं जोमदार आणि आयुष्यमान् होण्यास ह्या गुटिका हेंच अगदीं प्रतिशेचें औषध होय. यामुळें यांचें लक्षावधि लोक नित्य ग्राहक होत आहेत. गोळ्या रुपयाच्या आंत मिळणार नाहींत. एकदम सहा रुपयांच्या किंवा त्याहून जास्त घेणारास टपाल खर्च माफ. त्याच्या आंत घेणारांस ट० ख० वेगळा ८४ पडेल. ३२ गो. १ रु.; ७० गो. २ रु.; १६० गो. ४ रु.; २६० गो. ६ रु. आणि ५२० गो. १० रुपये.

## थंडगार नेत्रांजन.

यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, कांच इ० डोळ्यांचे एकंदर विकार तावडतोब बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार रहाते. ड० १॥ रुपया.

## सूचना.

वरील औषधें पूर्ण खात्रीची असल्यामुळें आज पंचवीस वर्षांत त्यांचा लक्षावधि लोकांस अतिशय उपयोग झाला म्हणून त्यांचा नेहमीं फारच खप होत आहे. अनुभवानंतर पूर्ण खात्री पटेलच. औषधें माहितीच्या खर्ड्यांसह रोखीनें अगर व्ही०पी०नें पाठवूं. प्या. व टपालखर्च वेगळा. घाऊक घेणारांस कमिशन भरपूर. सर्व औषधांच्या व आरोग्यरक्षणाच्या माहितीचें सचित्र मोठें पुस्तक ( क्याटलॉग ) फुकट देऊं. आमचीं औषधें मागविणें तीं खालील बिनचूक पत्त्यावर मागवावीं.

कृष्णशास्त्री विवलकर वैद्य.
मु० पो० आंजर्लें, ता० दापोली, जि० रत्नागिरी.

---

## तापांतून उठलेल्यांस शक्तिवर्धक अमृत.

# कोहिनूर गुलकंद.

३२ तोळे:—१ डबा ०१२ ट. ख. ०५; ३ डबे २ रु. ट. ख. ०१३; ६ डबे ३॥ रु. ट. ख. रु. १०१०

---

जगन्मोहिनी उदबत्ती शेरीं ४ रु. ट. ख. नि.

सौगंधिक स्टोअर्स, जोगेश्वरी-नाका, पुणें.

" **पामाध्वंसन** "— वनस्पतीचा अपूर्व शोध ! थोड्या खर्चांत " **पामाध्वंसन** " खरूज, गजकर्ण, इसब, नायटे इ. त्वचाविकारांवर तात्काळ गुण दाखवितें. प्रथम आपल्या गांवातल्या दुकानदाराकडे विचारा. नच मिळाल्यास. " **दि डेक्कन ट्रेडींग कं. बेळगांव** " या पत्यावर लिहून मागवा. पुडीची किं. १ आणा. २५ पु. ११- रु. १०० पुड्यांस ४॥ रु. ट. ख. माफ.

---

# वाचकांस-संदेश.

व कोणतेही अपायांवर ताईत व दोरे देऊं ! ताईत किं० १ रु० दोरा ८५. वि० वा० पत्रद्वारें.

**सिद्धमांत्रिक के. एस्. जोशी मु० पो०**
**कोळथरें, नि० रत्नागिरी.**

---

# थी टूथ इन्शुरर कंपनी.

**किकास्ट्रीट मुंबई नं, ४ आपले दांत स्वच्छ व मजबूत राहण्याकरितां वरील कंपनीची टूथ पावडर वापरा व आपले दाताचे आरोग्य कायम राखा. कि ३ पा.**